# राज्यस्तरीय चर्चासत्र

## No Transfusion of Idea
## Only transformation

## स्वामी चिन्मयानंदांचे शैक्षणिक विचार

दि. ३-४-५ मार्च २०११

As a teacher I have given you all you need.

Now it is for you to apply it all in life and learn to

Live accepting everything, rejecting nothing.
Reflecting all, yet, keeping nothing.

# ''प.पू.स्वामी चिन्मयानंद यांच्या शैक्षणिक विचारांचा नवीन अभ्यासक्रमाच्या दृष्टिकोनातून विश्लेषणात्मक अभ्यास''


मार्गदर्शक
प.पू.स्वामी पुरुषोत्तमानंद सरस्वती
प्रमुख आचार्य,
चिन्मय सेवा ट्रस्ट,
महाराष्ट्र, गोवा

संशोधिका
डॉ. सौ. वसुधा विनोद देव
अधिव्याख्याता,
शासकीय अध्यापक महाविद्यालय,
अकोला

प्रस्तुत संशोधनाच्या माहिती संकलनासाठी खालील साधनांचा अवलंब करण्यात आला होता.

१) प.पू. स्वामी चिन्मयानंद यांची ग्रंथसंपदा, लेख, व्याख्याने इ.

२) शिक्षण तज्ज्ञांसाठी मतावली

३) चिन्मय साधकांसाठी मतावली

४) आचार्यांसाठी मुलाखतीचे प्रारुप

वरील साधनांवरुन प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे जे निष्कर्ष निघाले त्याचा उहापोह पुढीलप्रमाणे करण्यात आला आहे.

अ) प.पू. स्वामी चिन्मयानंद यांच्या ग्रंथ संपदेतून प्राप्त माहितीवरुन काढण्यात आलेले निष्कर्ष

प.पू. स्वामी चिन्मयानंद यांची विपूल ग्रंथसंपदा उपलब्ध आहे. ह्या ग्रंथ संपदेतून प.पू. गुरुदेवांचे जे शैक्षणिक योगदानाबाबत खालील निष्कर्ष प्राप्त होतात.

शिक्षण

१) प.पू. गुरुदेव हे आध्यात्मवादी तत्वज्ञ शिक्षण तज्ज्ञ आहे.

२) आधुनिक शिक्षण पध्दतीबाबत त्यांना अतिशय नैराश्य आहे. आजच्या शिक्षणप्रणालीवर यांनी अनेक ठिकाणी कडाडून हल्ला चढविला आहे.

३) शिक्षणामुळे योग्यते वाढ होणे त्याच प्रमाणे आपल्या कर्माच्या क्षेत्रात आपल्या प्राप्त ज्ञानाचा उपयोग करण्याची पात्रताही व्यक्तिची विकसित व्हायला हवी ही त्यांची शिक्षणाकडून अपेक्षा आहे. म्हणजेच शिक्षणाला व्यवहार्य आयाम असावा व ते दैनंदिन

जीवनातही उपयुक्त ठरते असे त्यांचे स्पष्ट मत आहे व ह्यामळेच ते आध्यात्मिक उपयोजनवादीही ठरतात.

४) शिक्षणातून व्यक्तिमत्व विकासावर जसा त्यांनी भर दिला तसाच व्यक्तिमत्वाच्या पुनर्निर्माणावरही त्यांनी भर दिला आहे.

५) शिक्षणातून मन आणि बुध्दीची पुनर्व्यवस्था त्यांना अपेक्षित होती.

६) हृदयाच्या शिक्षणावर त्यांनी प्रामुख्याने भर दिला आहे.

७) शिक्षणातून मानवामध्ये सुसंस्कृतता यावी हे त्यांना अभिप्रेत आहे.

८) ज्ञान व कृती ह्याबाबत सहसंबंधात्मक दृष्टिकोन हा शिक्षणात महत्वाचा आहे.

९) ज्ञान प्राप्तीसाठी मनन व चिंतनावर त्यांनी भर दिला आहे.

१०) अनुदेशनापेक्षा शिक्षण संकल्पनेवर त्याचा भर आहे. नवीन काळास अनुसरुन अनुदेशनही तेवढेच महत्वाचे आहे असे ते मानतात.

११) ज्ञानाच्या मनन आणि चिंतनातूनच व्यक्तिच्या कृतीला गाभा प्राप्त होऊ शकतो ह्या कृतीमध्ये शिक्षणाची इतिकर्तव्यता आहे असे ते मानतात.

१२) शिक्षण हे ध्येय आहे तर निर्देशन हे साधन आहे.

१३) इतर आध्यात्मवादी तज्ज्ञाप्रमाणे त्यांनी शिक्षणाला सुप्त शक्ती मानले आहे पण ह्या विचाराचे पुढचे पाऊल गुरुदेवांनी मांडले आहे. मानवाची सुप्त शक्तीची अभिव्यक्ति म्हणजे शिक्षण व ही शक्ती गुरुद्वारा संरक्षित असते.

१४) शिक्षण ही बाहेरुन लादण्याची बाब नाही तर शिक्षण ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. हा विचार मांडून गुरुदेवांनी निसर्गवादी आध्यात्मवाद सुध्दा मांडला आहे.

१५) संधीला प्राप्त करण्याची व्यक्तिची क्षमता विकसित करण्याची शिक्षणाबाबतची संकल्पना ही शिक्षण संकल्पनेत भर टाकणारी आहे.

१६) शिक्षणातून होणाऱ्या अभिवृत्तीची वाढ ही शिक्षणशास्त्रात फार मोठी देणगी आहे. To share, to serve ही अभिवृत्ती शिक्षणातून निर्माण होणे हा विचार शिक्षणाबाबत उदात्त संकल्पना मांडतो.

१७) शिक्षणातून आत्मपरिवर्तनावर त्यांनी भर दिला आहे. शिक्षणाची परिभाषा ही change in behaviour अशी आजपर्यंत करण्यात आली आहे. पण केवळ change in behaviour नको तर transformation आवश्यक आहे. ही संकल्पना शिक्षणशास्त्रात मोलाची भर टाकणारी आहे.

१८) व्यक्तिमध्ये जे सुप्तावस्थेत आहे त्याला बाहेर काढून त्याला सुंदर आकार देणे ही शिक्षण संकल्पना स्वामी विवेकानंदाशी मिळती जुळती आहे.

१९) प.पू. गुरुदेवांनी शिक्षणाला सौंदर्याचे मूल्यही प्राप्त करुन दिले आहे.

२०) माणूस साक्षर झाला म्हणजे तो सुशिक्षित होईलच असे नाही ही संकल्पना गुरुदेवांनी मांडली आहे.

२१) शिक्षणप्रक्रियेत गुरुदेवांनी ध्यानसाधनेला प्राधान्य दिले आहे. व्यक्तिमत्व विकासावरही ध्यानाचे महत्व त्यांनी मांडले आहे. व्यक्तिमत्वाचे पुनर्घटनासाठी ध्यान महत्वाचे आहे.

२२) शिक्षणातून जीवनमूल्यांचा विकास व्हावा ह्या ध्येयाला त्यांनी प्राधान्य दिले असले तरी जीवनमूल्याचे प्रत्यक्ष जीवनात आचरण ह्यावर त्यांचा जोर आहे. केवळ पुस्तकी ज्ञानाला त्यांनी विरोध केला आहे तर ह्या पुस्तकी ज्ञानासोबत आचरणावर त्यांनी भर दिला आहे. कृतीवर भर दिला आहे. ह्यातून त्यांनी निश्चितपणे आध्यात्मवादी कार्यवाद मांडला आहे.

२३) प.पू. गुरुदेवांनी आपल्या विचारामध्ये spiritual education देण्याबाबत आग्रह केला आहे.

२४) शिक्षण प्रक्रियेत त्यांनी मानसिक प्रशिक्षणाला विशेष प्राधान्य दिले आहे. चांगले विचार घडविते ते शिक्षण असे मनाच्या प्रशिक्षणाला त्यांनी प्राधान्य दिले आहे.

२५) शिक्षणातून चारित्र्य विकसनावर त्यांनी भर दिला आहे.

२६) शिक्षणात संतपरिचय व संत साहित्याच्या अभ्यासावर त्यांनी भर दिला आहे.

२७) शिक्षक शाळा आजूबाजूच्या परिसरात नैतिक आचरणावर त्यांनी विशेष भर दिला आहे.

२८) भारतीय नियतीमध्ये बदल घडवून आणायचा असेल तर सर्वप्रथम व्यक्तिच्या विचारामध्ये परिवर्तन आवश्यक आहे व हे परिवर्तन spiritual education च्या माध्यमातून शक्य आहे.

२९) शिक्षण हे value based असावे ह्यावर त्यांचा भर होता.

३०) शिक्षणातून ज्ञानसंवर्धन व शील संवर्धनावर त्यांनी भर दिला आहे.

३१) शिक्षणाचा अभ्यासक्रमाचा विचार करतांना रुसो, प्लेटो ह्यांच्याच प्रमाणे त्यांनी वयोगटानुसार शिक्षणाचा विचार केला आहे व हा विचार करतांना राष्ट्राचा सुजाण नागरिक घडविणे हा दृष्टिकोन त्यांचा आहे.

३२) शिक्षणामध्ये शिक्षण प्रक्रियेतील प्रत्येक घटकाच्या उदात्त वृत्तीच्या प्रगटीकरणावर त्यांनी भर दिला आहे.

३३) शिक्षणात नकारात्मक विचारांना थारा नको.

३४) प्राथमिक शिक्षणात बालकाच्या आजूबाजूच्या वातावरणास प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच सर्व घटकांच्या उदात्ततेच्या प्रगटीकरणाला महत्व देण्यात आले आहे.

३५) प्राथमिक काळातच सामाजिक विकासाच्या विचाराला गुरुदेवांनी प्राधान्य दिले आहे. ज्ञान व क्षमतांना प्रोत्साहन कलेला प्रोत्साहन देण्याबाबत त्यांनी प्रकर्षाने विचार व्यक्त केले आहेत.

३६) स्वयंशिस्तीवर त्यांनी भर दिला आहे.

३७) कथांच्या माध्यमातून जीवनमूल्यांच्या प्रशिक्षणावर प्राथमिक काळात त्यांनी भर दिला आहे. ह्या कथा पौराणिक तसेच संत साहित्यातील असण्यावर त्यांनी भर दिला आहे.

३८) गीताभ्यासावर त्यांनी विशेष भर दिला आहे.

३९) कौमार्यावस्थेत अभिव्यक्ति क्षमतेवर त्यांनी भर दिला आहे.

४०) कौमार्यावस्थेत स्वनियंत्रण शिक्षणावर त्यांनी भर दिला आहे.

४१) तरुण वयात मुलांना उपनिषदे शिकविण्यावर त्यांनी भर दिला आहे.

४२) शिक्षणातून inner values of life व outer objective science ह्या दोन्ही दृष्टिकोनातून विकास त्यांना अभिप्रेत होता.

४३) शिक्षणविषयक योजना मांडत असतांना गुरुदेवांना प्रामुख्याने पुढील अवस्थांचा विचार केल्याचे आपणास लक्षात येते.

१) जन्मपूर्व अवस्था २) शिशु अवस्था ३) नर्सरी अवस्था ४) प्राथमिक अवस्था५) माध्यमिक अवस्था ६) उच्च माध्यमिक अवस्था ७) उच्च शिक्षण

ह्या प्रत्येक अवस्थेची वैशिष्ट्ये वर्णन करुन त्यांनी शिक्षण योजना मांडली आहे. त्यास अनुसरुन स्वामी चिन्मयानंद हे तत्वज्ञ शिक्षणतज्ज्ञ आहेत असे म्हटल्यास हरकत नाही.

४४) प.पू. गुरुदेवांच्या विचारामध्ये भारतीय तत्वज्ञान, विज्ञान यांचा सुरेख समन्वय आढळतो व त्या अनुषंगाने त्यांची शिक्षण योजनाही Knowledge Master व Wisdom Master घडविणारी योजना आहे, असे म्हणावे लागेल.

४५) शिक्षणातून व्यक्तिमत्वाच्या सुसंगतीवर त्यांनी भर दिला आहे.

४६) व्यक्तिमत्वात सुसंगती निर्माण होण्यासाठी head a heart ह्यांच्या विकासावर त्यांनी प्रामुख्याने भर दिला आहे. व त्याच्या माध्यमातून Integreted Person च्या निर्मितीवर त्यांनी भर दिला आहे.

४७) शिक्षण हे व्यक्तिमध्ये मुरले पाहिजे व कृतीतून अभिव्यक्त झाले पाहिजे.

४८) मनाचे पुनर्संस्करण म्हणजे शिक्षण अशी त्यांनी शिक्षणाची परिभाषा केली आहे.

४९) शिक्षणातून चारित्र्याच्या पुनर्बांधणीवर त्यांनी भर दिला आहे.

५०) Factual knowledge व Wandrous Theories वर त्यांचा आक्षेप आहे. ह्या शिकविण्यापेक्षा जीवनाची आदर्श बालकांना शिकविण्यावर त्याचा अधिक भर आहे.

५१) शिक्षण प्रणाली ही तात्विक सत्यावर व धार्मिक तत्वावर आधारीत असण्याबाबत त्यांचा कटाक्ष आपणास आढळतो. त्यायोगे त्यांनी धर्म आणि शिक्षण ह्यांचा सहसंबंध व्यक्त केला आहे.

५२) बालकांच्या अध्ययनात त्यांनी पालकाची आणि त्यातही मातेची भूमिका महत्वाची मानली आहे.

५३) मानवाच्या तीन समस्या शिक्षणातून सुटायला हव्यात ह्याबाबत त्यांनी भाष्य केले आहे.

1) How to meet the problem. 2) When it is solved then is it morally right or wrong. 3) Is it beautiful or ugly ह्या मूलभूत प्रश्नाच्या सोडवणूकीचे सामर्थ्य शिक्षणातून यायला हवे.

५४) सौंदर्यविषयक दृष्टिचे अध्यापन व संस्कार हे घाणीचे साम्राज्य दूर करु शकतात. ह्यासाठी कला आणि साहित्याचा अभ्यास महत्वाचा आहे.

५५) शिक्षणातून vision विकसित व्हायला हवे.

५६) श्रेष्ठ मानव्याची निर्मिती हे शिक्षणाचे महत्वाचे अंग आहे.

५७) Self cleansing ही प्रक्रिया शिक्षणाच्या माध्यमातून व्हायला हवी.

५८) शालेय व व्यावसायिक शिक्षण पूर्ण केल्यावर बाह्य जगात पाऊल टाकतांना विश्वाच्या रचनेत आपले स्थान काय आहे. हे व्यक्तिला कळण्याइतपत क्षमता शिक्षणातून व्यक्तिच्या अंगी विकसित व्हायला हवी.

५९) नवीन आव्हाने पेलायचे असतील तर शिक्षणातून Reintegration of personality ही बाब साध्य व्हायला हवी.

वरील सर्व बाबी ह्या शिक्षणाबाबतचा दृष्टिकोन व्यक्त करणाऱ्या आहेत.

**जीवनाचे ध्येय :-**

जीवनाच्या ध्येयाचे प्रतिबिंब हे शिक्षण विषयक विचारसरणीमध्ये पडते आणि म्हणूनच एखादा तत्वज्ञ हा जीवनाकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहतो ह्यावरुन त्याचे

शिक्षणविषयक जीवनाची ध्येय मांडली त्यात आधुनिक व प्राचीन दृष्टिकोन ह्यांचा समवय आपणास आढळतो. ही उद्दिष्ट्ये ध्येय सामान्यपणे पुढीलप्रमाणे आहेत.

१) विवेक शक्तीचा विकास घडवून आणणे.

२) योग्य कर्म करण्याची पात्रता निर्माण करणे.

३) आत्मसाक्षात्कार.

४) मानसिक शिस्त प्राप्त करणे.

५) वासनांना संस्कारीत करणे.

६) उच्चकोटीच्या कर्माची प्रेरणा निर्माण करणे.

७) विक्षेपांचा शेवट करणे.

८) शांतता व आनंद प्राप्त करणे.

९) दिव्यत्वाचा शोध घेणे.

१०) परिपूर्ण आनंदाची प्राप्ती करुन घेणे.

११) आत्मसंयमन मिळविणे.

१२) आत्मानुभव प्राप्त करणे.

१३) जीवनातील दु:खापासून निवृत्ती.

१४) ईश्वरी जीवन प्राप्त करणे.

१५) योग्य मार्गाची निवड करणे.

१६) व्यक्तिमत्वाचे पुनर्वसन.

१७) व्यक्तिमत्वाचा समतोल साधणे.

१८) पूर्णत्वाची योजना पूर्णत्वास नेणे.

१९) आत्म्याचे पुनर्शोधन.

२०) आध्यात्मिक विकास.

२१) आत्मप्रभुत्व प्राप्त करणे.

२२) मानवी जीवन उत्क्रांत करणे.

२३) प्रेम.

२४) शांती प्राप्त करणे.

२५) self cleansing

२६) जीवनाचे सातत्य जाणणे.

२७) समस्या निराकरणाची क्षमता विकसित करणे.

वरील ध्येया व्यतिरिक्त जीवन ध्येयाबाबत खालीलप्रमाणे त्यांची दृष्टि आपणास आढळते.

* केवळ भौतिक समृध्दी हे जीवनाचे ध्येय नाही तर ते साधन आहे.
* स्वत:ला जाणून घेणे हे जीवनाचे ध्येय आहे.
* जीवनाचे ध्येय हे परिपूर्ण सुख असलेच पाहिजे की जेथे सर्व संघर्ष संपुष्टात येऊन शांतता प्रस्थापित.
* To realised pure awareness
* To rediscovery of self
* To gain peace and joy
* Detachment from body mind and intellect
* Detachment from low values
* Detachment from ownership
* Self control
* Self critisism
* Self development
* Selfless work

* Self education
* Self effort
* Self improvement
* Self perfection
* Self recognition
* Rihabilitation of personality
* Remanagement of personality
* केवळ संपादन करणे आणि खर्च करणे व त्याचकरिता जीवन व्यतीत करणे हे जीवन ध्येय संकुचित आहे.
* बाह्य विषयवस्तुवर अवलंबून नसणाऱ्या प.पू. गुरुदेवांनी जीवनाचे संकुचित व व्यापक अशा दोन्ही ध्येयाबाबत विस्तृत मार्गदर्शन दिले आहे. व ह्याला अनुसरुन मानवाने संकुचित ध्येयाचा त्याग करायला हवा. व्यापक ध्येयाला आपलेसे करायला हवे. वरील ध्येयावरुन अर्थातच शिक्षणाची ध्येय आकाराला येतात ज्याचा उहापोह पुढे करण्यात आला आहे.

व्यक्तिमत्व विकास :-

व्यक्तिमत्व विकासाचा विचार गुरुदेवांनी आध्यात्मिक, मानसिक पातळीवरुन केला आहे. Spirutual, Physical structure हा सिध्दांत ही शिक्षणशास्त्राला फार मोठी देणगी आहे. व्यक्तिमत्व विकासाचा हा विचार अभ्यासक्रमाचे दोन आकृतीबंध प्रदान करतो.

१) विकासाचा आकृतीबंध, २) सहसंबंधाचा आकृतीबंध

ह्यावरुन व्यक्तिमत्वाच्या एकात्मिक विकासाची एक योजनाच आपणास आढळते व हा विषय शिक्षणातून साध्य व्हायचा असेल तर त्याबाबत एक दृष्टिपण लक्षात येते.

गुरुशिष्य संबंध :-

आज ज्या पध्दतीने शिक्षक विद्यार्थ्यांचे औपचारिक संबंध आहेत त्यावर गुरुदेवांनी आपल्या विवेचनात कडाडून हल्ला चढविला आहे. उथळ स्वभावाचा गुरु त्यांना मान्य नाही. 'तू पैसे दे मी शिकवितो', ही शिक्षकाची भावना त्यांना मानवत नाही. ते गुरुशिष्य संबंधाचा अत्यंत उदात्त दृष्टिकोनातून, आध्यात्मिक दृष्टिकोनातून विचार करतात. अध्यापनाकरता जसा शिक्षक हा क्षमतावान असावा लागतो. तसेच विद्यार्थी हा तसाच तयार असावा लागतो. ज्ञानाप्रती दोघांनाही तळमळ असणे ही बाब महत्वाची ठरते. आजच्या काळातील शिक्षक म्हणजे बोलके उपकरण आहे, अशी कडाडून टिका गुरुदेवांनी केली आहे. पण अध्यापनात हृदय प्रेम ओतल्यास हे अध्यापन निरस होणार नाही हा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे. आदर्श गुरु व आदर्श शिक्षक, आदर्श विद्यार्थी ह्यांचे निकष त्यांनी दिले आहे. त्यांनी विवेचीत केलेला गुरु हा शास्त्र संपन्न ज्ञानात पारंगत, ज्ञानाची तळमळ असणारा, शिष्याबाबत अपार प्रेम असणारा आणि सर्वात महत्वाचे म्हणजे विद्यार्थ्याचे अंतरंग जाणणारा त्याच्या शंकेचे निरसन करणारा आपल्या शिष्याला नेमके कशाची आवश्यकता आहे हे जाणणारा असा आहे. आपल्या शिष्याच्या पातळीपर्यंत जाऊन त्याचा हात हाती घेऊन आपल्या पातळीवर त्याला आणून ठेवणारा असा गुरु आहे. विद्यार्थ्यांमध्ये केवळ जीवन जगण्याचेच सामर्थ्य निर्माण करतो असे नाही तर दैनंदिन जीवनातील अनुभव घ्यायलाही ते समर्थ बनविणारा असा आहे. ऐवढे असूनही त्याला ह्या सर्व गुणधर्म बाबतचा अहंकार नाही. तो विद्यार्थ्याचा हिंतचिंतक आहे. तो भारतीय तत्वज्ञान, गीता, उपनिषद ह्यांचा अभ्यासक व प्रेमी आहे. तो केवळ आदर्शच नाही तर आपले संपूर्ण जीवन आध्यामिक जीवनात व्यतीत करणारा आहे. हा शिक्षक नियंत्रित व परिपूर्ण व्यक्तिमत्वाचा असा आहे. शांत अवस्था प्राप्त केलेला असा तो आहे. परिपूर्ण वर्तनाचा विशाल हृदयाचा असा गुरु त्यांना अपेक्षित आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे तो शाळा व समाज ह्यांना साधणारा सेतू आहे. पालक व विद्यार्थी ह्यातील तो दुवा आहे. तो Guide आहे. तो समायोजीत व्यक्तिमत्वाचा आहे. तो work load हे joy load मध्ये परिवर्तन करणारा आहे. अर्थात गुरु व शिक्षक ह्या दोन्ही संकल्पना त्यांनी मांडल्या. त्यांना Instructor ही शिक्षकाची भूमिका मान्य नाही. Facilitator, Guide, Philosopher, Friend ह्या सर्व शिक्षकांच्या

भूमिका त्यांनी मांडल्या व ह्या मांडत असतांना दोन बाबी त्यांच्या डोळ्यासमोर आहेत. त्या म्हणजे व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाचा एकात्मिक विकास, शाश्वत विकास आणि खऱ्या भारताची निर्मिती अशा भारताची निर्मिती ज्याला भारतीय मनाचा शिक्षक व गुरु त्यांना अभिप्रेत आहे. आज आधुनिक भारतात अगदी अशाच प्रकारच्या शिक्षकाची आवश्यकता आहे. जे शिक्षक Knowledge Master व Wisdom Master असेल. नवीन ज्ञानाची कास धरणारा असेल पण त्याचा आध्यात्मिक पाया हा मजबूत असेल ह्या विचारावरुन गुरुदेवांची शिक्षक घडविण्याची दृष्टि लक्षात येते व नकळत ह्या विचारावरुन एक शिक्षक प्रशिक्षणाचीही योजना आकाराला येते. ह्याचा उहापोह पुढे करण्यात आला आहे.

शिष्य :-

चांगल्या गुरु करिता जसे निकष महत्वाचे आहे तसेच चांगल्या विद्यार्थ्याबाबत त्यांनी दिलेले निकष हे अत्यंत महत्वपूर्ण ठरतात. कारण कोणतेही बी पेरायचे असेल तर तशी जमीनही सकस असायला लागते व ती तशी नसेल तर तीला सकस बनवावी लागते. ह्या दृष्टिकोनातून त्यांनी सांगितलेले हे निकष अत्यंत महत्वपूर्ण ठरतात. हे निकष पालकाकरिता सुध्दा अत्यंत मार्गदर्शक आहेत ह्याचे कारण म्हणजे पालक आपल्या पाल्यामध्ये ह्या गुणांचे संवर्धन करु शकतो. गुरुदेवांनी सांगितलेला शिष्य हा ज्ञानाबाबत प्रेम असणारा आहे, गुरुच्या प्रति शरणागती असणारा आहे, तो अतिशय नम्र आहे, आज्ञाधारक आहे. शिष्य हा गुरुप्रति पूर्ण शरणागत आहे. त्याची गुरुप्रति पूर्ण समर्पणाची भावना आहे. गुरुबाबत श्रध्दा, आदर, पूज्यभाव असणारा आहे. सर्वात महत्वाचे त्याचा गुरुसोबत संपूर्ण ताळमेळ जमला आहे. गुरुदेवांनी शिष्याच्या बाबतीत किमान अध्ययनशीलता हा शब्द वापरला आहे. किमान ग्रहणशील हा शब्द वापरला आहे. तो किमान अध्ययनशील व ग्रहणशील असणे ही बाब अनिवार्य आहे. शिवाय जे अध्ययन केले त्याचे जतन करण्याची पात्रता त्याच्या अंगी असण्याची आवश्यकता आहे. शिवाय ह्यासाठी तो प्रयत्नशील ही असावा. ते मननशील चिंतनशील असायला हवा. तो श्रवणशील असायला हवा. कारण गुरुंनी प्रकटलेल्या विचारातील सूक्ष्म विचाराचे आकलन करायला तो समर्थ हवा आपल्या गुरुशी समरस होणारा तो असावा. आपली स्वतंत्र प्रज्ञा विकसनाबाबत तो

जागृत हवा सेवाभाव त्याचा प्रबळ हवा ह्या सर्व गोष्टीचे विवेचनावरुन एक बाब सिध्द होते की शिष्यामध्ये आध्यात्मिक गुण विकसित असावे. वरील सर्व विवेचनावरुन आपणास शिक्षणातून नेमका कसा व्यक्ति घडवायचा आहे व त्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये कोणते गुण विकसित करावे ह्याबाबत एक परिपूर्ण योजना आपणास मिळते ह्याचा उहापोह पुढे करण्यात आला आहे.

गुरुशिष्य संबंध :-

आज शिक्षक व विद्यार्थी ह्याच्यातील नाते हे दुरावत जात आहेत. शिक्षकाला विद्यार्थ्याबद्दल वाटणारी भावना विद्यार्थ्याला आपल्या शिक्षकाबद्दल असणारी भावना ह्या सर्वांची पुनश्च पडताळणी व त्याच्या पुनश्च अर्थनिर्वचन करण्याची गरज आज पुनश्च निर्माण झाली आहे. आधुनिक संकल्पनेच्या संदर्भात विचार केल्यास Learning atmosphere ह्या दृष्टिकोनातून हे विवेचन महत्वपूर्ण ठरते. Healthy learning atmosphere साठी ह्या आंतरक्रिया अत्यंत महत्वाच्या ठरतात. शालेय आंतरक्रिया ह्या सुदृढ राखण्याच्या दृष्टिने ही बाब अत्यंत महत्वपूर्ण ठरते. भारतात गुरुशिष्याच्या नात्याची परंपरा ही अत्यंत प्राचीन परंपरा आहे. स्वत: गुरुदेव स्वामी चिन्मयानंद हे स्वामी तपोवनम् चे शिष्य होते व आपल्या गुरुनी दिलेला ज्ञानाचा वारसा त्यांनी समाजापर्यंत पोहोचवला आहे. भारतात शिष्य ओळखला जातो. तो गुरुमुळे वा गुरुश्रेष्ठ ठरतात ते तेवढ्याच समर्थ शिष्यामुळे ह्या परंपरेतील गुरुदेव हे स्वत: एक दुवा आहे. गुरुशिष्यामधील नाते हे अत्यंत अतुलनीय असते. प्रेम व जिव्हाळ्याचा महत्वाचा दुवा दोघांमध्ये असतो. शिष्याच्या मनाचा व बुध्दीचा विकास हे गुरुचे आपल्या शिष्याप्रती ध्येय असते. आपल्या शिष्याच्या सर्व प्रकारच्या अडचणी गुरु दूर करतो पण ह्या अडचणी शिष्य अत्यंत नि:शंक मनाने आपल्या गुरुबाबत बोलतो. आधुनिक काळातील शिक्षक विद्यार्थी ह्यांच्या औपचारिक रुक्ष संबंधावर त्यांनी कडाडून हल्ला केला आहे. गुरुशिष्य संबंधात त्यांनी जो भर दिला आहे. तो गुरुच्या प्रभावी अध्यापनावर व शिष्याच्या प्रभावी अध्ययनावर शिक्षक व विद्यार्थी ह्याचे नाते माळी व फुलासारखे त्यांनी मानले आहे. आजवर हा सहसंबंध माळी व रोपटे असा मानण्यात आला आहे. पण गुरुदेवांचा हा विचार अत्यंत व्यापक व सखोल आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे शिक्षक व विद्यार्थ्यांचे सुसंवादीय हे महत्वाचे आहे. जे आज आपणास

आढळत नाही. अनुभवाच्या स्तरावर गुरुशिष्याचे ऐक्य महत्वाचे ठरते. अध्ययन अध्यापनाबाबत ह्या दोघांमध्ये सहभावना सहवेदना असणे आवश्यक आहे. अर्थात गुरुशिष्य संबंध हे अत्यंत आदर्श स्वरुपाचे वर्णन करण्यात आले आहे. ह्या विवेचनावरुन शालेय आंतरक्रियेबाबत आपणास अनेक मुद्दे प्राप्त होतात. त्याचा उहापोह गुरुदेवांच्या शिक्षण दृष्टित करण्यात आला आहे.

अध्ययन अध्यापन पध्दती :-

ह्यापूर्वीच म्हटल्याप्रमाणे गुरुदेव हे अध्यात्मवादाचे पुरस्कर्ते आहेत. त्याच्या अध्ययन अध्यापन पध्दतीच्या विवेचनात वेदांतिक अभ्यासाच पध्दतीचा उहापोह झाला आहे. वास्तविक ह्या पध्दती जरी वेदांत अभ्यासाच्या पध्दती असल्या तरी ह्याचा अवलंब आजही शिक्षणात होतो आहे. त्यात नवनवीन संशोधने होत आहे. गुरुदेवांचे योगदान म्हणजे अध्ययन पूर्ण तयारीचे त्यांनी केलेले विवेचन. आज ज्याला शिक्षणशास्त्रात सज्जता प्रवर्तन म्हणण्यात येते. ह्यावर त्याचा भर आहे. मन आणि बुध्दीच्या एकीकरणाशी ही बाब निगडीत आहे. ह्या व्यतिरिक्त गुरुदेवांनी सांगितलेल्या व आज ज्याचा वापर शिक्षणात होतो अशापध्दती म्हणजे तुलना पध्दत कार्यकारण पध्दत ह्या पध्दतीचा वापर आज शिक्षणशास्त्रात होतो. आत्मनिरीक्षण पध्दती ही शास्त्रीय पध्दती आहे व जिचे विवेचन आपणास शैक्षणिक मानसशास्त्रात आढळते पण तिचा उपयोग शिक्षणात होत नाही. आधुनिक काळात भौतिकतेचा स्फोट झाला आहे. तेथे आणखी एक महत्वाची पध्दती म्हणजे वासनाक्षय पध्दती. ह्या दोन व्यक्तिगत अध्ययन पध्दती आहेत. शिवाय बौध्दिक अन्वेषण पध्दती ही संशोधनाची नावीन्यपूर्ण पध्दतीही सांगितली आहे. ह्या पध्दतीचा वापर आपणास उच्चस्तरीय शिक्षणात करता येऊ शकेल. ह्या पध्दतीचा शास्त्रशुध्द विचार गुरुदेवांनी मांडला आहे. ह्याचा विचार पुढे करण्यात आला आहे.

शिस्त आणि स्वातंत्र्य :-

स्वत: गुरुदेव हे शिस्तीचे अतिशय भोक्ते होते. जो शिस्त पाळतो तोच खरा शिष्य असतो. अशी उत्तम शिष्याची परिभाषाही त्यांनी केली आहे. त्यांचा भर हा बाहेरुन लादलेल्या शिस्तीवर नाही तर अंतर्गत शिस्तीवर त्याचा भर आहे. स्वातंत्र्याला सुध्दा शिस्तीमुळेच अर्थ प्राप्त होतो. आत्मसंयम व स्वयंशिस्तजन्य स्वातंत्र्यावर त्यांनी भर दिला आहे. व्यक्तिगत

विकासाकरिता स्वातंत्र्य आवश्यक आहेच पण त्याच सोबत आत्मसंयम ज्याचा पक्का निर्णय बुध्दीच्या स्तरावर झाला आहे ते ही आवश्यक आहे. परावलंबीत्वापासून स्वत:ला सोडवून घेणे म्हणजे स्वातंत्र्य ही संकल्पना म्हणजे आधुनिक शिक्षणशास्त्रात गुरुदेवांनी टाकलेली महत्वाची भर आहे. त्रीस्तरीय शिस्त संकल्पना जी प्राचीन शिक्षणपध्दतीत सत्य, अहिंसा व ब्रह्मचर्य ह्या रुपात होती ह्या संकल्पनेच्या आचरणावर प्राधान्य देतात. शारीरिक, मानसिक आणि बौध्दिक स्तरावरील ही शिस्तीची संकल्पना आधुनिक काळात अत्यंत महत्वपूर्ण वाटते.

राष्ट्र संस्कृती :-

"राष्ट्र" हा त्यांच्या संपूर्ण कार्याचा आत्मा आहे. गुरुदेवांनी देश व राष्ट्र ही संकल्पना ह्यातील सूक्ष्मसा भेद ही फार महत्वाचे योगदान आहे. भारत हा केवळ देश नाही तर राष्ट्र आहे ही भावना प्रत्येक व्यक्तिच्या मनात रुजणे ही काळाची गरज आहे. स्वामी चिन्मयानंद हे प्रखर राष्ट्रभक्त होते. ही बाब केवळ त्यांच्या विवेचनावरुन सिध्द होते असे नाही तर त्यांच्या जीवन कार्यातून ती प्रतिबिंबीत होते. स्वार्थीवृत्तीचे माणसे ही राष्ट्र घडवू शकत नाही. ह्यासाठी नि:स्वार्थ व देशांवर नितांत प्रेम करणाऱ्या व्यक्तिची आवश्यकता असते आणि म्हणूनच व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाच्या पोतावर राष्ट्राचे सामर्थ्य अवलंबून असते. राष्ट्राच्या घट्ट बांधणीकरीता त्याग, चारित्र्य, सेवावृत्ती हे धागे आवश्यक आहे. ह्या सर्व भावना धर्म माणसाला शिकवितो आणि म्हणून धर्माचा अभ्यास व धर्माचे आचरण ही बाब त्यांच्या दृष्टिने महत्वाची ठरते. राष्ट्र व धर्म ह्यांचा अन्योन्य संबंध ते मानतात. नागरिक हा राष्ट्राचा अनिवार्य घटक आहे. आणि म्हणूनच व्यक्तिचा विकास हा राष्ट्रविकासाचा पहिला टप्पा आहे. व्यक्ति ही जोवर स्वत:ला भारतीय समजत नाही तोवर तो देशाच्या विकासात हातभारही लावू शकत नाही. स्वत:ला भारतीय आहोत कां? हा निकष लावण्यासाठी त्यांनी प्रश्नावली सुध्दा विकसित केली. ज्याचा विचार व आचरण प्रत्येक भारतीयाने करायला हवे. भारताचे गतवैभव प्राप्त करुन देण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे आणि म्हणून राष्ट्राचा नागरिक म्हणून प्रत्येक व्यक्ति प्रशिक्षित व्हावा हे व्हिजन आपणाला त्याच्या विवेचनावरुन आढळते पण आजच्या तरुण

मुलांमध्ये राष्ट्रभक्ती आढळत नाही ही खंत त्यांना वाटते व ती त्यांनी अनेक ठिकाणी व्यक्त पण केली आहे व ह्याकरिता त्यांनी आजची शिक्षणप्रणालीला दोष दिला आहे. भारत हे शिक्षणाचे स्फूर्तीस्थान बनला नाही हे वास्तव व त्याबाबतचा खेदही त्यांनी व्यक्त केला आहे. हे कार्य शिक्षणातून घडायचे असेल तर तसे व्यक्तिमत्व हे घडायला हवे. म्हणजेच राष्ट्रप्रेम हे शिक्षणाचे ध्येय बनावे. ही दृष्टि त्याची आपणास आढळते. व्यक्तिमवाची पुनर्बांधणी ही ती दृष्टि आहे. मानव हा दुर्लक्षित व्हायला नको. मानवी मन हे दुर्लक्षित व्हायला नको. दुर्लक्षित मन हे गुन्हेगारीकडे वळते आणि अशी मने दुर्लक्षित झाल्यामुळेच आज समाजात गुन्हेगारी वृत्ती वाढली आहे. ह्याचा विचार शिक्षणशास्त्राने करण्याबाबत त्यांनी स्पष्टपणे सुचविले आहे. भारताच्या अधोगतीचे कारण जर Deintegration आहे तर हे कारण दूर करायला हवे व ते शिक्षणातून दूर होईल हा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात राष्ट्राचा विकास त्यांनी केलेली टिका ह्यातून त्यातून त्यांची बालकेंद्री शिक्षणाबाबत जी दृष्टि आढळते त्याचा विचार पुढे करण्यात आला आहे. राष्ट्रीय भावना निर्मितीमध्ये महात्म्यांचा सहभाग त्यांना अत्यंत महत्वाचा वाटतो. आदर्श महात्मा हा राष्ट्राचा कायापालट घडवून आणू शकतो. आपल्या आजूबाजूला आदर्शांची निर्मिती तो करु शकतो. भारतीय संस्कृतीवर त्यांचे नितांत प्रेम होते. भारतीय संस्कृती ही वैश्विक आहे. ती त्यांनी अखिल विश्वात पोहोचविली. राष्ट्र उभारणीत युवकांचे योगदान ते अत्यंत महत्वाचे मानतात. India as a whole हा त्यांच्या दृष्टिकोन आजच्या काळात अत्यंत महत्वाचा आहे. आज देशाची परिस्थिती बघता हा विचार अत्यंत महत्वपूर्ण वाटतो.

भारतीय संस्कृतीबाबत त्यांच्या मनात नितांत आदर होता. भारतीय संकृती ही कर्तव्य ह्या संकल्पनेवर आधारीत आहे. ती हक्क ह्या भावनेवर आधारीत आहे. ह्या ठिकाणी मानवी हक्कापेक्षा मानवी कर्तव्याची भावना ही महत्वाची आहे. ही दृष्टि मानव अधिकार संकल्पनेला वेगळा आयाम देणारी अशी संकल्पना आहे. भारतीय संस्कृतीच्या आध्यात्मिकतेबद्दल त्यांनी गौरवोद्गार काढले आहेत. संस्कृतीचा दर्जा हा जीवनमूल्यांच्या आचरणावर अवलंबून असतो असे त्यांचे स्पष्ट मत आहे.

धर्म संकल्पना :-

धर्माबाबत जो विचार गुरुदेवांनी केला तो आजपर्यंतही कुणी केला नाही. धर्म ही संकल्पना हिंदु-मुस्लिम अशा चौकटीत बसणारी मान्य नव्हती. तर धर्म म्हणजे Law of being असे ते मानतात. व्यक्तिमत्व विकासाचा विचारही त्यांनी धर्म संकल्पनेशी जोडला आहे व आपल्या व्यक्तिमत्वाचे खरे रुप माहित होण्याकरिता त्याला धर्मसंकल्पना माहित असणेही आवश्यक आहे. मानवातील निम्न व्यक्तिमत्व जेव्हा उच्च व्यक्तिमत्वाच्या अधिपत्याखाली यायला तयार असते. तेव्हाच मानवाच्या व्यक्तिमत्वाचा विकास होण्याची शक्यता असते. चर्च, देवळे, मशिदी ह्यात रममाण होणारा धर्म त्यांना मान्य नाही. हे विचार तथाकथीत धर्मवादी लोकांच्या कर्मठ विचारावर एकप्रकारे आघातच आहे. आणि आज अशा आघातांची नितांत आवश्यकता आहे. कारण आज कमालीची धर्मविद्वेष समाजात बोकाळला आहे.

प.पू. गुरुदेव हे हिंदुत्ववादी आहेत पण त्यांचे हिंदुत्व हे एका विशिष्ट धर्माशी निगडीत नाही तर त्यांची हिंदुत्वाची संकल्पना गुण कल्पनेशी निगडीत आहे आणि म्हणूनच हिंदुत्व म्हणजे ऋषीत्व असे ते म्हणतात. ह्या अर्थानेच हिंदुत्वात अनेक धर्म आहेत, असे विधान त्यांनी केले आहे. ह अनेक धर्म म्हणजे पृथ्वीच्या पाठीवर जेवढे धर्म आहेत त्या हिंदुत्वाच्या विचार धारा आहे कारण त्यांचे उगमस्थान ऋषी आहे. ही भावना ठेवल्यास समाजात धर्माच्या नावावर विघटन होणार नाही खरा हिंदुधर्म हा सनातन आहे, असे त्यांचे मत आहे. विज्ञान तत्वज्ञान व धर्म ह्यांचा समन्वय हा महत्वाचा आहे.

हिंदु धर्माची पडझड ही त्यांना अत्यंत वेदनादायी होती. वर्णव्यवस्थेचा चुकीचा आशय समाजाने स्विकारणे हे हिंदुधर्माच्या पडझडीचे महत्वाचे कारण आहे. म्हणूनच आज वर्णव्यवस्था, जात ह्या संकल्पनांचा नव्याने आशय समाजापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. वैदिक परंपरेचा आशय हा समाजातपर्यंत पोहोचायला हवा. अनेक गैरसमजुती हिंदू धर्मात घुसल्यामुळे हिंदु धर्माचे अध:पतन होत आहे. हा महत्वाचा विचार त्यांनी मांडला. आधुनिक काळात धर्माबद्दल लवचिक दृष्टिकोन आवश्यक आहे. युगानुकुल मूल्याशय हा मानवाला स्विकारावा लागेल व ह्याचे आचरण करावे लागेल.

नवनवीन कल्पना :-

प.पू. गुरुदेवांनी अनेक नवीन संकल्पना शिक्षणशास्त्राला दिल्या आहेत त्यात पुढील संकल्पना महत्वाच्या आहेत.

**१) बुध्दीयोग :-**

आजचे युग हे बुध्दीमत्तेचे युग आहे. आज मानव आपल्या बुध्दीच्या जोरावर अखिल जगतावर राज्य करण्याचे स्वप्न पहात आहे. भारतीय तत्वज्ञानाने ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तीयोग ह्या संकल्पना दिल्या आहे. प.पू. गुरुदेव हे आधुनिक काळातील ऋषी आहे. त्यांनी मानवाला बुध्दीयोग शिकविला आहे. आज भौतिक युगात मानव चंचल झाला आहे आणि ह्या चंचलतेचा ह्या अवस्थेमध्ये आपल्या निर्णयाला बुध्दीत स्थिर करणे आवश्यक आहे. ह्या आशयाचा बुध्दीयोग म्हणजे फार मोठे योगदान आहे.

२) **Economics of thoughts :-**

विचाराचे अर्थशास्त्र हे मागणी व पुरवठ्याच्याच नियमाशी निगडीत आहे. व्यक्तिची मानसिकता सुदृढ ठेवण्यासाठी ह्या विचारांची आज नितांत आवश्यकता आहे. माणसाला आवश्यक बाबींवर विचार करण्याची सवय लागणे ही बाब अत्यंत महत्वाची असते.

**३) हिंदु समाजवाद :-**

हे विश्वची माझे घर ह्या विचारांशी निगडीत असणारा हिंदु समाजवाद हा अखिल विश्वमनात सहअस्तित्वाची भावना वाढीस लावण्याकरिता महत्वपूर्ण ठरतो. गुरुदेवांनी इतर ज्या नावीन्यपूर्ण संकल्पना मांडल्या त्या पुढीलप्रमाणे आहेत.

१) अध्यात्मवादी वास्तववाद

२) जन्मसिध्द मानवी हक्क व अधिकार

३) वैश्विक नागरिकत्व

४) अध्यात्मवादी समाजवाद

५) अध्यात्मिक कार्यवाद

६) मानवी बौध्दिक उत्क्रांतीचे टप्पे

७) जन्मपूर्व शिक्षण

८) Cultural revival plan

९) सहअस्तित्व

१०) उद्योजकतेचे अध्यात्मिक अधिष्ठान

वरील संकल्पना ह्या नावीन्यपूर्ण असल्या तरी त्याचा उपयोग जर शिक्षण विषयक विचारात व कार्यप्रणालीत केला गेला तर एक निश्चितच आदर्श शिक्षण योजना निर्माण होऊ शकेल. ह्या सर्वांचा उल्लेख शिक्षणयोजनेत करण्यात आला आहे.

मन आणि मानसशास्त्र :-

मन हा अध्ययनाच्या क्षेत्रातील अत्यंत महत्वाचा घटक आहे. मानवाच्या व्यक्तिमत्व विकासात मानवी मनाचे जे स्थान आहे त्यावरुन गुरुदेवांनी मांडलेले मानसशास्त्र म्हणजे शिक्षणशास्त्राला खूप मोठी देणगी आहे. आंतरिक मन व बाह्यमन ह्यांच्या सुसंवादातच व्यक्तिचा व्यक्तिमत्व विकास दडलेला आहे. ह्या दोन्ही मनाला योग्य प्रशिक्षित करणे ही गरज आहे. स्थीर झालेले मन हे बुध्दीमध्ये परिवर्तीत होते. म्हणजे बुध्दी हा मनाचाच विषय आहे. हा सिध्दांत प्रस्थापित करुन मनाचे प्राधान्यत्व सांगितलेले आहे. मन आणि बुध्दी ह्यांच्यात समन्वय निर्माण करणे म्हणजे शिक्षण ही सखोल परिभाषा त्यांनी शिक्षण क्षेत्राला दिली आहे. एकमेकांमध्ये सुसंवाद करण्याची पात्रता मन आणि बुध्दीत निर्माण व्हायला हवी ही क्षमता शिक्षणाच्या माध्यमातून निर्माण व्हायला हवी व ह्यासाठी मन आणि बुध्दी ह्याचे सुसंस्कार अत्यंत महत्वपूर्ण ठरतात. विशेषत: जीवनातील आव्हानात्मक क्षणी शरीर मन बुध्दी ह्यांच्यात समन्वय असेल तर व्यक्ति आव्हानाचा विचार सकारात्मकतेने करु शकतो. मन आणि आत्मा यातील फरकही त्यांनी आपल्या विवेचनात व्यक्त केला आहे. पण ह्यासाठी मानवाला मनाची संकल्पना माहित असणे आवश्यक आहे. मनाचे संस्कारण हा व्यक्तिमत्व विकासातील महत्वाचा टप्पा आहे,

असे ते मानतात. मनाची दु:खद अवस्था हे मानवाच्या अपयशाचे प्रमुख कारण ते मानतात. मानवी व्यक्तिमत्वाच्या पुनर्वसनात मनाचे स्थान ते अतिशय महत्वाचे मानतात. शिक्षणाचे एक महत्वाचे उपकरण म्हणून मनाबाबतचे प.पू. गुरुदेवांनी केलेले विवेचन हे अत्यंत महत्वाचे आहे.

विज्ञान :-

आधुनिक विज्ञानाबाबत त्यांचा दृष्टिकोन हा अत्यंत सकारात्मक आहे. पण विज्ञान हे मर्यादित आहे. हा वास्तव दृष्टिकोन मात्र त्यांनी वारंवार व्यक्त केला आहे. कोणत्या ना कोणत्या घटकाचे ज्ञान विज्ञानामध्ये अंतर्भूत असते पण त्या घटकाचे अस्तित्वाला ह्याची बाधा नाही. कारण वस्तुचे ज्ञान होण्यापूर्वी ते अस्तित्वात होते ते जाणले गेले आणि म्हणूनच विज्ञानाला मर्यादा आहेत. विज्ञान आणि तत्वज्ञानाबाबत त्यांनी समन्वयात्मक दृष्टिकोन त्यांनी मांडला आहे. शिवाय विज्ञान व तत्वज्ञानामधील मूलभूत अन्वेषण पध्दतीतील फरक त्यांनी विषद केला. आज तत्वज्ञान व विज्ञान ह्यांचा परस्पर सहसंबंध हा अनेक शास्त्रज्ञ प्रायोगिक स्तरावर पडताळून पहात असतांना प.पू. गुरुदेवांचे हे विवेचन अत्यंत महत्वाचे ठरते. आधुनिक जगताचे वर्णन त्यांनी Brave New World ह्या शब्दात केले आहे. विज्ञान व तत्वज्ञान ह्यातील जी मर्यादा त्यांनी व्यक्त करीत असतांनाच विज्ञानाला तत्वज्ञानाचे अधिष्ठान आहे. पण ते अधिष्ठानाकडे दुर्लक्ष होत आहे. विज्ञानाचा पाया सुटला आहे व विज्ञानाची झेप सुरु आहे. ही वास्तविकताही त्यांनी लक्षात आणून दिली व ह्यातून त्यांचा विज्ञान विषयक अभ्यासाचाही दृष्टिकोन दिसतो. जो शिक्षणदृष्टिमध्ये स्पष्ट केला आहे.

तत्वमिमांसा :-

तत्वमिमांसेत परमसत्य, सत्त्व, परमतत्व ह्याचे विस्तृत वर्णन केलेले असते. कारण ह्याच्या शोधातूनच तत्वज्ञानाची निर्मिती झाली असते व ह्या शोधातूनच तत्वज्ञानाचाही उगम झाला असतो. ही तत्वमिमांसा करित असतांना गुरुदेवांचा अद्वैतवादी दृष्टिकोन आढळतो कारण प.पू. गुरुदेव हे वेदांत, उपनिषदाचे, गीतेचे अभ्यासक आहेत. केवळ अभ्यासकच आहेत असे नाही तर उपनिषदिक तत्वज्ञान भारतीय हिंदु तत्वज्ञान ही त्यांची जीवन दृष्टि आहे आणि

म्हणूनच शंकराचार्यांच्या अद्वैतवादात जी तत्वमिमांसा व्यक्त केली आहे त्याचा पुनरुच्चार प.पू. गुरुदेवांनी केला आहे.

ज्ञानमिमांसा :-

ज्ञानाचे शास्त्रशुध्द विवेचन म्हणजे ज्ञान मिमांसा होय. प.पू. गुरुदेवांनी आत्मतत्वाचा पुनर्शोध म्हणजे ''ज्ञान'' ही ज्ञानाची संकल्पना मांडली. जी शंकराचार्यांच्या अद्वैतवादातील ज्ञान संकल्पनेशी निगडीतआहे. अनुभव म्हणजे ज्ञान ही संकल्पना त्यांनी मांडली. अर्थात त्यामुळे माहिती व ज्ञान ह्यातील सुक्ष्मसा फरक आपल्या लक्षात येतो. केवळ माहिती म्हणजे ज्ञान नाही तर अनुभूती आवश्यक आहे. ही आनुषंगिक बाब त्यात अंतर्भूत आहे. केवळ ज्ञान प्रक्रियेत सर्वात महत्वाचा असणारा घटक म्हणजे मन होय. ज्ञानाची पराकाष्ठा आत्मज्ञानात आहे असे ते मानतात. ज्ञानाचा उगम, ज्ञानाचे प्रकार अद्वैतवादाप्रमाणेच त्यांनी मानले आहे. ज्ञान ग्रहणाची मानसशास्त्रीय प्रक्रिया त्यांनी आपल्या विवेचनात व्यक्त केली अहो. शिवाय ज्ञान हे ज्ञानाच्याच स्तरावर रहायला नको तर त्याचे रुपांतर wisdom मध्ये व्हायला हवे. हा मोलाचा विचार त्यांनी मांडला. Knowledge conservation ही नावीन्यपूर्ण संकल्पना त्यांनी मांडली आहे.

पर्यावरण :-

आधुनिक युगात Global Worming चा धोका जगाला निर्माण झाला आहे. त्याला अनुसरुन त्याचे पर्यावरणीय विचारातून पर्यावरण शिक्षणाबाबतची दृष्टि आपणास मिळते. मानव निसर्गाला अशुध्द बनवितो हे अशुध्द करणे थांबविले तर निश्चितपणे पर्यावरणाचा धोका उद्‌भवणार नाही. हा बचावात्मक पवित्रा त्यांनी आपल्या विवेचनात मांडला आहे. औद्योगिकरणातून पर्यावरणाचा धोका निर्माण झाला ह्या निर्णयाप्रत ते केव्हाच आले होते. शिवाय औद्योगिकीकरणाबबत निर्माण झालेली स्पर्धा हेही पर्यावरण ऱ्हासाला कारणीभूत आहे. निसर्ग सतत मानवाला देत असतो. मानवही त्याचा स्विकार करतो पण तो पर्यावरणाला मात्र काहीच देत नाही. मानवाची पर्यावरणाप्रती ही भावना विकसित व्हायला हवी. हा दृष्टिकोन त्यांनी मांडला आहे. पर्यावरण ऱ्हासाकरिता जीवन मूल्यांचा ऱ्हास हे ही एक कारण आहे हा ही

महत्वपूर्ण मुद्दा त्यांनी आपल्या विवेचनात मांडला आहे. म्हणजेच पर्यावरण संरक्षणाचा विचार तेव्हाच सार्थ ठरेल. जेव्हा मानवी मूल्याचे संरक्षण होईल. पर्यावरण शिक्षणाला कलाटणी देणारा एक अत्यंत महत्वाचा मुद्दा आपणास त्यांच्या विवेचनात आढळतो आणि तो म्हणजे मानव परिवर्तनाचा. पर्यावरणाबाबतचा त्यांचा हा आध्यात्मिक दृष्टिकोन आहे व ह्या दृष्टिकोनाने पर्यावरण शिक्षणाची दिशाच बदलेल. पर्यावरण शिक्षणातून सहअस्तित्वाचे मूल्य संस्कार हा अत्यंत महत्वाचा मुद्दा म्हणजे पर्यावरणाचे आध्यात्मिक अधिष्ठान आहे. निसर्गाच्या कार्यात आज अनेक बाबतीत मानव ढवळाढवळ करतो. अनेक वैज्ञानिक शोधाने निसर्गावर मात करण्याचा प्रयत्न झाला आहे. पण जेवढा हा प्रयत्न यशस्वी झाला तेवढाच मानवतेला धोकाही निर्माण झाला आणि म्हणून ही ढवळाढवळ मानवाने थांबवावी हा इशारा त्यांनी केव्हाच दिला आहे. अन्यथा मानवजात संपुष्टात येईल. मानवाची Endless Greed हे मानवाच्या विनाशाला कारणीभूत ठरेल.

बालकाप्रती दृष्टिकोन :-

गुरुदेवांच्या विवेचनात बालकाबाबत भाष्य आपणास आढळते. बालक हा त्यांच्या कार्याचा गाभा आहे. आणि म्हणूनच लहानपणापासून नव्हे तर जन्मपूर्व अवस्थे पासूनच बालकांवर संस्कार होणे त्यांना गरजेचे वाटते आणि म्हणून त्यांनी चिन्मयमिशनच्या माध्यमातून अनेक बाल विहार (बाल संस्कार केंद्र) सुरु केले. आज केवळ भारतातच नाही तर जगात अनेक ठिकाणी हे बाल विहार सुरु आहे. अनेक बालके ह्याचा फायदा होत आहेत व आपल्या जीवनाचा पाया बळकट करीत आहे. बालकांप्रती असणारा त्यांचा दृष्टिकोन म्हणजे बालकेंद्री शिक्षणाची दृष्टि प्रदान करतो. Our Children Our Future हा त्यांच्या बालकेंद्री विचारांचा पाया आहे व Catch them young ही त्यांची कृती आहे. आजची पिढी ही अतिशय हुशार आहे. ह्याची जाणीव त्यांना आहे व ती त्यांनी जगालाही करुन दिली आहे. आज जगात जी कुरुपता व विकृतता दिसते आहे. त्यावर त्यांनी आक्षेप घेऊन ह्याविरुध्द जाऊन एक वेगळी शिक्षणपध्दती आपण घडवायला हवी. असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला आहे. बालकेंद्री शिक्षणाप्रती जे ध्येय त्यांचे आहे ते प्रामुख्याने पुढील प्रमाणे -

१) सुंदर मनाची निर्मिती करणे.

२) नव्या जगाशी समायोजन साधण्यासाठी पात्रता निर्माण करणे.

३) बालकांच्या व्यक्तिमत्वाला आकार देणे.

४) बालकांमध्ये निर्णय क्षमता निर्माण करणे.

५) राष्ट्रप्रेम संस्कृतीप्रेम निर्माण करणे.

६) सुसंस्कार.

७) मुलांना विचारी बनविणे.

८) वर्तमान युगाशी लढा देण्याची वैशिष्ट्ये निर्माण करणे.

९) सभोवतालच्या जगाशी संघर्ष करण्याची पात्रता त्यांच्यात निर्माण करणे.

१०) निसर्गदत्त देणगीचा योग्य उपयोग करण्याची पात्रता त्यांच्यात निर्माण करणे.

११) जीवन मूल्यांचे संस्कार करणे.

१२) नवीन पध्दतीने विचार करण्याची पात्रता विकसित करणे.

१३) आदर्शाचे दिग्दर्शन क्षमता विकसित करणे.

१४) भविष्यकालीन जगाचे नेतृत्व करण्याची क्षमता निर्माण करणे.

१५) जीवनाचे प्रशिक्षण देणे (जीवन जगण्याचे प्रशिक्षण)

१६) वयोगटानुसार शिक्षण देणे.

१७) शालेय वातावरण व घरातील वातावरण ह्यात सुसंवाद व समन्वय ठेवणे.

१८) सांस्कृतिक आंतरक्रिया विकसित करणे.

१९) वर्तमान सुंदर बनविण्याची क्षमता निर्माण करणे.

२०) मूल्यांचा आदरभाव शिकविणे.

२१) सुंदर स्वभाव निर्मितीवर भर देणे.

२२) उच्च आदर्शाबाबत आदर्शाची भावना निर्माण करणे.

२३) योग्य दिशेने चिंतन करण्याची पात्रता निर्माण करणे.

२४) सदाचाराचे शिक्षण देणे.

२५) नागरिकत्वाचे संस्कार करणे.

२६) बालकांची शारीरिक क्षमता विकसित करणे.

हे सर्व साध्य करण्यासाठी त्यांनी पालक शिक्षण, माता शिक्षण व शिक्षकांचे सांस्कृतिक प्रशिक्षणावर भर दिला आहे. शिवाय Informal Spiritual Education ची योजनाही आपल्या बाल विहार उपक्रमातून दिली आहे. आईच्या आदर्शत्वावर त्यांचा विशेष भर होता. शालेय वातावरण, सामाजिक वातावरण, कौटुंबिक वातावरण ह्याच्यात सुसंवादाची आवश्यकताही त्यांनी विषद केली आहे. ह्याचा उहापोह शिक्षणाप्रती दृष्टि ह्यात विशेषत्वाने करण्यात आला आहे.

युवकांप्रति प्रति दृष्टिकोन :-

बालके व युवक हा त्यांच्या कार्याचा प्राण आहे. Catch them young हा त्यांचा दृष्टिकोन आहे, कृती आहे. हे ह्यापूर्वीही विषद केलेलेच आहे. युवकांना Root व Wing दोन्ही प्रदान करण्याची त्यांची भूमिका ही युवाकेंद्राच्या स्थापनेस कारणीभूत ठरली अर्थात Root of culture व Wings of beauty हे त्यांना युवकांना प्रत्यक्ष करावयाचे होते व ह्यावरच त्यांच्या कार्याची खोली व उंची आपल्या लक्षात येते. युवकांच्या व्यक्तिमत्व विकसनाचा जो दृष्टिकोन त्यांनी मांडला त्यावरून त्यांना राष्ट्रोन्नतीकरिता अभ्यासू, आकलनक्षमता चांगली आणि भारतीय संस्कृतीबाबत प्रेम असणारा युवक त्यांना अभिप्रेत आहे. राष्ट्राच्या पुनर्बांधणीसाठी युवकांना घडवायला हवे व त्यासाठी त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एकात्म विकास व्हावा असे त्यांचे मत होते. युवकांच्या ज्या क्षमता विकसित करणे त्यांना अभिप्रेत होते. पुढील प्रमाणे त्यावरुन युवा शिक्षणाबाबतचा त्यांचा दृष्टिकोन आपल्या लक्षात येतो.

Integreted Youth व Dynamic Spiritual Youth ह्या संकल्पना म्हणजे त्यांनी दिलेली फार मोठी देणगी आहे. आज देशाला याचीच प्रकर्षाने गरज आहे. शिक्षणाच्या माध्यमातून युवकांचे वरील प्रकारचे नेतृत्व त्यांना अपेक्षित आहे. नेतृत्वाचे गुण सुध्दा त्यांनी

सांगितले आहे. explosive expression, personal magnatism व dynamism हे सर्व करतांना धर्मग्रंथाची आवश्यकता गीता तत्वज्ञानाची आवश्यकताही त्यांनी व्यक्त केली आहे.

युवकांच्या प्रति शिक्षणाचे जे ध्येयाबाबत दृष्टि आहे ती आपणास पुढीलप्रमाणे-

१) सुप्त शक्तीची ओळख.

२) व्यक्तिमत्वाचा समन्वयात्मक विकास (Integreted Youth)

३) युवकांचे आध्यात्मिक जागरण व त्याचे कृतीत रुपांतर करणे. (dynamic spirituality) निर्माण करणे.

४) योग्य नेतृत्व निर्माण होणे.

५) Cultural Revival करणे.

६) Excellence in knwoedge and perfection in inter action ह्या दोन बाबी घडवून आणणे.

७) Spiritual Army तयार करणे.

८) मूल्यसंस्कार घडवून आणणे.

९) कार्यनितीचे संस्कार करणे.

१०) उज्वल भवितव्याची निर्मिती करणे.

११) सामाजिक व सांस्कृतिक विकास.

१२) इतरांसाठी सृजनशील कार्य करण्याची प्रेरणा निर्माण करणे.

१३) self funded कार्याची प्रेरणा निर्माण करणे.

१४) राष्ट्रभक्त तयार करणे.

१५) संस्कृतीचे शिक्षण देणे.

१६) निर्णय व क्षमता यांचे नियोजन करण्याची पात्रता निर्माण करणे.

१७) नवनवीन विचारांना आकार देणे.

१८) स्वत:ला Judge करण्याची पात्रता निर्माण करणे.

१९) ज्ञानप्राप्ती.

२०) युक्त पुरुष निर्माण करणे.

२१) आत्म चिंतनाची सवय लावणे.

२२) निष्ठा निर्माण करणे.

२३) नियोजनाची निष्ठापूर्वक अंमलबजावणी करण्याची पात्रता निर्माण करणे.

२४) आदर्श निश्चित करणे.

२५) Heart and Head चा विकास करणे.

२६) जीवन निष्ठा निर्माण करणे.

२७) संस्कृती संरक्षणाची भावना निर्माण करणे.

२८) समस्या सोडविण्याचे सामर्थ्य निर्माण करणे.

२९) व्यक्तिमत्वाची गुणवत्ता वाढविणे.

३०) स्वआदराची भावना निर्माण करणे.

३१) Self confidence निर्माण करणे.

३२) योग्य मार्गाची निवड करण्याची पात्रता निर्माण करणे.

३३) विश्वसंस्कृतीबाबत प्रेम निर्माण करणे.

३४) मन:शांतीचे प्रशिक्षण देणे.

३५) कृतीमध्ये सर्वोत्कृष्टता निर्माण करणे.

३६) अनुभव समृध्द बनविणे.

३७) स्वयंशिस्त निर्माण करणे.

३८) Sacrifice,vigilance,teamwork व self discipline ह्या भावना निर्माण करणे.

३९) ऋणभावना जपणे (समाज ऋण, राष्ट्र ऋण) आत्मऋण.

४०) व्यावसायिक दृष्टिने तयार करणे.

४१) आव्हाने पेलण्याची क्षमता निर्माण करणे.

४२) शांततेची अनुभूती घेण्याची पात्रता निर्माण करणे.

४३) Possitive mental attitude निर्माण करणे.

४४) निसर्गाबाबत प्रेम निर्माण करणे.

४५) समाज सेवकांची सेना निर्माण करणे.

४६) चारित्र्य विकास.

४७) मूल्य संचयाचे आचरण करणे. (सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य)

४८) कर्मयोगी युवक घडविणे.

४९) स्फूर्तीची अभिव्यक्ति करण्याची पात्रता निर्माण करणे.

५०) मानसिक शक्तीचा संचय.

वरील सर्व बाबी साध्य होण्यासाठी धर्मग्रंथाच्या अभ्यासावर त्यांनी भर दिला आहे. Self funded शिक्षणाला त्यांनी प्राधान्य दिले आहे. भगवद्गीता, उपनिषदे, भारतीय इतिहास, तत्वज्ञान ह्याच्या सखोल अभ्यासातून ही बाब साध्य होऊ शकेल. आत्मनिरिक्षण व आत्मचिंतन अभ्यास पध्दतीवर त्यांचे भाष्य म्हणजे फार मोठे योगदान आहे. संस्कृतीचे प्रशिक्षण युवकांना देण्याबाबत फार मोलाचा सल्ला त्यांनी दिला आहे. शारीरिक विकासासाठी योगशास्त्र सूर्य नमस्कार हे मार्ग अनिवार्य पणे सांगितले. त्याच बरोबर नेतृत्वाचे शिक्षण राजकारणी लोकांनाही देण्यात यावे. हे गुरुदेवांचे विचार म्हणजे शिक्षणशास्त्राला फार मोठी देणगी आहे. वयाच्या २० ते २२ वर्ष पर्यंतचे शिक्षण अनिवार्यपणे झाल्यावर २ ते ३ वर्ष अनिवार्यपणे व्यावसायिक सराव हा मात्र अत्यंत महत्वाचा ठरतो व २५ व्या वर्षी युवकाला व्यावसायिक दृष्ट्या सक्षम बनविणे ही त्यांची युवकांप्रति शिक्षण दृष्टि होती. ह्याबाबतचा विस्तृत विचार ''शिक्षण दृष्टि'' मध्ये करण्यात आला आहे.

मूल्यशिक्षण :-

प.पू. गुरुदेव मूल्य ह्या विचाराकडे धार्मिक व आध्यात्मिक वर्तन संच ह्या दृष्टिकोनातून बघतात. मानवी व्यक्तिमत्वामध्ये एकात्मता आणण्यासाठी व्यक्तिमत्वाचा पोत सुधारण्यासाठी ह्या मूल्यांचे आचरण महत्वाचे मानतात. ह्याचे कारण म्हणजे मानवला अंतर्बाह्य आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. हे तोंड देतांना मूल्यांचे आचरण ही बाब महत्वाची आहे. पण आज नेमके मूल्याचरण हीच बाब दुर्लक्षित होत आहे. ह्याबद्दल तीव्र खेद त्यांनी आपल्या मूल्य विषयक विचारामध्ये व्यक्त केला आहे. ह्या मूल्यासंवर्धनासाठी मानसिक व्यक्तिमत्वात अंतर्बाह्य सुसंवाद असणे ही व्यक्तिमत्व विकासात त्यांनी घातलेली महत्वाची भर आहे. परिवर्तनशील जगात जी अपरिवर्तनीय मूल्य आहे. ह्या मूल्यामुळे जगातील प्रत्येक घटकाचे अस्तित्व टिकून आहे. गुरुदेवांनी मूल्यांची परिभाषा करतांना मूल्य म्हणजे वर्तनाचा संच आहे. अशी परिभाषा केली आहे. मूल्य प्राप्तीचा सर्वात मोठा स्त्रोत म्हणजे धर्म आहे, असे ते मानतात. बौध्दिक निर्णय व कृती ह्यांच्यातील आंतरविरोध हा मानवामध्ये नकारात्मक भावना निर्माण करतात.

सहजप्रवृत्ती दिव्यत्व

आंतरविरोध

नकारात्मक भावना

सहजप्रवृत्ती दिव्यत्व

आंतरविरोध

हिंसा अनैतिकता भ्रष्टाचार खोटेपणा

नकारात्मक भावना

चुकीचे वर्तन

योग्य वर्तन

अशा वृत्तीला ओळखून त्याचे परिवर्तन सकारात्मक भावनेत करणे हे मूल्याचरण आहे. ह्यवरुन त्यांचा मूल्यशिक्षणाबाबत दृष्टि लक्षात येते. कारण अशा वृत्तींना ओळखणे व त्याचे सकारात्मक वृत्तीत परिवर्तन करण्यावर त्यांनी भर दिला आहे. त्यासाठी महत्वाची मानसिक प्रक्रिया म्हणजे नकारात्मक वृत्तीचा सातत्याने तिरस्कार.

सहजप्रवृत्ती दिव्यत्व

आंतरविरोध

नकारात्मक भावना

चुकीचे वर्तन

नकारात्मक वृत्तीचा सातत्याने तिरस्कार

समन्वय

सहजप्रवृत्ती दिव्यत्व

योग्य वर्तन

मूल्याचरण (नैतिक गुण संवर्धन)

मानवातील दिव्यत्व व सहजवृत्ती ह्यातील समन्वय हा मूल्याचा स्त्रोत आहे व ह्या दृष्टिकोनातून गीतेचा १६ वा अध्याय अत्यंत महत्वाचा आहे. मूल्यशिक्षणाचा विचार करतांना त्यातून मूल्याची संस्कार करण्यासाठी नकारात्मक वृत्तीची घृणा व्यक्तिच्यामनात कशी निर्माण करता येईल व दिव्यत्व व सहजवृत्ती ह्यांच्यात समन्वय कसा निर्माण करता येईल हा दृष्टिकोन महत्वाचा ठरतो व नैतिक तेचे गुण विकसनावर भर द्यावा लागेल. कारण नैतिकतेचे गुण हे त्यांच्या मते मानवाच्या क्षीण झालेल्या शक्तींना पुनरुज्जीवीत करण्याचा मार्ग आहे.

शिवाय व्यक्तिमत्वात निर्माण झालेले दोष घालविण्याचा महत्वाचा मार्ग आहे. मानवाच्या व्यक्तिमत्वात जो विसंवाद निर्माण होतो तो प्रामुख्याने भौतिक सुखाच्या आधीन झाल्याने स्वत:बाबतचे चुकांचे अनुमान काढण्याने सुध्दा मानवाचे हातून मूल्यांची पायमल्ली होते. शिवाय आंतरिक व्यक्तिमत्वामध्ये विसंवाद निर्माण झाल्याने सुध्दा मूल्यांची पायमल्ली होते व व्यक्तिचे पर्यायाने समाजाचे स्वास्थ्य बिघडते व बौध्दिक सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक सर्वच मूल्यांची पायमल्ली होते. आणि म्हणूनच व्यक्तिमत्वात समन्वय सुसंवाद निर्माण करणे हा मूल्य संस्काराचा महत्वाचा मार्ग आहे. म्हणूनच मूल्य शिक्षणाचा विचार करतांना मानवाच्या व्यक्तिमत्वाचा प्रत्येक घटक हा कसा विकसित होईल हा दृष्टिकोन महत्वाचा आहे. ह्या दृष्टिकोनातून चिन्मय मिशनच्या शिक्षण विभागाने बनविलेला CVP Chinmaya Vision Programm हा अतिशय उपयुक्त असा कार्यक्रम आहे. हा प्रत्येक शाळांमध्ये लागू झाल्यास प्राथमिक स्तरापासूनच मूल्याबाबतचे संस्कार व्यक्तिमध्ये रुजण्यास मदत होईल. शिक्षणातून स्वत:चा अहंकार कमी करण्याबाबतचे प्रशिक्षण हा महत्वाचा दृष्टिकोन आपणास ह्या विचारसरणीत आढळतो व हा व्यक्तिगत मी पणाशी निगडीत असणारा अहंकार हा व्यापक समष्टीशी, उदात्त न्याय प्रणालीशी, राष्ट्राशी विश्वाशी एकरुप करण्याचे प्रशिक्षण महत्वाचे ठरते. ह्या दृष्टिने मानवाचा ''स्व'' चा विस्तार महत्वाचा ठरतो.

वरीलप्रमाणे स्वचा विस्तार होऊन तो चैतन्याशी तादात्म्यता ही बाब महत्वाची आहे. I व I want ह्यातून मानवाची मुक्तता ही बाब मूल्यशिक्षणासाठी महत्वपूर्ण ठरते.

मूल्यशिक्षणाच्या दृष्टिकोनातून बौध्दिक स्तरावर खालील बाब महत्वपूर्ण ठरते ती म्हणजे -

Power of Intellect

Conserving Power　　　　Directing Power

Cultivated Power

**मानवी बुध्दिमत्ता**

वरीलप्रमाणे स्वचा विस्तार होऊन तो चैतन्याशी तादात्म्यता ही बाब महत्वाची आहे. I व I want ह्यातून मानवाची मुक्तता ही बाब मूल्यशिक्षणासाठी महत्वपूर्ण ठरते.

मूल्यशिक्षणाच्या दृष्टिकोनातून बौध्दिक स्तरावर खालील बाब महत्वपूर्ण ठरते ती म्हणजे -

Power of Intellect

Conserving Power Directing Power

Cultivated Power

**मानवी बुध्दिमत्ता**

हिंदु तत्वज्ञानातील तीन मूल्य ही मानवी जीवनाकरिता अनिवार्य आहेत. सत्य, अहिंसा व ब्रह्मचर्य जी शारीरिक, मानसिक व बौध्दिक घटकांचे प्रतिनिधित्व करतात.

मूल्य संकल्पनेतून मानवत्वाकडून देवत्वाकडील क्रमविकास त्यांना अपेक्षित आहे. मूल्याचरणातून शांतता, आनंद, तात्पर्य शाश्वत विकास अपेक्षित आहे व ह्याकरिता बौध्दिक स्तरावरील संस्कार महत्वपूर्ण ठरतात. मूल्य संस्कारातून Individual Perfection वर त्यांनी भर दिला आहे व ह्याकरिता Fundamental Values ह्या महत्वाच्या ठरतात. मूल्य रुजवणुकीच्या बाबतीत वर्तमान काळ अतिशय महत्वाचा आहे. मूल्यशिक्षणाच्या दृष्टिने खालील दृष्टिने हा महत्वाचा व मार्गदर्शक आहे.

१) वर्तमानकालीन मूल्य रुजवण

२) बालकांना उदात्त Vision पुरविणे

३) योग्य नेता नेतृत्व निर्माण करणे

४) Individual Perfection निर्माण करणे

५) Proper use of Intellectual Power ही क्षमता निर्माण करणे

६) नकारात्मक वृत्तीचा तिरस्कार निर्माण करणे

७) आंतर व बाह्य व्यक्तिमत्वात समन्वय निर्माण करणे

८) विविध धर्मातील समान वर्तन संचयाबाबत आदरभाव निर्माण करणे

९) स्वचा परिघ विस्तारणे

१०) Fundamental values बाबत निष्ठा निर्माण करणे

११) Appreciation of the enternal values निर्माण करणे

१२) मूल्यधिष्ठतेकडे शिक्षण परिवर्तन करणे

१३) Realization of quality of our thoughts

१४) Pure living ची उदाहरणे विषद करणे

१५) मूल्यशिक्षणाच्या बाबतीत शिक्षकाचे गुणधर्म

१६) Law of giving चे संस्कार

१७) Social Suicide बाबत घृणा निर्माण करणे.

१८) Charity बाबत आदर निर्माण करणे

जीवनाच्या उच्च तत्वज्ञानाच्या आधारावर शिक्षण अनिवार्य आहे. ह्यासाठी जीवन ध्येययाबाबत स्पष्टता असावी जी प.पू. गुरुदेवांनी दिली आहे. शिक्षक प्रक्षिणाबाबतचा सृध्दा दृष्टिकोन त्यांनी आपल्या विचारामध्ये दिला आहे. शिक्षकांकरिता ते उपनिषद व गीतेचा अभ्यास महत्वाचा मानतात. विविध मूल्यांचे उल्लेख त्यांच्या लेखात आपणास आढळतात. ह्या सर्वांचा उहापोह शिक्षण दृष्टिमध्ये करण्यात आला आहे.

व्यवस्थापन संकल्पना:-

स्वामी चिन्मयानंदांच्या लिखाणात अनेक व्यवस्थापकीय संकल्पना आलेल्या आहेत. शिवाय स्वत: गुरुदेव हे Performance Manager होते. Performance Leader होते. आज जगतिक स्तरावर विविध ठिकाणी व जीवनाच्या प्रत्येक अंगाशी Management ही संकल्पना निगडीत आहे. विविध आधुनिक संकल्पनांचा उहापोह प.पू. गुरुदेवांच्या विवेचनात आपणास आढळतो. त्यात प्रामुख्याने Art of Communication, True worker, The

secret of management, Art of listening, Art of action, Leadership, नफ्यातील रहस्य, Right attitude for success, Macro-Micro Vision, Inspiring leadership इ. संकल्पना ह्या Management concept ह्या आजच्या काळात अतिशय आवश्यक आहे. प.पू. गुरुदेव हे स्वत: Performance Manager होते. ह्यांचे महत्वाचे कारण म्हणजे त्यांच्या सर्व जीवनाचे अधिष्ठान हे पुढीलप्रमाणे होते. त्यांच्या कार्याला Vision होते. Mission होते व Values हा त्यांच्या कार्याचा पाया होता. प.पू. गुरुदेव हे केवळ Performance Manager अथवा Leader नव्हते तर आधुनिक व्यवस्थापनाच्याच भाषेत सांगावयाचे झाल्यास ते Wisdom Leader होते.

ब) शिक्षण तज्ज्ञांना देण्यात आलेल्या मतावलीच्या आधारे प्राप्त होणारे निष्कर्ष:-

स्वामी चिन्मयानंदांच्या मतावर आधारीत जी १७५ मुद्दे असणारी मतावली तयार करण्यात आली त्यावरुन प्रामुख्याने निघणारा निष्कर्ष असा की चिन्मयानंदांच्या विचाराचे प्रतिबिंब हे आधुनिक शिक्षणात आहे. त्यांची शिक्षण विषयक दृष्टि ही आजच्या शिक्षण प्रणालीत अभिव्यक्त झाली आहे. प्रतिबिंबित झाली आहे. पण अनेक उच्च कोटीची तत्वे ही प्रामुख्याने दुर्लक्षित झाली आहे. त्याचा अंतर्भाव जर आधुनिक शिक्षणात केला तर आधुनिक शिक्षणप्रणालीही अतिशय आदर्श शिक्षणप्रणाली असेल.

क) चिन्मय साधकांना देण्यात आलेल्या मतावलीच्या आधारे प्राप्त होणारे निष्कर्ष :-

चिन्मय साधकांकडून जी मतावली भरुन घेण्यात आली त्यावरुन असा निष्कर्ष निघतो की, आधुनिक शिक्षणात प.पू. गुरुदेवांच्या विचारांचे प्रतिबिंब आपणास आढळते.

दोन्ही मतावलीतील प्रातिनिधिक प्रश्नांचा सहसंबंध काढल्यानंतर प्रत्येक मुद्याच्या बाबतीत हा उच्च प्रतिचा धनात्मक सहसंबंध प्राप्त झाला आहे.

ड) आचार्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे निघणारे निष्कर्ष :-

आचार्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीवरुन प.पू. गुरुदेवांच्या शैक्षणिक विचाराबाबत खालील निष्कर्ष निघतात.

१) सुप्त शक्तींना अभिव्यक्त करणे म्हणजे शिक्षण आहे.

२) संधीचा उपयोग करण्याचे सामर्थ्य निर्माण करते ते शिक्षण.

३) शिक्षणातून ज्ञान व कृतीचा सहसंबंध निर्माण व्हायला हवा.

४) शिक्षणातून मोठ्या मनाचा, शिस्तप्रिय व नैतिक मूल्यांचे आचरण करणारा नागरिक निर्माण व्हायला हवा.

५) शिक्षणामुळे सद्गुणाचे आचरण करण्याची क्षमता निर्माण व्हायला हवी.

६) शारीरिक, मानसिक व बौध्दिक घटकावर शिक्षणात भर हवा.

७) शालेय वातावरण व घरगुती वातावरण ह्यात समन्वय आवश्यक आहे.

८) शाळा ही गृह सदृश असावी.

९) शिक्षकांनी नकारात्मक वर्तन टाळावे.

१०) राष्ट्रनिर्मितीच्या कार्यावर शिक्षणातून भर द्यावा.

११) भविष्यातील नेतृत्व हे शिक्षणातून निर्माण व्हायला हवे.

१२) आंतरिक मूल्ये व बाह्य मूल्ये ह्यात समन्वय निर्माण व्हायला हवा.

१३) व्यक्ति विकासातूनच राष्ट्रविकासाचे ध्येय साध्य व्हावे.

१४) शब्दापेक्षा राष्ट्र ज्ञानापेक्षा प्रात्यक्षिक व कृती महत्वाची आहे.

१५) जागतिकीकरणामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

१६) पाल्याचा अभ्यास व विकासाकडे पालकांनी लक्ष द्यावे.

१७) प्राथमिक स्तरावर कौटुंबिक वातावरण महत्वाचे आहे.

१८) कौटुंबिक वातावरण हे व्यक्तिविकासावर प्रभाव टाकते.

१९) शिस्त ही व्यक्तिमत्व विकासातील अडथळा न ठरता ती स्वयंशिस्तीत परिवर्तीत व्हावी.

२०) व्यक्तिमत्व विकासात पालक व पाल्य ह्यांच्या दृढ आंतरक्रिया ह्या महत्वपूर्ण असतात.

२१) शालेय शिक्षण हे वास्तविक पाहता घराचेच विस्तारीकरण आहे.

२२) ज्येष्ठ व्यक्तिच्या सहवासाने मानवाचे जीवन मूल्य बळकट होतात.

२३) शिक्षण म्हणजे फक्त शाळेत जाऊन पदवी प्राप्त करणे इतक्या पुरते मर्यादित नाही. मनाची अर्हता, कुलीनता, उमदा स्वभाव, उच्च पदवी हा शिक्षणाचा खरा अर्थ आहे.

२४) बालकांवर जीवनमूल्याचे संस्कार हे बालवयातच व्हायला हवेत.

२५) कथांच्या माध्यमातून जीवनमूल्याचे संस्कार प्रभावी होतात.

२६) भौतिक सुखे व संस्कार व मूल्ये ह्यांचा योग्य ताळमेळ राखण्याचे शिक्षण देण्यात यावे.

२७) विशिष्ट भूभागात राहणारी लोकसंख्या म्हणजे राष्ट्र नव्हे तर उदात्त हेतू करिता एकत्र आलेली लोकसंख्या म्हणजे राष्ट्र आहे.

२८) मानवात बंधुभावना निर्माण करावयास हवी ही बंधुभावनाच संस्कृती टिकवून ठेवण्यास मदत करते.

२९) विविध प्रकारच्या योजना ह्या राष्ट्राची उभारणी करु शकत नाही. तर ती नैतिक मूल्यांच्या संस्काराने, आचरणाने होते.

३०) स्वधर्माचे आचरण प्रत्येकाकरिता आवश्यक आहे.

३१) शिक्षणातून व्यक्तिला Vision प्राप्त होणे आवश्यक आहे.

३२) शिक्षणातून मानवामध्ये निर्णयक्षमता निर्माण व्हायला हवी.

३३) शिक्षण पध्दतीत काळानुरुप बदल व्हायला हवेत.

३४) वाढत्या वयात बालकांना आंतरिक व बाह्य सौंदर्याबाबत जाणीव निर्माण करायला हवी.

३५) एकमेकांवर प्रेम करण्याची भावना ही बालवयातच निर्माण व्हायला हवी.

३६) बालकांमधील सकारात्मक बदल हा महत्वाचा आहे. हा बदल हळूहळू घडवून आणता येऊ शकेल.

३७) आधुनिक काळातील मुले ही अतिशय हुशार आहे.

३८) वेद व उपनिषदांचा अभ्यास हा महत्वाचा आहे.

३९) गेल्या शतकापासून असणारी शिक्षण पध्दती पांगळी आहे.

४०) मुलांच्या मनात देशप्रेम निर्माण करायला हवे.

४१) आज बालकांना कुसंस्काराच्या दुष्टचक्रापासून वाचवायला हवे.

४२) भारतात समस्या निराकरणाची क्षमता अत्यंत कमी झालेली आहे.

४३) भारतात सांस्कृतिक उत्क्रांती महत्वाची आहे. ह्यासाठी नवीन दृष्टिकोन प्रदान करावा लागेल. तरुणांमध्ये चपळाई निर्माण करावी लागेल.

४४) तरुणांना नेतृत्वाचे व सामाजिक कार्याचे प्रशिक्षण द्यायला हवे.

४५) तरुणांमध्ये देशासाठी आपल्यातील आत्मविश्वास, प्रेम, देशाप्रती आदराची भावना, त्यागाची भावना असणे अत्यंत गरजेचे आहे.

४६) आजच्या अभ्यासक्रमात इतिहासाला थारा नाही. इतिहास पूर्ववैभवावर आधारीत असायला हवा.

४७) शैक्षणिक परिवर्तनासाठी राजकीय नेत्यांवर अवलंबून राहू नये.

४८) चारित्र्य बांधणीसाठी शिक्षण देण्यात यावे.

४९) मुले-मुली ही राष्ट्राची संपत्ती आहे. त्यांचे बालपण हे संस्कारक्षम आवश्यक आहे.

५०) शिक्षणातून आदर्श पुढारी, अर्थतज्ज्ञ, विचारवंत, शास्त्रज्ञ, सामाजिक कार्यकर्ते निर्माण होणे आवश्यक आहे.

५१) शिक्षणातून मुलांना नवनवीन योजना, कल्पना, पुढाकार घेण्याची इच्छाशक्ती निर्माण होऊ शकते. हा चारित्र्य निर्मितीचा पाया आहे.

५२) शहाणपणा व समजदारी निर्माण करणे म्हणजे शिक्षण होय. शिक्षणातून मनावर नियंत्रण प्राप्त करण्याची क्षमता निर्माण व्हायला हवी.

५३) चारित्र्य निर्मितीचे शिक्षण देणारे शिक्षक हे ज्ञानाचे प्रति समर्पित, त्याच्या जवळ बालकांप्रति तळमळ व आत्मीयता असावी.

५४) इमानदारीने मेहनतीने शिक्षण देणाऱ्या शिक्षकांची आज आवश्यकता आहे.

५५) शिक्षकांचे वर्तन हे अत्यंत आदर्श असावे व शिक्षकांमध्ये समर्पणाची भावना प्रबळ असावी. शिक्षक हा सात्विक विचाराच असावा.

५६) शिक्षकाला धर्माबाबत प्रेम असावे.

५७) मानवाचे व्यक्तिमत्व हे त्याच्या मन व बुध्दीच्या गुणवत्तेवरुन निर्धारीत होते.

५८) सारासार विचार करण्याची पात्रता बुध्दीमध्ये निर्माण व्हायला हवी.

५९) मानवी मन हे विचार प्रवाहीत करण्याचे साधन आहे.

६०) मन आणि बुध्दीला योग्य वळण लावण्यासाठी धार्मिक विचाराची गरज आहे.

६१) सुसंस्कृतपणा हा सुधारणेचा मापदंड आहे.

६२) मानव कोणत्या प्रकारच्या जीवनप्रणालीचा स्विकार करतो ह्यावर संस्कृती अवलंबून असते.

६३) संस्कृतीमधील फरक हा जीवनमूल्ये व तत्वप्रणालीमुळे असते.

६४) भारतीय संस्कृती ही सेवाधारीत व मूल्याधिष्ठीत आहे.

६५) मानवाचे जीवनमान संस्कृतीच्या संवर्धनाने उंचावते.

६६) संस्कृतीचा ऱ्हास थांबवायचा असेल तर संस्कृतीचे पुनरुथ्थान महत्वाचे ठरते.

६७) धर्म संकल्पनेला इंग्रजीत प्रतिशब्द नाही.

६८) अस्तित्वाचा नियम म्हणजे धर्म.

६९) गुरु हा धर्माच्या वेद, उपनिषदात पारंगत असावा. तसेच सत्यवचनातही तो पारंगत असावा.

७०) गुरुचे आचरण अतिशय योग्य व शुध्द असावे.

७१) खरा शिष्य हा शारीरिक, मानसिक व भावनिक दृष्ट्या सक्षम असतो.

७२) माळ्याचे जे फुलाशी असते तेच नाते गुरुचे शिष्याशी असते.

७३) शिक्षकाने आपल्या विद्यार्थ्यांच्या मनात योग्य विचार रुजवावे

वरील प्रमाणे आचार्याकडून प्राप्त झालेल्या माहितीतून निष्कर्ष निघतात.

स्वामी चिन्मयानंद ह्यांची शिक्षण विषयक दृष्टि :-

शाश्वत विकासाकरीता शिक्षण **(Education for Sustainable Development)**:

प.पू. गुरुदेव स्वामी चिन्मयानंद हे आधुनिक काळातील द्रष्टे होते. त्यांचे विचार हे अत्यंत मार्गदर्शक व प्रेरक आहेत. त्यांच्या लेखनात विविध विषयांचा अंतर्भाव झाला आहे. त्यापैकी त्यांचे शिक्षणविषयक विचार हे अत्यंत महत्वपूर्ण आहे. त्यांच्या संपूर्ण शिक्षण विषयक विचारात त्यांनी मानवाचा शाश्वत विकासाचाच विचार केला आहे, असे आपणास आढळते. आज जागतिक स्तरावर शाश्वत विकासाचा विचार हा प्रत्येक शिक्षणतज्ज्ञ करित असतांना गुरुदेवांच्या विचारातून जी शाश्वत विकासाच्या शिक्षणाची दृष्टि निष्पन्न होते ती अत्यंत महत्वाची आहे आणि त्यालाच अनुसरुन शाश्वत विकासाकरिता शिक्षण ही एक शिक्षणयोजना ह्या ठिकाणी मांडण्यात येत आहे. Education for sustainable Development ह्या अंतर्गत येणारी ही महत्वपूर्ण योजना शिक्षण विभागास उपयुक्त ठरु शकते व ह्या शिक्षण योजनेचा शासन स्तरावर विचार व्हावा ही शिफारस सर्वप्रथम करण्यात येत आहे.

प्रस्तुत शाश्वत विकासाकरीता शिक्षणाच्या आराखड्यात खालील मुद्यांवर प्रकाश टाकण्यांत आला आहे.

१) शाश्वत विकासाकरीता शिक्षण

२) मार्गदर्शक तत्वे

३) गुणवत्तेचा संदर्भ

४) सामाजिक संदर्भ

५) शिक्षण

६) शिक्षणाची उद्दिष्ट्ये

७) शाश्वत विकासाकरीता शिक्षण - विविध उपागम

बालकेंद्री शिक्षण

युवा शिक्षण

आत्म संयमनाचे शिक्षण

समग्र व्यक्तिमत्व विकास व शिक्षण

राष्ट्रीय सांस्कृतिक विकासाकरिता शिक्षण

धार्मिक शिक्षण

पालक शिक्षणाचा दृष्टीकोन

स्त्री शिक्षण

शांततेकरिता शिक्षण

मूल्यविषयक दृष्टीकोन

विज्ञान शिक्षण

पर्यावरण शिक्षण

नेतृत्वाचे शिक्षण

शिक्षक प्रशिक्षण

स्व व्यवस्थापनाचे शिक्षण

अध्ययन अध्यापन पध्दती

वयोगटानुसार शिक्षणाचा उपागम

शालेय वातावरण

मूल्यांकन

वरील विवेचनावरून शिक्षणाच्या पुढील आकृतीबंधांची शिफारस या आराखड्याच्या माध्यमातून शिक्षण विभागास करण्यांत आलेली आहे.

आकृतीबंध १

विकासाचा आकृतीबंध

| शारीरिक विकास | मानसिक विकास | बौध्दिक विकास | अध्यात्मिक विकास |
|---|---|---|---|
| उदरनिर्वाहाचे शिक्षण | शांतीचे शिक्षण | ज्ञान | तादात्म्य |
| Physical edu. | Education | Other subjects | edu. for |
| व्यवसाय शिक्षण | for peace | Art's,Com.Sci. | Meditation |
| शरिराचे आध्यात्मिक | मनव्यवस्थापन | Other | spiritual |
| अधिष्ठान | | subjects | techniques |
| शरीर शास्त्र | | edu. with | value edu. |
| Spiritual anatomy | | science | philosophy |
| Physiology | | math | |
| Hygine | | | |
| Nutrition | | | |
| Yoga | | | |
| आत्मसंयमाचे शिक्षण | | | |

आकृतीबंध २

## सहसंबंधाचा आकृतीबंध

| व्यक्ति | समाज | निसर्ग | परमात्म तत्व |
|---|---|---|---|
| प्राचीन तत्वज्ञान | सांस्कृतिक व | spiritual foundation | spiritual edu. |
| व व्यक्ति अधिष्ठान | सामाजिक शिक्षण | of nuture | law of being |
| Social cultural | Environment edu. | universal love | |
| heritage edu. | Education for | edu. of | |
| spiritual aspect | co-existence | world issue | of |
| societyBhartia | science and | | spirituo |
| sociology | philosophy | relegion | |
| Environmental | | | |
| value education | | | |

आकृतीबंध ३

## राष्ट्रीय शिक्षणाचा आकृतीबंध

राष्ट्रप्रेमाचे शिक्षण

History civic

Edu. for accountibility

Edu. for service

राष्ट्रभक्तीपर गीते

नेतृत्वाचे शिक्षण

विविध नेत्यांच्या जीवनी

Veda in new reference

आधुनिक संदर्भात भारतीय अध्यात्मशास्त्र

भारतीय वैज्ञानिक

Education for citizenship

Edu. for universal citizenship

विज्ञानाचे आध्यात्मिक अधिष्ठान

संस्कृतीचे शिक्षण

कलातत्वज्ञानाचे शिक्षण

भारतीय धर्म दर्शनशास्त्र

विशेषाधिकाराचे शिक्षण

धर्मसंकल्पनांचा इतिहास

भारतीय कलाचे शिक्षण

Cultural Hobbies

Art, music, dance

Education for Human

accountibility

मूल्य शिक्षण

संत साहित्य महात्म्यांचे जीवन

आकृतीबंध ४

## धार्मिक शिक्षणाचा आकृतीबंध

| तात्विक अधिष्ठान | प्रात्यक्षिक |
|---|---|
| धर्म संकल्पना | Meditation |
| धर्माविषयक समाज दृष्टीकोन | Yoga |
| प्राचीन वर्णव्यवस्थेचा आशय | Breathing tech |
| प्राचीन वर्णव्यवस्थेचा आशय | |
| गीताभ्यास | |
| वेद उपनिषद | |
| सहअस्तित्वाचे शिक्षण | |
| संत साहित्याचे शिक्षण | |

आकृतीबंध ५

## वयोगटाचा आकृतीबंध

० ते ३ वर्ष - संगोपन, शारीरिक विकास

३ ते ५ वर्ष - शारीरिक, मानसिक

५ ते १० वर्ष - शारीरिक, मानसिक, बौध्दिक

१० ते १४ वर्ष - शारीरिक, मानसिक, बौध्दिक कौशल्य

१५ ते १८ वर्ष - शारीरिक, मानसिक, बौध्दिक कौशल्य

१८ ते २० वर्ष - शारीरिक, मानसिक, बौध्दिक कौशल्य

vision

२० ते २५ वर्ष - शारीरिक, मानसिक, बौध्दिक कौशल्य

balance

आकृतीबंध ६

## व्यवसाय शिक्षणाचा आकृतीबंध

प्राथमिक स्तर - कृति इ. ० ते ४

माध्यमिक स्तर - तात्विक इ. ४ ते ८

माध्यमिक स्तर - प्रात्यक्षिक इ. ८ तें १०

उच्च माध्यमिक स्तर - प्रकल्प कार्य इ. १० ते १२

उच्च स्तर - संशोधन कार्य इ. १२ + ३

सेवाकाल - सराव

वरील प्रमाणे शिक्षणाचे आकृतीबंध देण्यांत येत आहेत.

प.पू. गुरुदेवांच्या दृष्टीतील शाश्वतविकासाचे शिक्षणाचा आराखडा वरीलप्रमाणे.

वरील आराखडा आचरणात आणण्यासाठी शासनाने योग्य तो प्रयत्न करायला हवा. वरील आराखड्याच्या आधारावर आवश्यक त्या उपाययोजना करण्यास चालना द्यावी.

# पडताळा सूची

१) नाव :------------------------------------------------------------------

२) पूर्णपत्ता व फोन नं.

:------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

३) व्यवसाय / नोकरी : -------------------

४) किती वर्षांपासून शिक्षण क्षेत्राशी निगडित आहात ? :

-------------------------

५) किती वर्षांपासून चिन्मय अभ्यासक आहात ? :

------------------------

**सूचना** : खाली काही विधाने दिली आहेत. ह्या विधानांचे प्रतिबिंब प.पू. गुरुदेवांच्या विचारात आढळते किंवा नाही. ह्याकरिता प्रत्येक विधानासमोर असहमत (अ), अशंतः सहमत (अस), सहमत (स) असे ३ पर्याय दिले आहेत. योग्य त्या पर्यायावर ✔ खूण करा.

-------------------------------------------------------------------------------------

| | (अ) | (अस) | (स) |
|---|---|---|---|
| 1) देषातील बालकांना षिक्षित करणे सर्वात महत्त्वाचे आहे. | ☐ | ☐ | ☐ |
| 2) शालेय अध्ययनाचा जीवनाशी प्रत्यक्ष संबंध नाही. | ☐ | ☐ | ☐ |
| 3) आज शाळांमधून रचनात्मक चिंतन व मर्मदृष्टी ह्याकडे लक्ष देण्यात येत नाही. | ☐ | ☐ | ☐ |
| 4) मानवीय ज्ञाननिर्मिती क्षमता व सृजनशीलता ह्याकडे आज दुर्लक्ष होत आहे. | ☐ | ☐ | ☐ |
| 5) बालकांच्या वर्तमान काळाकडे दुर्लक्ष होत आहे. | ☐ | ☐ | ☐ |
| 6) जीवनाचा अर्थ कळण्याची क्षमता शिक्षणातून निर्माण व्हायला हवी. | ☐ | ☐ | ☐ |
| 7) शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या योग्यतेचा विकास व्हायला हवा. | ☐ | ☐ | ☐ |
| 8) शिक्षणातून जीवनाचे ध्येय निश्चित करण्याची पात्रता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हायलाहवी. | ☐ | ☐ | ☐ |
| 9) समानतेचे व सहअस्तित्वाचे मूल्यसंस्कार शिक्षणातून व्हायला हवेत. | ☐ | ☐ | ☐ |
| 10) शांती मानवता व सांस्कृतिक विविधता ह्या मूल्यांचे विकसन करणारी शिक्षणप्रणाली हवी. | ☐ | ☐ | ☐ |
| 11) मानवता सहिष्णुता निर्माण करणारी शिक्षण प्रणाली हवी. | ☐ | ☐ | ☐ |

12) बालकाकरिता उपयुक्त असणारे अनुभव ह्यांची निवड करण्याचे स्वातंत्र्य शिक्षकव विद्यार्थ्यांमध्ये असावे. ☐ ☐ ☐

13) सूचनेस ज्ञान समजणे ही बाब चूक आहे. ☐ ☐ ☐

14) अध्यापन हे बालकांच्या रचनात्मक स्वभावाच्या सदुपयोगाचे साधन असावे. ☐ ☐ ☐

15) आजची शिक्षणप्रणाली ही यांत्रिक आहे. परिणामी ती आनंददायी नाही. ☐ ☐ ☐

16) 'Learning without burden' हे तत्त्व शिक्षणात असावे. ☐ ☐ ☐

17) ज्ञानाचा संबंध जीवनाशी जोडणे हा शिक्षणाचा उद्देश असावा. ☐ ☐ ☐

18) अभ्यासक्रमातून बालकांचा सर्वांगिण विकास व्हावा. ☐ ☐ ☐

19) विभिन्न आर्थिक व सामाजिक पार्श्वभूमी असणाऱ्या विद्यार्थ्यांचा विकास शिक्षणाच्या माध्यमातून व्हावा. ☐ ☐ ☐

20) संस्कृती, ज्ञान, परंपरा ह्यांचा अंतर्भाव शिक्षणात असावा. ☐ ☐ ☐

21) आत्मसन्मान व नैतिकतेचा विकास ह्याला शिक्षणात प्राधान्य मिळायला हवे. ☐ ☐ ☐

22) बालकांचा जन्मजात बुद्धीचा तसेच कल्पना शक्तीचा आदर करावयास हवा. ☐ ☐ ☐

23) ज्ञानाचा प्रवाह हा ज्ञाताकडून अज्ञाताकडे असावा. ☐ ☐ ☐

24) ज्ञानाचा प्रवाह मूर्ताकडून अमूर्ताकडे असावा. ☐ ☐ ☐

25) ज्ञानाचा प्रवाह स्थानीयकडून वैश्विकतेकडे असावा. ☐ ☐ ☐

26) अंतर्गत सामाजिक व नैसर्गिक पर्यावरणाशी मानवाचा संबंध असावा. ☐ ☐ ☐

27) शांती संस्कृती निर्माण करणे हे शिक्षणाचे ध्येय आहे. ☐ ☐ ☐

28) ''शांती'' हे जीवनमूल्य जीवनशैली बनावयास हवी. ☐ ☐ ☐

29) संघर्ष सोडविण्याची पात्रता शिक्षणाच्या माध्यमातून निर्माण व्हावयास हवी. ☐ ☐ ☐

30) लोकशाही ही केवळ राज्यप्रणाली नाही तर जीवनप्रणाली आहे. ☐ ☐ ☐

31) शिक्षणात गुणवत्ता आवश्यक आहे. ☐ ☐ ☐

32) केवळ भौतिक संसाधने ही गुणवत्तेचा मानदंड नाहीत. ☐ ☐ ☐

33) सहभागीतेवर आधारित लोकतंत्र व संविधानाची मूल्ये मजबूत करणे हे काळाचे आव्हान आहे. ☐ ☐ ☐

34) बालपण ही नित्यपरिवर्तनाची अवस्था आहे. ☐ ☐ ☐

35) शिक्षणातून बालकांचे अनुभव व सहभागीत्व याला प्राधान्य देण्यात यावे. ☐ ☐ ☐

36) शिक्षकाने आज्ञापालन व नैतिक चारित्र्य ह्या गुणांवर शिक्षणातून भर द्यावा. ☐ ☐ ☐

37) शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचा आवाज ओळखण्याची पात्रता विद्यार्थ्यांची निर्माण व्हावयला हवी. ☐ ☐ ☐

38) अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेचे पोषण व्हावे. ☐ ☐ ☐

39) शिक्षणाचा संबंध विद्यार्थ्यांच्या आनंदायी जीवनाशी असावा. ☐ ☐ ☐

40) भिती, अतिशिस्त व तणावाच्या वातावरणात विद्यार्थी अध्ययन करू शकत नाही. ☐ ☐ ☐

41) विद्यार्थ्यांला शारीरिक दंड व्हायला नको. ☐ ☐ ☐

42) शारीरिक व भावनात्मक सुरक्षितता हा शिक्षणाचा आधार आहे. ☐ ☐ ☐

43) खेळ, शारीरिक शिक्षण ह्याला शिक्षणात प्राधान्य असावे. ☐ ☐ ☐

44) योग शिक्षणाला प्राधान्य असावे. ☐ ☐ ☐

45) सर्व बालकांमध्ये अध्ययनाची प्रेरणा व क्षमता असते. ☐ ☐ ☐

46) अर्थनिर्वचन अमूर्त विचार क्षमता इ. अध्ययनाच्या प्रमुख प्रक्रिया आहेत. ☐ ☐ ☐

47) शाळेतून तसेच शाळाबाह्य घटकातून बालकांना शिक्षण प्राप्त होत असते. ☐ ☐ ☐

48) शाळा व शाळाबाह्य परिस्थितीत समन्वय हवा. ☐ ☐ ☐

49) विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण करणारी शिक्षणप्रक्रिया हवी. ☐ ☐ ☐

50) शिक्षकांची कार्यनिती सकारात्मक असावी. ☐ ☐ ☐

51) अध्ययन ही ज्ञाननिर्मितीची प्रक्रिया आहे. ☐ ☐ ☐

52) पूर्वानुभवाच्या आधारावर व्यक्ती ज्ञानाची रचना करतो. ☐ ☐ ☐

53) विचारांची रचना व पुनर्रचना हे विकासाचे आवश्यक लक्षण आहे. ☐ ☐ ☐

54) अर्थनिर्मिती हे खरे शिक्षण आहे. ☐ ☐ ☐

55) व्यक्ती आपल्या ज्ञानाचे सृजन स्वतः करतो. ☐ ☐ ☐

56) ज्ञानाचे रूपांतर कालांतराने कौशल्यात होते. ☐ ☐ ☐

57) वातावरण, निसर्ग, वस्तु आंतरक्रिया ह्या अध्ययनाचे अभिन्न अंग आहेत. ☐ ☐ ☐

58) शिक्षणात आत्माभिव्यक्तीवर भर असावा. ☐ ☐ ☐

59) गहन व सार्थक अध्ययनावर भर असावा. ☐ ☐ ☐

60) पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त इतर ठिकाणाहून ज्ञान प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांला प्रोत्साहित करावयास हवे. ☐ ☐ ☐

61) अशा अनुभवांचे आयोजन महत्त्वाचे आहे ज्यात विद्यार्थी आपल्या ज्ञानाची रचना स्वतः करू शकेल. ☐ ☐ ☐

62) शिक्षकांची क्षमता विकसित होणे गरजेचे आहे. ☐ ☐ ☐

63) आजची शिक्षण प्रणाली कृत्रिम आहे. ☐ ☐ ☐

64) विचारांची अभिरूची व शिकलेली गोष्ट करून पाहण्याची संधी ह्यांचा शिक्षणात समावेश असावा. ☐ ☐ ☐

65) विद्यार्थ्यांच्या अनुभवांना शिक्षणप्रक्रियेत महत्त्वाचे स्थान आहे. ☐ ☐ ☐

66) शिक्षक व विद्यार्थी ह्यांच्यात होणाऱ्या आंतरक्रिया ह्या विवेचनात्मक असतात. ☐ ☐ ☐

67) सहभागीता पूर्ण शिक्षणाला महत्त्वाचे स्थान असावे. ☐ ☐ ☐

68) लोकशाहीचा स्वीकार जीवनशैली म्हणून करण्यात यावा. ☐ ☐ ☐

69) शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीस प्राधान्य द्यावे. ☐ ☐ ☐
70) मूल्यरूजवणूक व क्षमता विकसन हे शिक्षणाचे उद्दिष्ट असावे. ☐ ☐ ☐
71) अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांचा विवेकशक्तीचा विकास व्हावयास हवा. ☐ ☐ ☐
72) ज्ञानसृजन प्रक्रियेमध्ये सहभागी होणे हे शिक्षणाचे ध्येय असावे. ☐ ☐ ☐
73) मूल्यसंपर्क हा जीवनात सार्थकता निर्माण करतो. ☐ ☐ ☐
74) व्यवहारात ज्ञान मानवाचे कर्म, ही सामाजिक संस्कृतीला जीवंत ठेवतात. ☐ ☐ ☐
75) ज्ञानाच्या दृष्टीने भारतीय संस्कृती विराट आहे. ☐ ☐ ☐
76) प्रत्येक विषयाचे स्वतःचे रूप असते, स्वतःचे सिद्धांत असतात. ☐ ☐ ☐
77) ज्ञानाच्या क्षेत्रात स्वतःची शब्दावली प्रत्यय सिद्धांत वर्णन व पद्धती असतात. ☐ ☐ ☐
78) शिक्षणातून आकलन क्षमता कौशल्य व्यवहार कौशल्य विकसित करावयाचे आहे. ☐ ☐ ☐
79) परिस्थितीशी होणाऱ्या आंतरक्रियेच्या माध्यमातून ज्ञानाचे सृजन होत असते. ☐ ☐ ☐
80) ज्ञानाचा अर्थ जगाशी संबंद्ध होणे हा आहे. ☐ ☐ ☐
81) विविध विषयात परस्पर सहसंबंध नाही त्यामुळे ज्ञान खंडित भासते. ☐ ☐ ☐
82) आज पूर्वनिर्मित ज्ञानावर भर असल्यामुळे ज्ञान सृजनाची प्रक्रिया मंदावते. ☐ ☐ ☐
83) ज्ञान हे केवळ साधनच नाही तर साध्य ही आहे. ☐ ☐ ☐
84) शिक्षकाची विवेचन शैली ही अतिशय समृद्ध असावी. ☐ ☐ ☐
85) सामाजिक व सांस्कृतिक अनुभव हे अभ्यासक्रमाचा हिस्सा असावे. ☐ ☐ ☐
86) रचनात्मकतेचा महत्त्वाचा भाग म्हणजे सौंदर्य बोध आणि म्हणूनच अभ्यासक्रमात कलेचा अंतर्भाव करावा लागेल. ☐ ☐ ☐
87) भारतात विभिन्न भाषा व संस्कृती एकमेकांना अनेक वर्षापासून समृद्ध करित आहेत. ☐ ☐ ☐
88) मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम असावे. ☐ ☐ ☐
89) संस्कृतचे अध्ययन महत्त्वाचे आहे. ☐ ☐ ☐
90) भाषेच्या माध्यमातून व्यक्ती संस्कृतीशी जोडला जातो. ☐ ☐ ☐
91) इंग्रजी शिक्षणाचा उद्देश भारतीय भाषा समृद्ध करणे हा असावा. ☐ ☐ ☐
92) श्रवण हे तार्किक विकासाकरिता आवश्यक आहे. ☐ ☐ ☐
93) अध्यापनात वादविवाद चर्चा पद्धतीचा अवलंब करण्यात यावा. ☐ ☐ ☐
94) शिक्षणातून मूल्यसंस्कार होणे आवश्यक आहे. ☐ ☐ ☐
95) मानवाधिकार शिक्षण आवश्यक आहे. ☐ ☐ ☐
96) इतिहासाच्या माध्यमातून अखिल विश्वाचे ज्ञान आवश्यक आहे. ☐ ☐ ☐
97) शिक्षणातून आंतरराष्ट्रीय सहयोग व सहअस्तित्वाची भावना वाढीस लागावी. ☐ ☐ ☐
98) शांतीची संस्कृती निर्माण करणे हा शिक्षणाचा उद्देश आहे. ☐ ☐ ☐

99) शिक्षणातून शांततापूर्ण जीवन जगण्याची निवड करण्याची क्षमता निर्माण व्हायला हवी. ☐ ☐ ☐

100) संघर्ष सोडविण्याची पात्रता विद्यार्थ्यांच्या अंगी शिक्षणाच्या माध्यमातून व्हायला हवी. ☐ ☐ ☐

101) भारतात कला, धर्मनिरपेक्षता आणि सांस्कृतिक विविधता ह्याचे उदाहरण आहे. ☐ ☐ ☐

102) जीवन जगण्याची कला विकसित करणे हे शिक्षणाचे ध्येय आहे. ☐ ☐ ☐

103) व्यावसायिक क्षमता विकसित करणे हे शिक्षणाचे ध्येय आहे. ☐ ☐ ☐

104) ताण तणावाचे व्यवस्थापन करता येणे हे शिक्षणाचे ध्येय आहे. ☐ ☐ ☐

105) जगाशी सुसंवाद साधण्याचे कौशल्य शिक्षणातून निर्माण व्हायला हवे. ☐ ☐ ☐

106) शिक्षणातून पर्यावरणाबाबत जागृकता निर्माण व्हायला हवी. ☐ ☐ ☐

107) वैश्विकतेचा आव्हानाला सामोरे जाण्याची क्षमता व्यक्तीत निर्माण व्हायला हवी. ☐ ☐ ☐

108) व्यक्तीचा भावनिक विकास महत्त्वाचा आहे. ☐ ☐ ☐

109) विज्ञानाबाबत मानवाचा जागृत दृष्टीकोन हवा. ☐ ☐ ☐

110) शरीरसंवर्धन महत्त्वाचे आहे. ☐ ☐ ☐

111) भ्रष्टाचार हा कोणत्याही क्षेत्रातील असो क्षम्य नाही. ☐ ☐ ☐

112) मानवाधिकाराचे भान सर्वांना हवे. ☐ ☐ ☐

113) देशप्रेम राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, विश्वबंधुत्व, विज्ञाननिष्ठा, सर्वधर्मसमभाव,नैतिक मूल्य, निसर्गप्रेम, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक जाणीव ह्याचा विकास भाषेमुळे शक्य होतो. ☐ ☐ ☐

114) शिक्षणातून विद्यार्थ्यांची आत्मप्रकटीकरणात्मक कौशल्ये विकसित व्हायला हवे. ☐ ☐ ☐

115) नवनिर्मिती व आत्मविष्कार या शक्तीचा विकास होणे आवश्यक आहे. ☐ ☐ ☐

116) सत्प्रवृत्तीचे पोषण करून चिकित्सक वृत्तीची जोपासना शिक्षणातून व्हायला हवी. ☐ ☐ ☐

117) दहशतवाद, भ्रष्टाचार, लोकसंख्यावाद ढासळलेली नितीमूल्ये यांची जाणीव जागृती होऊन एकसंघ समाज घडणे आवश्यक आहे. ☐ ☐ ☐

118) विद्यार्थ्यांत आत्मविश्वास निर्माण होऊन संकटाना सामोरे जाण्याची क्षमता त्याच्यात निर्माण व्हायला हवी. ☐ ☐ ☐

119) राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय एकात्मता ह्या राष्ट्रभावनेच्या प्रति प्रत्येकाचा सकारात्मक दृष्टिकोन निर्माण व्हायला हवा. ☐ ☐ ☐

120) कोणत्याही प्रकारच्या आपत्तीचा सामना करण्यासाठी व्यक्ती सक्षम हवा. ☐ ☐ ☐

121) संस्कृती भाषा ही भारतीय संस्कृतीची प्रतिनिधित्व करणारी भाषा आहे. ☐ ☐ ☐

122) निर्णयक्षमता विकसित होणे हे प्रत्येकाकरिता अनिवार्य आहे. ☐ ☐ ☐

123) विज्ञान हे आपल्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राशी निगडित आहे. ☐ ☐ ☐

124) प्रत्येक व्यक्तीमध्ये जीवनाची गुणवत्ता वाढविण्याची वैज्ञानिक अभिवृत्ती असणे आवश्यक आहे. ☐ ☐ ☐

125) भारतीय इतिहासाचा अभ्यास प्रत्येक व्यक्ती साठी आवश्यक आहे. ☐ ☐ ☐

126) इतिहासाचा अभ्यासातून भूतकाळाचे आकलन वर्तमानाचे भान, भविष्याचे आव्हानाला सामोरे जाण्याची वृत्ती निर्माण व्हावी. ☐ ☐ ☐

127) विश्वबंधुत्व, विश्वसमन्वय ह्या बाबीबद्दल जागृकता निर्माण व्हायला हवी.

128) सुदृढ राष्ट्रवाद, राष्ट्रीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता लोकशाही समाजवाद ह्याचे संस्कार बालकावर होणे आवश्यक आहे. ☐ ☐ ☐

129) व्यक्तीला सामाजिक दृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी व्यक्तीगत सामाजिक, राष्ट्रीयवैश्विक मूल्यांचे एकत्रित संस्कार करणे आवश्यक आहे. ☐ ☐ ☐

130) व्यक्ती व पर्यावरण ह्यांच्यातील आंतर सहसंबंध प्रत्येकाला समजूणे आवश्यक आहे.

131) सृष्टी उत्पत्तीचे ज्ञान हा अभ्यासाचा विषय आहे. ☐ ☐ ☐

132) पर्यावरण रक्षणाचे महत्त्व हे सर्वांना समजायला हवे. ☐ ☐ ☐

133) व्यक्ती म्हणून प्रत्येकाला आपल्या अधिकार व कर्तव्याची जाणीव हवी. ☐ ☐ ☐

134) नेतृत्वाचे गुण यशस्वी नागरिकांसाठी आवश्यक आहे. ☐ ☐ ☐

135) प्रत्येक व्यक्ती पर्यावरणाचा एक घटक आहे. (पिंडी ते ब्रम्हांडी ह्या तत्त्वाने) ☐ ☐ ☐

नाव व सही

# पडताळा सूची

१)  नाव :------------------------------------------------------------------------

२)  पूर्णपत्ता व फोन नं.

:-----------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

३)  पद : ---------------------------   शैक्षणिक अर्हता :

-------------------

४)  किती वर्षापासून शिक्षण क्षेत्राशी निगडित आहात ? : -------------------------

**सूचना** : प.पू.स्वामी चिन्मयानंद यांच्या विचारांना अनुसरून खाली काही शैक्षणिक विधाने दिली आहेत. ह्या विधानांचे प्रतिबिंब प्रचलित माध्यमिक शिक्षण विषयक विचारांमध्ये आढळते किंवा नाही. ह्याकरिता प्रत्येक विधानासमोर असहमत (अ), अशंतः सहमत (अस), सहमत (स) असे ३ पर्याय दिले आहेत. योग्य त्या पर्यायावर ✔ खूण करा.

-----------------------------------------------------------------------------

-----

| | | (अ) | (अस) | (स) |
|---|---|---|---|---|
| 1) | आज शिक्षणामुळे सामान्य योग्यतेत वाढ झाली पण आपल्या कर्माच्या क्षेत्रात ज्ञानाचा उपयोग करण्याची क्षमता विकसित झाली नाही. | ☐ | ☐ | ☐ |
| 2) | व्यक्तिमत्त्व विकासाकरिता हृदयाचे शिक्षण (Education of Heart ) महत्त्वाचे आहे. | ☐ | ☐ | ☐ |
| 3) | व्यक्तिमत्त्वाच्या पुनर्निर्माणाठी सम्यक जीवनात बौद्धिक शिक्षण व मनाची पुनर्व्यवस्था आवश्यक आहे. | ☐ | ☐ | ☐ |
| 4) | ज्ञान आवश्यक आहेच पण त्याच सोबत ह्यांची उपयोजनही आवश्यक आहे. | ☐ | ☐ | ☐ |
| 5) | जेव्हा शास्त्रज्ञानाला मनाच्या माध्यमातून आत्मसात केले जाते व त्याचा अभ्यास केला जातो तेव्हा ते आपल्या कुवतीला नवीन आयम निर्माण करते. | ☐ | ☐ | ☐ |
| 6) | केवळ निर्देशन म्हणजे शिक्षण नाही कारण निर्देश दिले जातात व शिक्षण प्राप्त केले जाते. | ☐ | ☐ | ☐ |
| 7) | निर्देश बाहेरून दिले जातात पण शिक्षक शिष्याच्या हृदयातील प्रज्वलीत व गुरूद्वारा संरक्षित आंतरिक वस्तु आहे. | ☐ | ☐ | ☐ |
| 8) | "Self Cleansing" ही प्रक्रिया शिक्षणाच्या माध्यमातून व्हायला हवी. | ☐ | ☐ | ☐ |
| 9) | शालेय व व्यावसायिक शिक्षण पूर्ण केल्यावर बाह्यजगात पाउल टाकतांना विश्वाच्या रचनेत आपले नेमके स्थान काय आहे हे कळायला हवे. | ☐ | ☐ | ☐ |
| 10) | आज विद्यार्थी शिक्षित होतो पण ज्ञानी होत नाही. | ☐ | ☐ | ☐ |

11) नैतिक सौदर्यं, सांस्कृतिक महानता, राष्ट्रीय संघटन, रचनात्मक उत्पादनक्षमता, अनुशासीत उन्नती हे गुण शिक्षणातून विकसित व्हायला हवे.

12) अहंकाररहित कर्म करण्याची भावना म्हणजेच यज्ञभावना व्यक्तीमध्ये विकसित व्हायला हवी.

13) शांतता ही बाह्य परिस्थितीने प्रस्थापित होत नाही तर यज्ञ भावनेने तयार होते.

14) सर्व साक्षर झाले म्हणजे सुशिक्षित झाले असे म्हणता येणार नाही.

15) बाह्य उपचारांनी नविन विचारांचे रोपण होऊ शकते पण शिक्षणाचे अंतिमलक्ष आत्मपरिवर्तन आहे.

16) Transfusion of Idea नको शिक्षणातून Transformation आवश्यक आहे.

17) विद्यार्थ्यांला उच्च आदर्शाप्रत न्यायचे असेल तर गुरूला शिष्याच्या बौद्धिक स्तरापर्यंत येऊन त्याचा बौद्धिक स्तर वाढवाव लागेल.

18) पुस्तकातून मिळालेले ज्ञान मनन चिंतनाने आत्मसात करावे लागते त्यानंतर काही काळ त्यावर सराव करावा लागतो.

19) शिक्षण ही शिष्यांची आत्मज्योत आहे. जी शिक्षक जोपासतात.

20) शिक्षणातुन व्यक्तीचा Mental Attitude बनायला हवा.

21) ईश्वराच्या न्यायाशी मानवाने गैरवर्तन करू नये हा पर्यावरण शिक्षणामागील दृष्टिकोन असावा.

22) वर्तमान काळात मुलांच्या सुंदर स्वभावाची निर्मिती करण्यात यावी.

23) बालकांना खरा विचार करावयास शिकवायला हवे.

24) आज मुलांना असे शिक्षण मिळावे की त्यांनी विनाशकारी निषेधात्मक भावनांचा अंगीकार करू नये त्याचे जीवन रचनात्मक असावे.

25) शिक्षणातून सांस्कृतिक नुतनीकरण आवश्यक आहे.

26) उदात्त ध्येय जर व्यक्तीसमोर असेल तर व्यक्तीला त्याच्या क्षमतांचा शोध लागतो.

27) राष्ट्राची समृद्धी राष्ट्राची प्रगती हे मानवाचे ध्येय हवे

28) शिक्षणाचे ध्येय Labour किंवा Worker निर्माण न करता Man of acheivement निर्माण करणे हा आहे.

29) Stop dirting and posioning the river, the river will purify हा पर्यावरण शिक्षणाबाबत दष्टीकोन हवा.

30) मानवात शारीरिक,मानसिक,बौद्धिक व अध्यात्मिक असे चार प्रकारचे व्यक्तित्व असतात.

31) चारही व्यक्तीत्वाचा एकात्मिक विकासानंतर मानवाचा व्यक्तीमात्व विकास घडून येतो.

32) व्यक्तीमत्व हे कर्मप्रधान बुद्धिप्रधान व भावनाप्रधान असते.

33) व्यक्तीच्या मन आणि बुद्धीमध्ये ताळमेळ नसल्यामुळे व्यक्तिमत्त्व लंगडे पडते.

34) व्यक्तीमत्त्व पांगळे बनल्याने जीवनातील आव्हाने माणुस पेलू शकत नाही.

35) ज्याने आपल्या मन बुद्धिला योग्य शिक्षण देऊन त्यांच्यात सुसंवाद निर्माण केला,

आहे तोच परिपूर्ण मानव होय. ☐ ☐ ☐

36) शिक्षणातून मन व बुद्धी असा समतोल विकास अपेक्षित आहे पण तो आज होतांना आढळत नाही. ☐ ☐ ☐

37) आयुष्यातील द्वंद्व पेलण्याची क्षमता शिक्षणातून व्यक्तीमध्ये निर्माण व्हायला हवी. ☐ ☐ ☐

37) जीवनात कोणत्याही परिस्थितीत मनाचा समतोल राखण्याची कला मानवामध्ये निर्माण व्हायला हवी. ☐ ☐ ☐

38) मनबुद्धीचा समतोल राखणे म्हणजे अहंकाराचे विस्मरण होय हे शिक्षणातून साध्य व्हायला हवे. ☐ ☐ ☐

39) सतत व प्रामाणिक आत्मप्रयत्नाशिवाय आत्मोन्नती व आंतरिक विकास शक्य होणार नाही. ☐ ☐ ☐

40) वर्तमान, भूत व भविष्य ह्या तिनही काळाबाबत विचार हे व्यक्तीमत्त्वाचे नाशाचे तीन स्त्रोत आहेत. ☐ ☐ ☐

41) व्यक्तीमत्त्वाचा नाश रोखण्यासाठी पुढील तीन उपाय आहेत.

अ) इंद्रियाची द्वारे संयत करणे. ☐ ☐ ☐

ब) मनाला हृदयाच्या ठिकाणी स्थिर करणे. ☐ ☐ ☐

क) निरंतर मनाच्या एकाग्रतेचा अभ्यास करणे. ☐ ☐ ☐

ड) ओम् ह्या अक्षराचे उच्चारण करणे. ☐ ☐ ☐

42) व्यक्तीमत्त्वाचे आंतरिक घटक हे प्रत्येक व्यक्तीमध्ये समान असतात. ☐ ☐ ☐

43) व्यक्तीमत्त्व संकल्पनेत सत्व, रजो व तम गुणांचा विचार हा प्राधान्याने करण्यात येतो. ☐ ☐ ☐

44) मानवांचे आंतरिक व्यक्तीमत्त्व महत्त्वाचे आहे. ☐ ☐ ☐

45) मानव आपल्या आंतरिक जगतानुसार आपले बाह्य जग जगतो. ☐ ☐ ☐

46) मानवाचे चारित्र्य व त्यांचे व्यक्तीमत्त्व हे त्यांच्या बाह्य जगताचे अनुभव निश्चित करित असतात. ☐ ☐ ☐

47) आंतर व्यक्तीमत्त्वाच्या पुनर्समायोजनाशिवाय बाह्य जगाचा विकास होऊ शकत नाही. ☐ ☐ ☐

48) अंतर्गत सौदर्यं वाढविल्याशिवाय Quality of life सुधारणार नाही. ☐ ☐ ☐

49) सकारात्मक सद्‌गुणांचे हृदय व सृजनशील बौद्धिक मूल्य असल्याशिवाय मानव समाज सुद्धा बनणार नाही. ☐ ☐ ☐

50) केवळ भौतिक समृद्धी म्हणजे जीवनाचे ध्येय नाही तर ते साधन आहे. ☐ ☐ ☐

51) स्वतःला जाणून घेणे हेच जीवनाचे ध्येय आहे. ☐ ☐ ☐

52) जीवनाचे ध्येय हे परिपूर्ण सुख असलेच पाहिजे की जेथे सर्व संघर्ष संपुष्टात येऊन शांतता प्रस्थापित होते. ☐ ☐ ☐

53) जीवनात आनंद प्राप्त करण्यासाठी स्वसमायोजन आवश्यक आहे. ☐ ☐ ☐

54) आत्मसंयमामुळे आंतरिक व्यक्तिमत्त्व सबल होते. ☐ ☐ ☐

55) आत्मसंयमन व इंद्रीय नियंत्रणासाठी सुसंस्कार आवश्यक आहेत. ☐ ☐ ☐

56) मनाच्या पूर्ननिरीक्षणाच्या द्वारा आत्मसंयमाची प्राप्ती होऊ शकते. ☐ ☐ ☐
57) जीवन ध्येयांच्या प्राप्तीसाठी एकात्म व्यक्तीमत्त्वाचा विकास करावा लागेल. ☐ ☐ ☐
58) पुढील जीवन ध्येय ही मानवाच्या उन्नतीसाठी आवश्यक आहेत. ☐ ☐ ☐

1) To realised pure awareness ☐ ☐ ☐
2) To rediscovery of self ☐ ☐ ☐
3) To gain peace and Joy ☐ ☐ ☐
4) Detachment from body mind and intellect. ☐ ☐ ☐
5) Detachment from low values ☐ ☐ ☐
6) Detachment from ownership. ☐ ☐ ☐
7) Self control ☐ ☐ ☐
8) Self critisim ☐ ☐ ☐
9) Self development ☐ ☐ ☐
10) Self less work ☐ ☐ ☐
11) Self realigetion ☐ ☐ ☐
12) Self Education ☐ ☐ ☐
13) Self effort ☐ ☐ ☐
14) Self Improvement ☐ ☐ ☐
15) Self perfection ☐ ☐ ☐
16) Self recognition ☐ ☐ ☐
17) Rehabilitation of personality ☐ ☐ ☐
19) Re-management of personality. ☐ ☐ ☐

59) केवळ संपादन करणे आणि खर्च करणे व त्याचकरिता जीवन व्यतीत करणे हे जीवनध्येय संकुचित आहे. ☐ ☐ ☐
60) बाह्य विषयवस्तुवर अवलंबून नसणाऱ्या पूर्ण समाधान व आनंदाची प्राप्ती करून घेणे हे जीवनाचे ध्येय आहे. ☐ ☐ ☐
61) आध्यात्मिक सामर्थ्य वृध्दी हेच भौतिक आव्हानांना एकमेव उत्तर आहे. ☐ ☐ ☐
62) मानवाने ''मी पणाच्या जोखडातून स्वतःचे मुक्तता करू घ्यायला हवी'' ☐ ☐ ☐
63) जीवनाचा शोध घेतल्यांनेच मानवी जीवनाची दुःखे नष्ट होतील. ☐ ☐ ☐
64) प्रत्येक व्यक्तीमध्ये सुप्त, दिव्य व क्षमता असतात. ☐ ☐ ☐
65) मानव म्हणजे चारित्र्य. ☐ ☐ ☐
66) जीवनात सुस्पष्ट व स्वतंत्र असे दोन मार्ग असतात. त्यापैकी योग्य मार्गाची निवड ही मानवाला अंतिम ध्येयापत घेऊन जाते. ☐ ☐ ☐
67) मन आणि बुद्धीचा समतोल विकास झाल्यास मानवी जीवनात सुसंवाद निर्माण होतो. ☐ ☐ ☐
68) आज मन आणि बुद्धी दुर्लक्षित राहिल्यामुळे मानवाचा आंतरिक विकास दुर्लक्षित आहे. ☐ ☐ ☐

69) मन–बुद्धीची गुणवत्ता आणि पोत ह्यावरच व्यक्तीमत्त्वाची गुणवत्ता निर्धारित होते. ☐ ☐ ☐

70) मनाचे संस्करण आणि बुद्धीचे प्रबोधन करूनच व्यक्तीचा व्यक्तीमत्वात उन्नती घडवून आणता येते. ☐ ☐ ☐

71) आज मन आणि बुद्धी केवळ दुर्लक्षित नाही तर त्याची फारकत झालेली आपणास आढळते. ☐ ☐ ☐

72) बाह्य अव्हानांना स्वीकारून व त्याच्याशी सामाना करून व्यक्तीमत्त्वात समतोल राखता येईल. ☐ ☐ ☐

73) शारीरिक दृष्टया आरोग्य संपन्न, मनाने आनंदी, बुद्धीने तिक्ष्ण, आत्मिक दृष्टया स्थीर असा समाज शिक्षणातून निर्माण व्हायला हवा. ☐ ☐ ☐

74) भविष्यकालीन सुखाची तयारी हे व्यक्तीचे जीवनध्येय आहे. ☐ ☐ ☐

75) अंतर्बाह्य मनावर स्वामित्व मिळविणे हे मानवाचे ध्येय आहे. ☐ ☐ ☐

76) उच्च आदर्श समोर ठेऊन समर्पण भावनेने कर्म केल्यास मन शुद्ध होते व अशा मनात ज्ञान रूजते. ☐ ☐ ☐

77) प्रभावी अध्ययनासाठी भावना व विचारांच्या उपकरणांना शुद्ध करण्याची व त्याची जुळणी करण्याची आवश्यकता आहे. ☐ ☐ ☐

78) विज्ञान प्रयोगशाळेत ज्याप्रमाणे साधनांची जुळवाजुळव केल्याशिवाय प्रयोग करता येत नाही त्याचप्रमाणे अध्ययनासाठी विविध मानसिक उपकरणांची जुळवाजुळव आवश्यक ठरते. ☐ ☐ ☐

79) कोणत्याही शास्त्राचे अध्ययन करण्यासाठी त्या शास्त्राबाबत आदर श्रद्धा व पूज्यभाव असावा लागतो. ☐ ☐ ☐

80) प्रभावी अध्यापनासाठी गुरूच्या सान्नीध्याची आवश्यकता आहे. ☐ ☐ ☐

81) तुलना करणे हा आकलनाचा एक मार्ग आहे. ☐ ☐ ☐

82) काही उच्च आदर्श प्राप्त करण्यासाठी चुका आणि शिका ह्या पद्धतीचा आपण उपयोग करावयास हवा. ☐ ☐ ☐

83) व्यक्तीचे जन्मपूर्व अध्ययनही त्याच्या व्यक्तीमत्त्व विकासाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे आहे. ☐ ☐ ☐

84) प्रभावी अध्ययनासाठी खालील बाबींची आवश्यकता आहे.

अ) ब्रम्हचार्य ☐ ☐ ☐

ब) शुद्ध अन्नसेवन ☐ ☐ ☐

क) शुद्ध विचार ☐ ☐ ☐

ड) नियमित ईषचिंतन ☐ ☐ ☐

85) आंतरराष्ट्रीय शांततामय जीवनासाठी, मानवाला त्यांच्या जीवनात जास्तीत जास्त शांतता मिळविण्यासाठी शांतीपाठाची आवश्यकता आहे. ☐ ☐ ☐

86) जगाला शांततेकडे जायचे असेल व सांस्कृतिक परिपूर्णतेच्या अधिक विशाल मंदिराकडे जायचे असेल तर नित्य शांतीपाठाची आवश्यकता आहे. ☐ ☐ ☐

87) जेव्हा कार्य दिसून येते तेव्हा बुद्धीला ते समजून घेण्याच्या प्रयत्न म्हणून त्याच्या कारणांचा शोध घ्यावयास पाहिजे. ☐ ☐ ☐

88) कार्यकारण भाव शोधन हा बुद्धीचा कधीही न संपणारा खेळ असतो म्हणून अध्ययनासाठी कार्यकारण भाव शोधन पद्धती महत्त्वाची ☐ ☐ ☐

89) प्रभावी अध्ययनासाठी चिंतन पद्धत महत्त्वाची आहे ☐ ☐ ☐

90) व्यक्तीमत्त्व विकसित करण्यासाठी आत्मनिरीक्षण पद्धत महत्त्वाची आहे. ☐ ☐ ☐

91) अध्यापनासाठी चर्चा पद्धत व प्रश्नोत्तर पद्धत स्वयंशोधन पद्धत महत्त्वाची आहे. ☐ ☐ ☐

92) स्वतःचे मुल्यांकन करणे स्वतःचे बदलचे निदान करणे, आणि आपण प्रत्यक्षात कोण आणि कसे आहोत हे समजणे ही भावनिक बुद्धीमत्ता वाढविण्यासाठी आवश्यक आहे. ☐ ☐ ☐

93) आत्मनिरीक्षण व आत्मविश्लेषण ही स्वयंअध्ययनाची प्रभावी पद्धती आहे. ☐ ☐ ☐

94) आत्मपरीक्षण अध्ययन पद्धतीत आत्मनिरीक्षण, शोधन, निषेध व बदली योजना हे टप्पे महत्त्वाचे ठरतात. ☐ ☐ ☐

95) अध्ययनासाठी श्रवण, मनन निदीध्यासन आवश्यक आहे.

96) Self cleansing ह्या प्रक्रियेसाठी Moral Living, Ethical standards, virtues, cultural values ह्यांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. ☐ ☐ ☐

97) श्रवण पद्धतीने अध्ययन दृढ होते.

98) श्रवण पद्धतीत पुढील क्षमता विकसित होतात.

1) Ability of understanding 2) Self awareness 3) Self application ☐ ☐ ☐

99) अध्ययनासाठी Learning Mind ची आवश्यकता आहे. ☐ ☐ ☐

100) बाह्य जगाचे अध्ययन करण्यासाठी बौद्धिक विश्लेषण पद्धती योग्य आहे. ☐ ☐ ☐

101) विविध शास्त्रातील ज्ञान हे औपाधिक ज्ञान आहे परिणामी त्या शास्त्राला मर्यादा आहेत. ☐ ☐ ☐

102) ज्ञान आणि विज्ञान ह्यातील फरक व्यक्तीला समजायला हवा. ☐ ☐ ☐

103) तत्वज्ञ आणि शास्त्रज्ञ ह्यांच्यातील फरक इतकाच की त्यांच्या अन्वेषणाचे क्षेत्र भिन्न आहे. ☐ ☐ ☐

104) विज्ञान हे प्रायः आपल्या सभोवतालच्या जगातील वस्तुभाव आणि त्यांचे आकृतीबंध ह्याचे पुनर्समायोजन आणि पुनर्आखणी करून सुख मिळवून देण्याची आशा बाळगते. ☐ ☐ ☐

105) विज्ञानाने मानवाला चिकित्सक दृष्टीकोन दिला पण स्वयंअध्ययनाचा चिकित्सक दृष्टीकोन दिला नाही. ☐ ☐ ☐

106) एखाद्याला शिष्य म्हणून स्वीकारल्यानंतर त्याला ममतेने प्रेमाने मार्गदर्शन करणे हे गुरूचे कर्तव्य आहे. ☐ ☐ ☐

107) गुरूला शिष्याबद्दल अपत्वप्रेम असावे.

108) शिष्याने आपल्या आज्ञेचे पालन करावे असे जर वाटत असेल तर गुरुने शिष्याच्या शंकाचे निरसन करावे. ☐ ☐ ☐

109) गुरूशिष्यात प्रेमाचे संबंध निर्माण झाल्यावर गुरूला शिकविण्याची उर्मी येते. ☐ ☐ ☐

110) तु पैसे दे मी शिकवतो अशी व्यापारी वृत्ती गुरूच्या ठिकाणी नको. ☐ ☐ ☐

111) ज्या ठिकाणी प्रेम, मित्रत्व, स्वातंत्र, परस्पर समज ह्याचे सहानुभूतीचे वातावरण असते अशाच ठिकाणी बुद्धीचा मनाचा चांगला विकास होतो. ☐ ☐ ☐

112) गुरूबद्दल श्रद्धा आदर पुण्यबुद्धी गौरवाची नम्रवृत्ती ह्या चौकटीत राहून शिष्याने चर्चा करावी. ☐ ☐ ☐

113) शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये स्वतंत्र्यरित्या प्रत्येक गोष्टीचा अनुभव घेण्याचे सामर्थ्य निर्माण करावयाची प्रेरणा निर्माण करावयास हवी. ☐ ☐ ☐

114) जेव्हा गुरू शिष्यासोबत परिपूर्ण ताळमेळ साधतो तेव्हाच गुरू त्याला ज्ञान प्रदान करतो. ☐ ☐ ☐

115) विषयाचे अध्ययन करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये किमान ग्रहणशिलता असावयला हवी. ☐ ☐ ☐

116) प्रभावी अध्ययनासाठी विद्यार्थ्यामध्ये अध्ययनाबाबत रूची असावी त्या विषयाबाबत आदर असावा. ☐ ☐ ☐

117) शिक्षकाने आपल्या उच्चारात आणि विचारात समन्वय साधवा. ☐ ☐ ☐

118) ग्रहण केलेले ज्ञान स्वतःजवळ सुरक्षित ठेवण्याची क्षमता विद्यार्थ्यांत असावी. ☐ ☐ ☐

119) आचार्य व छात्र ह्यांचा एकमेकांशी सुसंवादी होतो तेव्हाच ज्ञानदानाची प्रक्रिया सुरू होते. ☐ ☐ ☐

120) ज्याला लोभ व अहंकार माहित नाही व जो सदा सद्चरित असतो तोच खरा आचार्य होय. ☐ ☐ ☐

121) गुरू हा केवळ ध्वनिमुद्रीका नको तर तो ज्ञानाने आचारणाने परिपूर्ण हवा. ☐ ☐ ☐

122) चांगले गुरू हे आपल्या शिष्याची स्वतंत्रपणे चर्चा करण्याची शक्ती गुदमरून टाकून देणारे नसतात. ☐ ☐ ☐

123) विद्यार्थी तेव्हाच शिस्तप्रिय होईल, जेव्हा शिक्षक सदाचारी होतील.

124) मानव संस्कृतीची दखल, नैतिक दर्जा, किंवा सदाचाराची झाळाळी विद्यार्थ्याच्या व्यक्तीमत्वाला प्रदान करायची असेल तर विद्यार्थ्याने आपल्या मनात प्रेम पूज्यभाव व सख्यत्व ह्या भावना बाळगुन शिक्षकाजवळ जाणे आवश्यक आहे. ☐ ☐ ☐

125) गुरूचे आचरण हे शुद्ध असायला हवे कारण शिष्य त्याच्या बाह्य सवयीचे अनुकरण करतात. ☐ ☐ ☐

126) गुरू हा उदार अंतकरणाचा उदार दयाळू व सहिष्णु असावा. ☐ ☐ ☐

127) विद्यार्थ्याला गुरूचा उपदेशाच्या प्रति अरूची असेल तर काहीही ग्रहण करू शकणार नाही त्याच्या अंतःकरणात काहीही झीरपु शकणार नाही.
नविन संकल्पना मुळ धरू शकणार नाही. ☐ ☐ ☐

128) शिक्षकाने निर्देष देऊन मुलांना ज्ञान आत्मसात करण्यास प्रयत्न करावयास हवे. ☐ ☐ ☐

129) शिक्षकांमध्ये खालील गुण असायला हवेत.

1) Living the Ideals that have been intellectually comprehended during the studies (Satyam) ☐ ☐ ☐

2) The practice of what is right and proper as indicate in the scripture ☐ ☐ ☐

3) A spirit of self sacrifice and self denial ☐ ☐ ☐

4) Control of the senses.

5) Tranquility of mind

6) Doing ones duty towards humanity

130) राष्ट्र हे नागरिकांनी बनते जर नागरिक बलवान कुशल पराक्रमी आणि त्यागी असतील तर राष्ट्रही बलवान होते.

131) केवळ भुखंडावर वास्तव्य करणाऱ्या लोकांचा समूह म्हणजे राष्ट्र नव्हे तर हा लोकसमूह जेव्हा सुसंघटीत कार्यक्रमासाठी एकत्रित येतो आणि समान ध्येय गाठण्यासाठी निष्ठेने झटत असतो. तेव्हाच राष्ट्राची घडण होते.

132) राष्ट्राचे सामर्थ्य व गुणात्मकता ही व्यक्तीचे सामर्थ्य व गुणात्मकता यावर अवलंबून आहे.

133) एकात्मतेची भावना निर्माण करण्यासाठी धार्मिक तत्त्वाचे संस्कार करावे लागतील.

134) जेव्हा एखादा जनसमूह प्रदीर्घ काळपर्यत विशिष्ट भौगौलिक क्षेत्रात जीवनाच्या काही तात्त्विक मूल्यांचा आणि सद्गुणांचा आदर करित जीवन जागत असतो व त्यातून जो जीवन सुगंध पसरतो त्यास संस्कृती म्हणतात.

135) Adaptation to new environment हे जीवन ध्येय आहे.

136) “Material and spiritual welfare of all” is a great goal brining about integration.

137) राष्ट्रीय व भावनिक एकात्मता घडवून आणायची असेल तर उत्कृष्ट व्यक्तीमत्त्वाच्या आदर्शाचे उदा. विद्यार्थ्यांसमोर ठेवावे लागतील.

138) विद्यार्थ्याला आपल्या शिक्षकाला केवळ प्रश्न करण्याचे स्वातंत्र्यच नाही तर उत्तर प्राप्त करण्याचा अधिकार आहे.

139) ध्येयाच्या प्रति भक्ती आणि समर्पकता, कर्मयोगाचे आचारण, समाजसेवा, हृदयश शुद्धी संस्कृतीविकास हे आत्मशिक्षणासाठी आवश्यक अनुशासन आहे.

140) इतरांच्या हक्कांची जाणीव ठेवली तर ते शांती व समृद्धीच्या मार्गावर देशाला नेते ही जाणीव मानवाची विकसित व्हायला हवी.

141) भारतीय राज्यघटनेने मानवी स्वातंत्र्यास मान्यता दिलीपण त्यासोबतच अनेक आदेश व नियमसुद्धा त्यात दिले आहे ह्या बाबत व्यक्तीला भान हवे.

142) आत्मसंयमन व आत्माशिस्त हीच खरी शिस्त आहे.

143) जगताशी योग्य संबंध राखण्याची कला आपणास माहित असेल तरच आपण आपल्या व्यक्तीमत्त्वाला शिस्त लावू शकतो.

144) केवळ शारीरिक शिस्त पुरेशी नाही त्याचबरोबर विद्यार्थ्यामध्ये मानसिक शिस्तही आवश्यक आहे.

145) आंतरिक व बाह्य मनाच्या कार्यात सुंसंवाद निर्माण करणे हेच मानवाचे ध्येय आहे.

146) बहिर्मूख मन व अंतर्मूख मन दोन्ही बाजू समन्वयाचे काम केल्यासच मानवाच्या व्यक्तीमत्वात समन्वय निर्माण होतो.

147) जीवनातील विविध समस्यांना सामोरे जाण्याची क्षमता मानवामध्ये निर्माण व्हायला हवी.

148) जीवनध्येय व जीवनमार्ग ह्यात समन्वय असावा.

149) धर्म म्हणजे Low of Being

150) खऱ्या धर्माचा आशयलोकांपर्यत पोहाचायला हवा.

151) वर्णव्यवस्थेचा खरा आशय आजही समाजापर्यत पोहोचलेला नाही.

152) संस्कृती संवर्धन व सांस्कृतिक जतन महत्त्वाचे आहे.

153) संस्कृतीचे आध्यात्मिक संस्कृतीचे शिक्षण घ्यायला हवे.

154) संस्कृतीचे रक्षण करणाऱ्या महानुभवांच्या जीवनाचे व कार्याचे ज्ञान व्यक्तीला करून द्यावे.

155) बहुजन समाजाच्या मनातून संस्कृतिबाबत निरर्थक भिती काढून टाकल्याशिवाय पुनरूत्थान होऊ शकत नाही.

156) अध्यात्मिक अधिकार हा मानवाचा सर्वश्रेष्ठ मानवाधिकार आहे.

157) स्वतःवर प्रभुत्व मिळविणे हा मानवाचा विशेष अधिकार आहे.

158) शिक्षणातून Standard fo living and standard of life दोन्हीचा विकास व्हायला हवा.

159) देशातील उर्ध्वयु स्वतः ठामपणे जगत असतात, तेव्हाच जीवनाची मूल्य पुनरूजीवीत होतात.

160) देशाचा पुढारी जर चांगला असेल तर देशाचे नागरिक आपोआप त्याचे अनुकरण करतील.

161) देशाचे नेते जेव्हा उच्च जीवनाचा विचार करतात त्याचवेळी तात्त्विक व्यावहारिक मुल्यांचे व अध्यात्मिकतेचे पुनरूज्जीवन देशात मुळ धरू शकते.

162) आत्मसंयमन सदाचार व नैतिक मूल्ये ह्याचे शिक्षण महत्त्वाचे आहे.

163) व्यक्तीची संकल्पशक्ती वृद्धीगत व्हायला हवी.

164) मनाला उच्च आदर्शाचे ध्येय देणे आवश्यक आहे.

165) हे विश्वची माझे घर ही भावना दृढ व्हायला हवी.

166) स्वतःचे सत्य स्वरूप जाणुन घेणे हा मानवाचा जन्मसिद्ध अधिकार आहे.

167) नैतिक मूल्य हे जीवनाचे अभिन्न अंग कसे बनेल ह्याची प्रक्रिया महत्त्वाची आहे.

168) पूर्ण विश्व हे घर असून सर्व प्राणी हे त्याचे निवासी आहे ही सहअस्तीत्वाची भावना व्यक्तीमध्ये निर्माण होणे महत्त्वाचे आहे.

169) If people come togather with common Ideal or goal to which they are edicated there is integration

170) शांतता पूर्ण व आनंदात सहजीवन जगणे हा मानवाचा विशेषाधिकार आहे.

171) ज्ञानग्रहण हे ज्ञानाकडून अज्ञाताकडे होते

172) स्थानिकतेकडून वैश्विकतेपर्यत नेणारे ज्ञान असावे.

173) जे ज्ञान पाठयपुस्तकात मिळत नाही ते ज्ञान बाहेरून प्राप्त करण्याची क्षमता व्यक्तीत निर्माण करायला हवी.

174) संस्कृत भाषेचे अध्ययन हे आवश्यक आहे.

175) व्यक्ती हा पर्यावरणाचाच एक भाग आहे.

# मानवी व्यक्तिमत्व विकासाचे स्वरूप व शिक्षण

## सारांश

प्रा. पाटील वैशाली दादासाहेब
श्रीमती काशिबाई नवले,
कॉलेज ऑफ एज्युकेशन ॲन्ड
ट्रेनिंग, कुसगांव
(बु!!)लोणावळा, जि. पुणे.
४१० ४०१.
patilvd27@rediffmail.com
Mob. 9763851946

आपल्या आजूबाजूला एखादी उंचपुरी, गोरी, देखणी ऐटदार चाल असलेली रूबाबदार वागणे, व्यवस्थित राहणी असलेली व्यक्ती पाहिल्यावर आपण सहजपणे म्हणतो वा ! काय छान पर्सनॅलिटी आहे. याउलट एखादा किरकोळ शरीरयष्ठीचा गबाळा पोशाख केलेला, अव्यवास्थेत राहणी असलेला माणूस पाहिल्यावर आपल्याला सहजपणे म्हणावेसे वाटते की, त्या माणसाला काही व्यक्तिमत्व नाही. आपण व्यवहारात व्यक्तिमत्व हा शब्द अतिशय सैलपणे वापरतो पण त्याचवेळी किरकोळ शरीरयष्ठी व अतिशय साधी राहणी असणा—या महात्मा गांधी,

लालबहादूर शास्त्री, मदर तेरेसा यांना मात्र आपण 'ग्रेट पर्सनॅलिटीज ऑफ इंडिया' असे म्हणतो. यावरून व्यक्तिमत्व म्हणजे केवळ बाहय रूप, रंग, कपडे, राहणी नसून त्या व्यतिरीक्त अन्य अनेक बाबींचा समावेश होत असल्याचे स्पष्ट होते. अशी व्यक्तिमत्व ही एक व्यापक व संकीर्ण संकल्पना आहे.

व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण आणि समतोल विकास हे शिक्षणाचे अंतिम आणि व्यापक उद्दिष्ट आहे. म्हणूनच शिक्षण व व्यक्तिमत्व यांचा घनिष्ट संबंध आहे. त्यासाठीच आपण ज्याचा विकास करावयाचा ती व्यक्तिमत्व ही संकल्पना काय आहे हे समजून घेणे अतिशय आवश्यक आहे.

## प्रस्तावना :—

इंग्रजीतील personality या शब्दसाठी मराठीमध्ये आपण व्यक्तिमत्व हा शब्द वापरतो. हा शब्द persona या लॅटिन शब्दापासून बनलेला आहे. persona म्हणजे मुखवटा पूर्वी नाटकातील पात्रे भुमिकेप्रमाणे मुखवटे धारण करत व नाटकातील भूमिका वठवत असत. यात मुखवटे घालुन केवळ त्या पात्रासारखे दिसणे एवढेच अभिप्रेत नसे, तर त्या विशिष्ट पात्राची गुनवैशिष्टये ही त्या भूमिकेत दाखवावी लागत म्हणजे व्यक्तिमत्व हे केवळ बाहय मुखवटा नसून अधिक काही आहे. म्हणूनच ऋग्वेदकालीन भारतीय तत्वज्ञानातही व्यक्तिमत्वाचा विचार केलेला आढळून येतो.

**व्यक्तिमत्वाच्या व्याख्या :—**

मनसशास्त्रज्ञांनी व्यक्तिमत्वाच्या ज्या काही व्याख्या केल्या आहेत त्यापैकी काही प्रमुख व्याख्या खालीलप्रमाणे.

१. Personality is the sum total of all the biological innate dispositions, impulses, tendencies and instincts of the individual and the dispositions and tendencies acquired by experiences.

------ Morten Prince

'व्यक्तिमत्व म्हणजे व्यक्तिच्या जैविक मनोवृत्ती, स्वभाव वैशिष्टये, ऊर्मी, सहजप्रवृत्ती व अनुभवाने संपादित केलेलया मनोवृत्ती आणि स्वभाव वैशिष्टये यांचा समुच्चय होय'.

२. 'व्यक्तीची शरीररचना, वर्तनपध्दती, अभिरूची, अभिवृत्ती, बौध्दिक क्षमता, विविध योग्यता आणि प्रगट वैशिष्टयांच्या संघातला व्यक्तिमत्व म्हणतात'.

३. 'व्यक्तीचे इतरांहून वेगळेपण दाखविणारे आणि त्याचवेळी इतर लोक तिच्याशी कसे वागतात हे निश्चित करणारे, साधारणत: स्थायी स्वरूपाच्या वैशिष्टयांच्या अनन्यसाधारण संघटनास व्यक्तिमत्व असे म्हणतात.

४. व्यक्तिमत्व म्हणजे व्यक्तीचे स्वत:च्या परिसराशी होणा—या वैशिष्टयपूर्ण आणि एकमेवाव्दितीय समायोजनास कारणीभूत असणारे, वर्तनाला चालना देणारे शारीर —मानसिक यंत्रणांचे गतिशील संघटन होय.

या व्याख्यांवरून स्पष्ट होते की, व्यक्तिमत्व हे व्यक्तीच्या कोणत्याही एका शारीरिक, मानसिक गुणधर्मात सामावलेले नसून ते संघातस्वरूपी आहे. या संघातस्वरूपी घटकांमध्ये केवळ सुसंगतपणे व सातत्याने दिसून येणा—या शारिरीक, मानसिक, सामाजिक गुणधर्मांचा समावेश होतो. व या व्यक्तिमत्वा च्या गुणधर्मांचा अविष्कार समाजामध्येच दिसून येतो. कोणत्याही व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा इतर व्यक्तींवर प्रभाव पडतो. हा प्रभाव शारिरीक व मानसिक गुणधर्मांचा एकत्रित प्रभाव पडतो. मानसिक गुणधर्मात कल, अभिरूची, अभिवृत्ती, कृतिक्षमता, बुध्दिमत्ता इ. गोष्टी असतात म्हणून व्यक्तिमत्व हे या सर्वांचा संघात होय.

व्यक्तिमत्वाचा विकास — प्रत्येक व्यक्ती जन्मास येताना आपल्याबरोबर शरीराचा रंग व ठेवण, बुध्दिमत्ता इ. गोष्टी घेवून जन्मास येते अशा व्यक्तीकडील उपजत बाबींना जैविक बीजे म्हणतात. जीवन जगत असताना विविध बाहय घटकांचा, सामाजिक घटकांचा व्यक्तीच्या विकासावर परिणाम होत असतो. जैविक बीजे आणि बाहय घटक यांच्यातील आंतरक्रियेचा परिमाक म्हणजेच व्यक्तीचे व्यक्तिमत्व होय. या व्यक्तिमत्व विकासात वाटा असणारे घटक खालीलप्रमाणे.

**(अ) जैविक घटक –**

१. शारीरचना




२. अंत:स्त्राव ग्रंथी ३. बुध्दिमत्वा व

कार्यशक्ती

१. शरीरचना – व्यक्तीची शरीररचना ही व्यक्तिमत्व– विकासातील महत्त्वपूर्ण घटक आहे. व्यक्तीच्या शरीररचनेचा तिच्या समायोजनावर चांगला अथवा वाईट परिणाम होतो. शारीरिक दोषांचा व्यक्तीच्या भावनिक व सामाजिक विकासावर अनिष्ट परिणाम होतो.

२. अंत:स्त्राव ग्रंथी:– अंत:स्त्राव ग्रंथींचे कार्य ही व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असून आपल्या शरीरात मस्तकग्रंथी, कंठग्रथी, वृक्कस्थग्रंथी, लैगिक ग्रंथी इ. कार्य करीत असतात. या ग्रंथींतून स्त्रवणा–या स्त्रावाचे प्रमाण कमी–जास्त झालास व्यक्तीच्या व्यक्तीमत्वावर परिणाम होतो.

३. बुध्दिमत्ता व कार्यशक्ती — बुध्दिमत्ता व कार्यशक्ती या आपणास आनुवंशिक देणग्या असतात. या क्षमतांचा व्यक्तिमत्व विकासात मोठा वाटा असतो. कुशाग्र बुध्दिमत्तेची व्यक्ती कोणतेही काम सहजपणे करू शकते ज्यामुळे त्याच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होत असते.

**(ब) बाहय घटक —**




१. कुटुंब — व्यक्तिविकासाची सुरूवात कुटुंबात होते. हा व्यक्तीचा पहिला समाज असून कुटुंबाचा आर्थिक सामाजिक दर्जा, सदस्यांचे आंतर—वैयक्तिक संबंध, कुटुंबाचा प्रकार, व्यक्तीचा जन्मक्रम या सर्व बाबींचा परिणाम व्यक्तिमत्व विकासावर होतो.

२. शाळा — व्यक्तिमत्वाचा समतोल विकास करण्यासाठी जाणीवपूर्वक तयार केलेली समाजाची प्रतिकृती म्हणजे शाळा. शाळेतील अभ्यासक्रम, अभ्यासपूरक कार्यक्रम यांचा उपयोग विदयार्थ्यांच्या सुप्त क्षमतांचा शोध घेण्यासाठी व त्या क्षमतांचा विकास होईल असे वातावरण आणि संधी निर्माण करण्यासाठी होता.

३. शेजार — शेजारच्या कुटुंबाची मूल्ये विश्वास, आदर्श, शेजारच्या कुटुंबातील व्यक्तींचे आंतर—वैयक्तिक संबंध या सर्व गोष्टींचा परिणाम मुलांच्या व्यक्तिमत्व विकासावर होतो.

४. समवयस्क मित्र — व्यक्तीच्या स्व—संकल्पनेच्या विकासास मित्रपरिवार सहायक ठरतो. मित्रांच्या संगतीत नेतृत्व गुण, सहकार्य, सहिष्णुता या गुणांची जोपासना होते. मित्र विधायक असलयास व्यक्ती विधायक प्रवृत्तींची होते पण मित्रपरिवार अपप्रवृत्तीना प्रोत्साहन देणारा असल्यास व्यक्तीमध्ये समाजविघातक प्रवृत्ती बळावते.

५. समाज — प्रत्येक समाजातील काही रूढी, परंपरा, मूल्ये, सामाजिक नीतीनियम यांचे शिक्षण व्यक्तीला समाजात मिळत असते व त्यांचे पालन करत व्यक्तीचा विकास होत असतो. व्यक्ती आणि समाज यांच्या आंतरक्रियेतून व्यक्तिविकासावर परिणाम होत असतो.

६. भौगोलिक परिस्थिती — विशिष्ट भौगोलिक परिस्थितीतील व्यक्ती विशिष्ट शरीररचना, विशिष्ट स्वभाववैशिष्टये असलेली आढळतात ही स्वभाववैशिष्टये त्या त्या भागातील हवा पाणी, पीक परिस्थिती, उदयोगधंदे आणि या सर्वांसाठी करावे लागणारे कष्ट यामुळे निर्माण होतात व त्यातून विशिष्ट प्रकारचे व्यक्तिमत्व विकसित होते.

७. समूह संपर्कसाधने — व्यक्तींच्या मूल्यांवर, विचारांवर वर्तनावर समूह संपर्क साधनांचा प्रभाव आढळतो. रेडिओ, सिनेमा, टेलिव्हिजन, व्ही.सी. आर यासारखी अनेक समूह संपर्कसाधने

आढळतात. व्यक्तीतील विचार, प्रेरणा, भावना, मूल्ये, आंतरवैयक्तिक संबंध, सहानुभूती, सहकार्य, सहिष्णुता, सामाजिक नीतिमूल्ये यांच्या परिवर्तनात समूह संपर्कसाधने महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

**सुसंघटित व्यक्तिमत्वाची लक्षणे –**

| | |
|---|---|
| **सु** | → १. सुसमायोजित |
| **सं** | → २. स्व ची वास्तव ओळख |
| **घ** | → ३. आकांक्षा वास्तवतेशी सुसंगत |
| **टि** | → ४. उक्ती व कृतीत मेळ |
| **त** | → ५. वर्तनाचे पूर्वकथन करता येते. |
| **व्य** | → ६. वर्तनात सातत्य |
| **क्ति** | → ७. समाधानी, आनंदी, उत्साही, दीर्घोदयोगी |
| **म** | → ८. यशाने हुरळून जात नाही, अपयशाने खचत नाही |
| **त्वा** | → ९. संघर्षाला तोंड देण्याची तयारी |
| **ची** | → १०. वास्तव स्व व आदर्श स्व मधील अंतर |
| **ल** | → ११. चांगली निर्णय क्षमता |
| **क्ष** | → १२. जबाबदारी स्विकारण्याची तयारी |
| **णे** | → १३. समाजाभिमुख |

**सुसंघटित व्यक्तिमत्व निर्मितीतील शिक्षणाचे योगदान–**

विदयार्थ्यांचे व्यक्तिमत्व हे शाळा महाविद्यालयामधून घडत असते. विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यात अभ्यासक्रम, पाठयपुस्तके, सांस्कृतिक कार्यक्रम, कलांची जोपासना, विविध उपक्रम तसेच शिक्षक यांना अनन्यसाधारण महत्व असते. शिक्षकांनी जाणीवपूर्वक आयोजित केलेले विविध उपक्रम,कार्यक्रम, अध्यापन व्यक्तिमत्वाच्या विविध घटकांचे संघटन होण्यासाठी उपयुक्त ठरतात.

विदयार्थ्यांचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी विविध प्रकारचे खेळ आयोजीत करणे, स्पर्धांचे आयोजन करणे आवश्यक असते. विदयार्थ्यांकडून नियमितपणे व्यायाम करून घेतल्यामुळे त्यांचे आरोग्य उत्तम राहते. व्यक्तिगत खेळाबरोबर सांघिक खेळांचे आयोजन केल्यास विदयार्थ्यांमध्ये सहकार्याची व एकतेची भावना वाढील लागते.

विदयार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसीत होण्यासाठी बालवीर पथक, वीरबाला पथक, बॅंड पथक, एन.सी.सी., एन.एस.एस., विदयार्थिभांडार, संघ, दल, मंडळे, प्रथमोपचार शिक्षण केंद्रे इ. चे विशेष महत्त्व आहे. या विविध कार्यक्रमात प्रत्येक विदयार्थ्याला सहभाग होण्यासाठी संधी शाळांनी उपलब्ध करून दयावी.

विदयार्थ्यांच्या अंगी असणा–या उपजत कलागुणांना वाव देण्यासाठी शालेय उपक्रमांमधून, कलामंडळे स्थापून चित्रकला, रंगकाम,मातकाम,नाटय,संगीत, वादयवादन यामधून विदयार्थ्यांना आपला कलाविष्कार दाखवता येईल. शाळा–महाविदयालयांमधून सहलींचे

आयोजन करणे, शिबिरे घेणे, मुलाखतीघेणे, थोरामोठयांच्या भेटी घडवून आणणे, या उपक्रमांचा विदयार्थ्यांच्या गुणविकासास चांगला उपयोग होतो.

संदर्भ पुस्तके : —


१. नानकर, प्र.ल., शिरोडे, संगिता (२००५) सुबोध शैक्षणिक व प्रयोगिक मानसशास्त्र, नित्यनूतन प्रकाशन, पुणे.

२. गाजरे, रा.वि.,चिटणीस, अंशुमती (२००६) अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र आणि मानसशास्त्रीय प्रयोग, नित्यनूतन प्रकाशन,पुणे.

३. करंदीकर, सुरेश शैक्षणिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

## “Swami Chinmayanand’s Value Based Thoughts For The Present Era.”

**Swami Chinmayananda** (1916-1993) was born Balakrishna Menon (Balan) in Ernakulam, Kerala in a very devout Hindu family. Graduating from Lucknow University, he entered the field of journalism where he felt he could influence political, economic and social reform in India. But his life was changed when he met Swami Sivananda at Rishikesh and became very interested in the Hindu spiritual path.

Balakrishna Menon took sanyas/monkhood from Swami Sivananda to become Swami Chinmayananda - the one who is saturated in Bliss and Consciousness. Swami Shivananda saw the potential in Swami Chinmayananda and sent him to study under a great Guru in the Himalayas - Swami Tapovan Maharaj under whom he studied for 12 years. At the end of the education he decided to spread his teaching all over the world.

During his forty years of travelling and teaching, Gurudev opened numerous centres and ashrams worldwide; he also built many schools, hospitals, nursing homes and clinics. As well as reinvigorating India's rich cultural heritage, Swami Chinmayananda made Vedanta accessible to everybody regardless of age, nationality, or religious background.

On 3 August 1993, in San Diego, USA, Swami Chinmayananda attained Mahasamadhi. His work has created an international organization called the *Chinmaya Mission*. “Yathaa drishti tathaa srishti” -As the vision so the world appears to us.

If man’s vision is narrow and disturbed, the world also seems filled with strife. If the vision is broad and love-filled, so too is his world.

- These are days when everybody is talking of value-based things - value based education, value based commerce, value based politics. It has now become the fashion to talk about value based things. In America during vacation everywhere you find meetings and seminars

being held on value based matters. They talk in circles and no one seems to be sure of what they mean by 'Value'. Each one attaches meaning according to his purposes. Some people are in quest of wealth and for them money is value. Some people want power and for them power is value.

Value is that for which we put forth our efforts. This value determines the texture and quality of thoughts. Thoughts projected become actions and behaviour. So if the values of life are healthy, thoughts will be beautiful. When the thoughts are beautiful, behaviour also will be beautiful and appropriate, efficient and brilliant. These will yield brilliant results. It is on the basis of this fundamental scientific truth of man's inner personality and its function that all these ideas of ethics and morality were evolved.

Today unfortunately, many people particularly youth have no belief in ethical and moral values. They have a wrong understanding that those who talk of the discipline of ethics and morals, of do's and don’ts are unaware of what real freedom and enjoyment is, and are jealous when they see the youth enjoying. They argue that the creator has made such a beautiful world so that His creatures may enjoy. He has thoughtfully given us eyes, ears, nose, tongue and skin to enjoy the sense-objects and we would be ungrateful to Him if we refuse to enjoy. The hostess has very lovingly cooked beautiful food and you have been served it, and if you then say I am not eating it because I do not like it, what will she think of you? So the the youth will not agree if music, dance and similar avenues of enjoyment nowadays available are dubbed unethical, immoral or vulgar. They want to live in total permissiveness. "I feel like doing it and I just do it".

Look at the animals. They do not have any restrictions. If that is so, why not man also? He must also have full freedom. The do's and don’ts are born of religion; so religion must be discarded as it is a shackle. Thus goes the argument. We have to rethink over this.

The quality of your performance and its texture is ordered by, controlled by the quality and texture of your thoughts. If the thoughts are noble and serene, intelligent and creative, your performance will also be creative and beautiful. There is no question about it. It is nature's law that you will be a success. Success brings you happiness

and prospects.

“Everybody exists. It is only the few who live. To live you should have an ideal.”

To mould the behaviour of an individual is to mould the character of the community. This is what education strives to achieve. I believe that we can give a purposeful direction to a personality even in the days of its almost unconscious early childhood. Later on, no doubt we must hammer out for the child new extensions and open up new dimensions for its play in the society through literary, scientific and Social Studies. Whatever the child is to be later on say, a political leader, an economist, philosopher, a scientific scholar or a glorious artist, his contribution to the society will directly depend upon his character and personality.

In our country today, we find that we have mighty intellectuals equipped to act and to serve. Yet, everywhere we find nothing but ineffectual endeavours, crude confusions, a characteristic perversity, a suicidal indiscipline. In short the tragedy of our society today is the tragedy of our indiscipline. I have every hope that you and the dedicated members of the school will tenderly supplement the lack of right home atmosphere under which the teeming children of our country are getting distorted in their general growth.

The present convulsions of behaviour that is observed in all levels of our society can be directly attributed to the unsavoury growth of the real personality in the children. If your efforts can start a new movement of mental growth through this new scheme of giving a right lead for the inner expansion of the growing children, we shall have done a wonderful pioneer work in remaking a nation of ourselves.
“To love and to be loved is the greatest happiness in the universe.”

Very often we hear some people complaining that "nobody loves me." The world is full of love. But generally our hearts are not open for the love to gush in to us. And the door of your heart ever remains closed. Nobody other

than you can ever throw it open; for the door of your heart cannot be locked from outside and it can be open only from within.

You alone are in your heart. You unconsciously got locked in and you cry out to others to open up and release you. Nobody can. Stop crying. Open up and receive all love.

Love is the heart of religions, the theme of all classical works of art and literature and the song of all devotees. Scientists know only what love does... not what love is. Love can indeed empty our asylums, perhaps all our prisons, may be all our hospitals. People suffer in life due to lack of love. Love is to human hearts what sun is to flowers!

Love grows with knowledge of the beloved. To love, therefore, is to know... yet, to know is not necessarily to love.

We may often give without love, but we can never love without giving. Love is at once noun and verb... Love is something to be sustained and fulfilled, by loving. By loving alone can love be made to grow and thrive?

And our work is love made visible! When love is made to manifest, work is done. When we work only to produce profit or wages, work becomes crushing, sweating, joyless labor.

With love in our heart, let us put forth effort and flood the world with our work!

**Find Love Not Fault**

It takes two to make a quarrel. Also, it takes two to make up (patching up) after quarrel. Without invoking love, this can never be accomplished.

Flood your mind with love, look into the eyes of the other and embrace the person with whom you had quarreled. Words are not necessary. Both will have eyes flooded and joy-tears will wash away all quarrels for the time being. Try this. You will find this true every time. This is the power of love. This is the strength of love!

Faults become thick when love is thin. When love rises to swirl around us, and when we review in this clear light of love, the very faults get

transformed into the essential beauty in them. This is the magic touch of love, the miracle played by love.

When our hearts are full of love, life is a smiling valley of beauty and joy, romantic and divine. So never think that if you open up your heart love will come into it, unless you have unselfishly given it first. It is up to you to love, and not up to the world to love you in return. So do not be misled. Always keep the attitude of a giver and not a receiver.

Dr Mrs. Neelima S.
Tidke;
{M.A., M.Phil., P.hD}
Assistant Professor
Shri.Shivaji
College of Arts,
Commerce & Science,
Akola
Mob.No.9422864035

विषय : शिक्षण, संस्कृती आणि धर्म : सहसंबंध

**श्रीमती सुरेखा सुभाष सोनवणे**
चेंबूर सर्वंकष शिक्षण शास्त्र महाविद्यालय

प्राचिन भारतीय तत्वप्रणाली प्रामुख्याने धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या पुरूषार्थांवर आधारीत होती. ही चारही ध्येय परस्परावलंबी आहेत तरीही धर्माचे महत्व निर्विवाद आहे. उर्वरित अर्थ, काम आणि मोक्ष या ध्येयांचा पाया व आधार आहेत धर्म.

**All the other principles and values flow from this beautiful foundation of Dharma. Dharma is claim to be as an important factor in the maintenance of social stability and harmony.**

स्वामी विवेकानंद म्हणत, 'तत्वज्ञानाच्या बाबतीत आपल्या समाजाएवढे श्रेष्ठ तत्वज्ञान कोणाचेच नाही आणि अशा तत्वज्ञानाच्या विरूध्द व्यवहार करणारा आमच्या एवढा करंटा समाज दुसरा नाही.' त्यामुळे केवळ श्रेष्ठ तत्वांची जंत्री असणे, उपयोगाचे नाही, तर स्वत:च्या व्यवहारातून या तत्वांचा आदर्श जगासमोर ठेवणारा समाजही एवढाच महत्वाचा आहे. ११ सप्टेंबर १८९३ रोजी शिकागो

येथील धर्मपरिषदेत स्वामी विवेकांनदांनी संपूर्ण विश्वाचे लक्ष वेधून घेतले आपले विचार आणि वक्तृत्व यामधून विवेकांनदानी भारतीय संस्कृती व हिंदू धर्म याची महती जगाला पटवून दिली.

योगी अरविंद, स्वामी विवेकांनद, रविंद्रनाथ टागोर, महात्मा गांधी, या सर्व विचारवंतांचा ठाम विश्वास होता की, केवळ भारतच संपूर्ण विश्वाचे अध्यात्मिक नेतृत्व करू शकतो.

**The word "Dharma" comes from the Sanskrit root dhri, meaning to 'uphold' or to 'sustain' Dharma is right action, right conduct, virtue, moral law etc.**

धर्म म्हणजे सचोटी, धर्म म्हणजे निष्ठा आणि धर्म म्हणजे कर्तव्य परायणता. धर्म हाच संस्कृतीचा खरा पाया असतो. धर्म आणि संस्कृती यात अंतर नाही कारण, ते दोन्ही एकच आहेत. धर्मशास्त्राने सांगितलेला आधार म्हणजे संस्कृती !

संस्कृती म्हणजे काय ?
उपाशी असतांना जेवणं ही प्रकृती,
उपाशीपोटी दुस:याची भाकरी हिसकावणं ही विकृती,
उपाशी असलेल्या अर्धी भाकरी देणं ही संस्कृती !
संस्कृती माणसाला शिकविते ससुंस्कृतपणा.......

आजपर्यंत जगातील अनेक संस्कृतींचा लोप झाला पण, भारतीय संस्कृती कित्येक आघात पचवून जिवंत राहिली आहे व समस्त

विश्वाची मार्गदर्शक ठरली आहे कारण, भारतीय संस्कृतीचे अधिष्ठान आहे धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे पुरूषार्थ. भारतीय संस्कृती अनेक संतानी, महात्म्यांनी, वीरांनी घडविली आहे. समाजसेवक, क्रांतिकारक आणि ध्येयवेडया तरूणांनी ती जिवंत ठेवली आहे. अवतारी पुरूषांनी तिचे रक्षंण केले आहे. ती संस्कृती राम, कृष्ण, संत ज्ञानेश्वर, संत रामदास स्वामी आणि शिवाजी महाराजांची आहे.

धर्म आणि संस्कृंती एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत. भारतात शिक्षण, धर्म व संस्कृती यांचा पुर्वापार त्रिवेणी संगम झालेला आहे. धर्म मानवाला संस्कृतीची शिकवण आणि मानवी जीवनाचे फलित समजावतो. रविंद्रनाथ टागोर धर्म व शिक्षण वेगळे मानत नाहीत.

**धर्माचे प्रकार कोणते ?**

१. व्यक्तिधर्म
२. कुटूंबधर्म
३. समाजधर्म
४. राष्ट्धर्म
५. मानवधर्म

शिक्षण, धर्म व संस्कृती यांचे नयनमनोहर, साक्षात्कारी दर्शन आपल्याला विविध दाखल्यांमधून, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रूपात घडते.

आपल्या भारतीय संस्कृतीत 'गुरूपौर्णिमा' साजरी करण्याचे अतुलनीय महत्व आहे.

गुरूर्ब्रम्हा गुरूर्विष्णू, गुरूर्देवो महेश्वरा
गुरूसाक्षात परब्रम्ह तस्मे श्री गुरवे नम:

आपण गुरूचे स्थान ईश्वरापेक्षा श्रेष्ठ आहे असे समजतो. हे आपल्या धर्म व संस्कृतीच्या एकरूपतेचे द्योतक नाही का ?

ज्या संस्कृतीत गुरूंची पूजा होते, प्राण्यांची पूजा केली जाते, इतकेच नाही तर निर्जीव वस्तूंचीपण पूजा केली जाते ती संस्कृती मातेला कशी विसरेल ? माता ही बालकाची आद्यगुरू असते. तिला वंदन करण्यासाठी आपण 'मातृदिन' साजरा करतो.

दहा उपाध्यायांपेक्षा एक आचार्य श्रेष्ठ आहे
शंभर आचार्यांपेक्षा एक पिता श्रेष्ठ आहे
आणि एक सहस्त्र पित्यांपेक्षा एक माता श्रेष्ठ आहे

अशा या मातृदिनी राजमाता जिजाबांईची आठवण आल्याखेरीज राहत नाही. शिवाजी महाराजांच्या त्या आद्यगुरू. आपल्या मनात तयार असलेली हिंदवी स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्ष साकार करण्यासाठी, शिवरायांना ज्ञान, चारित्र्य, चातुर्य, संघटन व पराक्रम अशा राजस व सत्वगुणंचे बाळकडू देणा:या राजमाता जिजाबाईंनी समस्त महिला वर्गासमोर, उत्तर आदर्श ठेवला आहे.

आपल्या संस्कृतीमधील संत साहित्याचा अनमोल ठेवा, अलिबाबाच्या गुहेप्रमाणे आहे. तुम्ही या गुहेत डोकावून तर पहा,

‘तिळा तिळा दार उघड‘ म्हणताच संस्कृतीतील अनमोल रत्ने आपल्या स्वागताला हजर आहेत. त्यापैकीच एक मौल्यवान रत्न म्हणजे, ‘ज्ञानेश्वरी‘.

संत ज्ञानेश्वर म्हणजे, सुमारे ७२५ वर्षांपूर्वी महाराष्ट्राला पडलेले सुंदर, अध्यात्मिक स्वप्न. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील, परमार्थाच्या क्षेत्रातील ‘न भूतो न भविष्यति‘ असे अजोड व्यक्तिमत्व ! आपल्या अलौकिक दैवी शक्तीने, संत ज्ञानेश्वरांनी निर्जीव भिंत चालविणे, स्वत:च्या पाठीवर अग्नी प्रद्युप्त करणे वा रेडयाच्या तोंडून वेद वदविणे असे दैवी चमत्कार म्हणजे आपल्या संस्कृती मधील मुल्यांची खाणच जणू.

‘श्यामची आई‘ सानेगुरूजी लिखित हे पुस्तक, १९३३ मध्ये नाशिकच्या जेलमध्ये असतांना साने गुरूजींनी हा संस्काराचा अनमोल ठेवा लिहून ठेवला. २०१० हे या पुस्तकाचे अमृत महोत्सवी वर्ष होते. एका साध्या, बाळबोध, सुसंस्कृत घराण्यातील, संस्कृतीचं आणि त्या वेळेच्या समाजाचे चित्रण या पुस्तकात आहे.

‘श्याम पायाला घाण, लागू नये, म्हणून जपतोस,
तसा मनाला घाण लागेल, म्हणून जप हो‘

अशा सहजसोप्या शब्दात मुलावर संस्कार करणारी, धन्य त श्यामची आई! ‘खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे !‘ या

कवितेतून जगाला मानव धर्म व संस्कृतीची शिकवणं देणारे धन्य ते सानेगुरूजी !

हिमालयाची उंची व सागराची अथांगता गाठणा-या महात्मा गांधीजींनी सत्य व अहिंसा ही मुल्ये स्वत: आचरणात आणून, विश्वाला महत्वपूर्ण संदेश दिला आहे. प्रसिध्द शास्त्रज्ञ डॉ.रघुनाथ माशेलकर म्हणतात, भारताने २० व्या शतकात, जगाला दिलेली, सर्वोत्तम भेट कोणती असा प्रश्न मी स्वत:ला विचारला तेव्हा प्रख्यात शास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाई यांचे विधान आठवले, “ असा एक महामानव पृथ्वीवर वावरत होता यावर पुढील पिढयांचा विश्वास बसणार नाही.“ आफ्रिकेतील तरूण नेत्यांनी त्यांना हवे असलेले बदल, घडवून आणण्यासाठी, महात्मा गांधी यांचे अनुकरण करावे, असे मत अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांनी व्यक्त केले होते.

सातासमुद्रापलिकडून निस्वार्थ भावनेने केवळ गोरगरीबांची सेवा करण्यासाठी आलेल्या आणि हा देश आपलाच आहे असे सांगणा-या मदर तेरेसा.

‘इवलेसे रोप लावियले दारी,
त्याचा वेलू गेला गगनावरी.‘

याप्रमाणे पंच खंडात ज्यांची किर्ती पसरलेली आहे अशी ही जगन्माता धर्म व संस्कृतीचा सुंदर मिलाप नव्हती का ?

‘माणूस माझे नांव, माणूस माझे गांव,
दहा दिशांच्या रिंगणात यापुढे माझी धाव.‘

कवी, विचारवंत व समाजसुधारक बाबा आमटे कुष्ठरोग निर्मूलनाचे अफाट कार्य करणारे भारतीय व्यक्तिमत्व !

मानवधर्म, समाजधर्म व राष्ट्रधर्म अशा तीन धर्मांचा उत्तुंग अविष्कार व दर्शन घडवून तोच वारसा व आदर्श पुढील पिढयांनी देखील अंगीकारून आपल्या कर्तृत्वाने सर्वांना नतमस्तक केले आहे.

‘सा विद्या या विमुक्तये‘ हे आपल्या शिक्षणाचे ब्रीद आहे. ‘शिक्षण म्हणजे आत्माविष्कार‘ असे रविंद्रनाथ टागोरांनी म्हटलेले आहे.

भगवान येशू ख्रिस्तांनी अहिंसा, सत्य, शुध्द आचरण व आत्मप्रचिती अशी धर्मासंदर्भातील चार मुल्ये जनमानसात बिंबविण्याचा अथक प्रयत्न केला.

शिक्षणाने माणूस मोठा होण्यापेक्षा सुसंस्कारित होणे महत्वाचे आहे.

Aristotle said “A Good Citizen is one who acts in accordance with the laws of state. A good man is one who acts accordance with the principles of virtue. In the best state, however, laws will be in accordance with the principles of virtue and so there would be no distinction between a good citizen and a good man.

आज चित्रपट, दूरचित्रवाणी, संगणकीय जाल यासारखी लोकहितासाठी बनविली गेलेली माध्यमे आज तरूणांच्या कोवळया जिवावर उठली आहे. चांगल्या गोष्टींपेक्षा वाईट गोष्टींचा परिणाम अधिक दिसु लागला आहे. अनैतिक गोष्टींचे स्तोम माजू लागले आहे. नितीमत्ता लयाला जावू लागली आहे. जीवनात येणारे अपयश पचविण्याची क्षमता, आजच्या तरूणांमध्ये राहिलेली नाही. अपयशातून झालेले घाव भरून काढण्यासाठी व्यसनाला जवळ केले जाते किंवा मरणाला कवटाळले जाते हे आमच्या देशाचे दुर्देवच म्हणावे लागेल.

आज पुन्हा आवश्यकता आहे, मुलांना पुराणातील, इतिहासातील गोष्टी सांगण्याची. संध्याकाळी देवासमोर सांजवात लावून, 'शुभंकरोति' म्हणायला लावण्याची. त्यांच्यातील सुप्त आत्मविश्वास जागृत करण्याची.

वयाच्या १६ व्या वर्षी ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' लिहिली. वयाच्या १७ व्या वर्षी शिवरायांनी शत्रूच्या दाढेतून तोरणा गड मिळविला. वयाच्या २२ व्या वर्षी झाशीची राणी, गो-यांवर तुटून पडली या सर्व घटना, आपल्याला काय सांगतात ? परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी आत्मविश्वास ढळता कामा नये. प्रत्येकाला देवाने, सुप्त शक्ती दिलेलीच असते. आपल्याला केवळ तिला जागृत करायचे आहे. अपयशाला ढाल बनवून,

आत्मविश्वासाची तलवार उपसली की, जीवन संग्राम सहज जिंकता येतो ही शिकवण मुलांना देणे गरजेचे आहे.

आजचे शहरातील, उच्चभ्रू पालक मुलांना ब्तीं ब्वनतेम वित ैदोंत या तीन दिवसांच्या कोर्समध्ये घालतात. या तीन दिवसांमध्ये आयुष्यभराचे संस्कार शिकता येतात का ? तीन दिवसात शुंभंकरोति कल्यांणमं्, वदनी कवळ घेता शिकवणार आणि कोर्स संपल्यावर चक्क सर्टिपिफकेट !

आधुनिकीकरण म्हणजे केवळ पाश्चात्यांचे अंधानुकरण नाही. संस्काराची, मूल्यांची बीजे आताच रोवली तर निश्चितच पुढील वर्षांमध्ये त्यांची रसरशीत फळे मिळतील. व्हॅलेंटाईन डे जरूर साजरा करा पण त्याचबरोबर गुरूपौर्णिमा, मातृदिन विसरू नका. फ्रेंडशीप बॅंड मि़त्र मैत्रिणींना बांधतांना एक अतुट धागा आईवडिल, भाउ बहिणीच्या हातावर देखील बांधा कधिही न तुटणारा अजोड बंधनाचा !

नव्याच अंगीकार करतांना ‘जुने ते सोने हे देखील विसरू नका. घडयाळाच्या काटयामागे धावतांना घरीदेखील तुमची कोणीतरी वाट बघत असतात हे लक्षात ठेवा. पैसा संपत्ती जरूर कमवा पण तो कमवतांना ताठ मानेने जगू शकाल याची जाणीव असू द्या. दुस-याचे भले करता येत नसेल तर वाईट तरी चिंतु नका.

'शुध्द बीजापोटी फळे रसाळ गोमटी' असे संत तुकारांमानी सांगून ठेवले आहे हे लक्षात ठेवा.

Globalization, Privatization, Liberalization च्या युगात आम्हाला खरेच टिकायचे असेल तर, ''तमाम भारतीयांच्या हृदयाला जाउन भिडणे व जनसामान्यांच्या गरजांची पूर्तता करणे. हे गुरूदेव रविंद्रनाथ टागोरांनी म्हटल्याप्रमाणे आपल्या शिक्षणाचे ध्येय बांधले पाहीजे.

शांतिनिकेतन, विश्वभारतीच्या धर्तीवर आपल्या संस्कृतीचे अधिष्ठान व आधूनिक तंत्रज्ञानाची शक्ति असणारी, शिक्षण प्रणाली जर आपण निर्माण करू शकलो तर एक दिवस नक्की असा असेल की, आपण सुसज्ज, संपन्न व सुसंस्कृत होउन जगाला मंगलमयी दिशेने नेउ !

!

# स्वामी चिन्मयानंदांचे शैक्षणिक विचार

राज्यस्तरीय चर्चासत्र

**No Transfusion of Idea**
**Only transformation**

दि. ३-४-५ मार्च २०११

विषय - शिक्षणातील गूणवत्ता

**Quality in Education.**


सादरकर्ता - श्रीमती विशाखा विलासराव सुर्यवशी

**M.Sc. M.Ed. SET, NET**

सह.प्राध्यापक,

रेणूका अध्यापक महाविद्यालय, रेणापूर

जि.लातूर.

महाराष्ट्र

Email - Vishakha. Suryawanshi@ Rediffmail.com

# <u>शिक्षणातील गूणवत्ता</u>


## सारांश :

भारताला सुमारे ५००० वर्षांची संस्कती लाभलेली आहेत्र संस्कार, मुल्य, ज्ञान देणारी उत्तम संस्कृती म्हणून भारताकडे पाहिले जातेत्र आपल्या या समृध्द वारश्यामुळेच भारतीय या नात्याने जगात आपली एक वेगळी ओळख निर्माण होतेत्र

सहजिकच या समृध्द संस्कृतीमुळे गूणवत्तापूर्ण शिक्षणपध्दती भारतात उपलब्ध होतीत्र म्हणूनच नांलदा, तक्षशिला, विक्रमशीला, वाराणसी यांसारख्या ठिकाणी संपूर्ण जगभरातला विद्यार्थी अध्ययनासाठी येत होतात्र पण या विद्यापीठांच्या —हासाबरोबरच शिक्षणातील गूणवत्ता सुध्दा कमी होत आहेत्र त्याचेच परिणाम म्हणून वाढता भ्रष्टाचार, गुन्हेगारी, फुटीरतावाद, विषमता या समस्या भारतीय समाजाला भेडसावत आहेतत्र

माजी राष्ट्रपती अब्दुल कलामांचे स्वप्न व भारताचे घ्येय म्हणजे इ.स. २०२० सालापर्यंत भारताचे महासत्तेत रुपांतर करणे होय. हे स्पप्न पूर्ण करण्यासाठी व भारताला जगात मान, सन्मान प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी शिक्षणक्षे भुमिका उल्लेखनिय आहेत्र यासाठी गुणवत्ता टिकवणे व वाढविणे यासर्वच गोष्टींचा विचार होणे आवश्यक आहेत्र त्याविषयीचे चिंतर प्रस्तत निबंधात साद करीत आहे.

# <u>शिक्षणातील गूणवत्ता</u>

भारताला सुमारे ५००० वर्षांची
त्याविषयीचे चिंतन प्रस्तूत निबंधात सादर करीत आहेत्र

शिक्षण हे मानवी विकासाचे मुलभूत क्षेत्र आहे.क्षेत्र आहे.या क्षत्र्ााचा प्रभाव इतर सर्वच क्षत्र्ाावर पडतो. त्यामळे देशाची प्रगती सुध्दा शिक्षण व्यवस्थेच्या विकासावरच अवलंबून आहे. या संबंधी माजी राष्ट्रपती राधाकृष्णन यांचे विधान मोठे बोलके आहे. ते म्हणतात. देशाचे भविष्य वर्गावर्गातून घटत आहे. जर असे असेल तर तज्ञानी केलेल्या शिक्षणाच्या व्याख्याही किती अर्थपूर्ण आहेत. हे लक्षात येते. जसे महात्मा गांधी म्हणतात. आत्मा व मन यांचा परिपूर्ण विकास करुन व्यक्तीमधील सर्व उत्कृष्ट गुणाची अभिव्यक्ती करणे हेच शिक्षणाचे धेय आहे.

''शिक्षण म्हणजे माणसातील पूर्णत्वाचा अविश्कार''

स्मावी वेवेकानंद

शिक्षणाचे फलित म्हणजे व़िद्यार्थी यामुळेच विद्यार्थ्याचे गूणवत्ता हीच शिक्षणाची गूणवत्ता असते. तेव्हा गूणवत्तेची संकल्पना समजुन घेणे महत्वाचे आहे. गूणवत्ता हा शब्द औद्योगीक किंवा व्यापारी क्षेत्राकडून मिळाला आहे.

'' गूणवत्ता —ग्राहकाच्या अपेक्षा व गरजा याची पुर्तता करण्याची एखादया वस्तूमध्ये असलेली क्षमता म्हणजेच गूणवत्ता होय.''

'गॅट' करारानुसवार आपण शिक्षण ही सोवा मानलेली आहेत्र युानसार विद्यार्थी आपला ग्राहक आहेत्र त्यांच्या सर्व अपेक्षा व गरजांची पूर्तता शिक्षणातून झाली तर शिक्षणात गूणवत्ता आहे असे म्हणता येईलत्र

## सदयस्थितीत शिक्षणातील गूणवत्ता —

शिक्षण हे सर्व क्षेत्रांचे, त्यांच्या विकासाचे उगमस्थान आहे. असे असतानाही शिक्षणक्षेत्रात मात्रा गूणवत्तेच्या संदर्भात कमालीची उदासिनता आढळते. गूणवत्ता म्हणजे नेमके काय ही संकल्पनाच अपिरिचित वाटते.

भारतामध्ये विपूल संपत्ती, मनुष्यबळ असतानाही तात्रिंकदृष्टया भारता मागास आहे. भारतातील बुध्दिवंतांचा लोंढा परदेशगमनाकडे आकर्षित होतो. उच्च शिक्षण घेणारा विद्यार्थी स्वत:साठी रोजगाराच्या संधी शोधू शकत नाही किंबहुना निर्मान करु शकत नाही. संशोधनाची स्थिती उत्यंत बिकट आहे. वास्तविक पाहता हि स्थिती शिक्षणातील गूणत्तेच्या कमतरतेमुळेच असावी असे वाटते.

दि.२८/११/०११ रोजीच्यसा यज्ञ वत्तप्रत्रातील बातमीनुसार केवळ २ टक्के शोधनिबंध अंतरराष्ट्रीय मासिके, नियतकालिके यांमध्ये प्रसिध्द होतात. खरे पाहता सुमारे २०० ते २५० विद्यावाचस्पती पदव्या विद्यापीठांकडून प्रदान केल्या जातात. ही तफावत गूणवत्तेच्या उदासीनतेमुळे निर्माण सालेली आहे.

डॉ. उभय व राणी बंग, डॉ. आनंद कर्वे, डॉ. बावस्कर, डॉ.विकास आमटे यांप्रमाणे स्वत:च्या शिक्षणाचा उपयोग स्वत:च्या समस्या सोडविण्यासाठी करण्यास प्रत्येक विद्यार्थी पात्र होणे यातच शिक्षणाची गूणवत्ता सामावलेली आहे.शिक्षणातील गूणवत्ता प्राप्त करण्यातील अडचणी

## १. शिक्षकांची गूणवत्तेची अपूरी संकल्पना —

शिक्षक हा घटक शिक्षणात महत्वाचा आहे. शिक्षणाच्या गूणवत्तेसाठी नेमलेले आयोग, त्यांनी केलेलया शिफारसी, तज्ञांची मते यांची वास्तवात अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शिक्षकाची असते. परंतू अध्यायन केवळ औपचारिकपणे पूर्ण न करता, त्यामध्ये गूणवत्ता कशी आणावी याची कल्पना शिक्षकांना नसते. प्राथमिक, माध्यमिक शाळांमधिल शिक्षकांसाठी प्रशिक्षण वग्र , उदबोधन वर्गांचे आयोजन केले जाते. पण स्वत:चा विकास त्यातुन कसा करुन घ्यावा हे शिक्षकांना कळत नाही.

## २. शिक्षक निवड प्रक्रिया —

प्राथमिक व माध्यमिक शाळांमधिल बहुतेक शिक्षक हे स्थानिक व्यवस्थापन समितीमार्फत निव्डले जातात. त्यामुळे विशला व पैसा हे दोन निकष प्रमुख मानले जातात. खरोखर ज्ञानी, गूणवान उमेदवाराला न्याय मिळेलच असे नाही. संस्थाची उभारणी या स्वरुपात केली जाते. मी आणि माझो नातेवाईक यांच्या रोजगाराचा प्रश्न सोडविण्याचे माध्यम म्हणजे शिक्षणसंस्था होय.

## ३. आर्थिक विवंचना —

शिक्षणक्षेत्रात प्राथमिक, माध्यमिक, पदवी शिक्षण यासर्वच ठिकाणी शिक्षण सेवक किंवा करारपध्दती लागू आहे. यामुळे शिक्षक म्हणून येणारी व्यक्ती आर्थि विचंनेत सापाडते. आर्थिकदृष्टया कमकुवत माणूस आपली सर्व शक्ती विद्यार्थ्यांच्या विकासासाठी वापरेलच असे नाही. ही स्थिती अनुदानित संस्थांची याचप्रमाणे खाजगीकरणाच्या लोंढयात आज जास्तीत जास्त संस्था विनाअनुदानित आहेत. या संस्थांमध्ये आर्हता पुर्ण करणा—या उमेदवारालासुध्दा पूर्ण वेतन दिले जात नाही. याचा वाईट परिणाम शिक्षणक्षेत्रावर होत आहे. अशा स्थितीत गुणवत्तेची अपेक्षा करणेही अव्यवहार्य वाटते.

## ४. बुध्दिवंताची अनास्था —

जर साधारणत:कोणत्याही लहान मुलाला तु मोठेपणी कोण होणार असे विचारले असता 'मी डॉक्टर होण', मी इंजिनियअ होणार, 'तंत्रज्ञ होणार' अशी उत्तरे हमखास मिळतात पण मी शिक्षक होणार असे कुणीही म्हणतातना दिसत नाही. या क्षेत्रात येणा—या बहुतेक व्यक्ती नाईलाजाने आलेल्या असतात.

बुध्दीवंत समाजाला जाणारा वर्ग खाजगी कंपन्या, व्यापार, संशोधन इ. क्षेत्रात वळतो. कारण तिथे गलेलढठ पगार, परदेशगमनाची संधी, इतर सोईसुविधा त्यांना प्राप्त होताता. शाळेत येतुन अपु—या सोईसुविधात, कमी पगारात काम करणे त्यांना मान्य होत नाही.

कोणत्याही क्षेत्राचा विकास हा त्या क्षेत्रातील त्यागी, ज्ञानी व्यक्तींमुळे होतो. म्हणून बुध्दिवंतांची ही अनास्था गूणवततेला मारक आहे.

## ५. नैतिकमुल्यांचे अध:पतन —

भारताला उत्तम नैतिक मुल्यांचा प्रचंड खजिन लाभला आहे. मात्र सध्याच्या काळत मुल्य ढासळत चालेली आहेत. वास्तविक पाहता 'मुल्य सांगता किंवा शिकवता येत नाहीत ती केवळ रुजविता येतात' म्हणून प्रत्येक व्यक्तीच्या आचरणातूनच ती प्रसारीत केली जाउु शकताता.

शिक्षणक्षेत्राचा विचार करता मुल्यांची घसरण लक्षात येते. आजचा शिक्षक आपला व्यवसाय म्हणजे वृत किंवा उपासना म्हणून न स्विकारता केवळ उपजिवीकेचे साधनप म्हणून स्विकारतो. भ्रष्टाचार, अप्रामाणिकपणा, वाढती गून्हेगारी या समस्यांचे मुळ शिक्षणक्षेत्रातील नैतिकमतुल्यांचे अध:पतन हेच आहे यामुळे गूणवत्ता प्राप्त होउु शकत नाही. याशिवायही

**६. संधीची असमानता**

**७. जीवनकेंदी अभ्यासक्रमांची कमतरता.**

८. समाजातील अपप्रवत्ती

९. विलासी व कष्ट न करण्याची प्रवृत्ती

१०. सामाजिक विषमता इ.अनेक समस्या आढळतात.

जरी अनेक समस्यांनी शिक्षणक्षेत्राला ग्रासले असेल तरीही 'रात्रीच्या गर्भात असे उष:काल उद्याचा' या उक्तीप्रमाणे शिक्षणक्षेत्राला उन्नत, विकसिन करचेसुध्दा काही मार्ग आहेत. त्यासाठी पुढील उपययोजना सुचवाल्या वाटतात.

## १. शिक्षकांचा दृष्टिकोन व्यापक करणे —

आपण केवळ एखादया शाळेपुरता मर्यादित विचार न करता, संपूर्ण जगाचा विचार करुन गूणवत्ता वाढविणे आवश्यक आहे. ही जाणीव शिक्षकांत निर्माण करावी.जगभर समर्थपण उभा राहील अशा विद्यार्थी मी तयार करेन ही भावना शिक्षकाना यावी. माझाा व्यावसायिक विकास महत्वाचा आहे असे त्यांना वाटले पाहिजे.

## २. गूणवत्तापूर्ण व पारदर्शक निवडपद्रधती —

शिक्षकांची निवड करताना फक्त काही टक्के जागा व्यवस्थापनाला दिल्या जाव्यात. इतर शिक्षकभरती केंद्रीय पदधतीने व्हावी. निवडप्रक्रिया कडक व पारदर्शक असावी. अधिकाधिक योग्य उमेदवार निवडणे हे प्रमुख ध्येय असावे.

पैसा आणि वशिला योपेक्षा ज्ञानी, मेहनती, प्राथमिक वृत्ती असलेला उमेदवार महत्वाचा मानला जावा.

## ३. योग्य आर्थिक तरतुदी —

योग्य आर्थिक तरतुदी करताना सरकारने सहावा वेतन आयोग लागू करुन पगारांमध्ये योग्य वाढ केलेली असेल तरीही ती फक्त मुठभर लोकांना लागु आहे. विनाअनुदानित संस्थामध्ये काम करण्या—या कर्मचा—यांचाही संधी आहे. तशी शिक्षणक्षेत्रातही असावी. शिक्षक प्रशिक्षण हा अत्यंत महत्वाचा भाग आहे. त्याच्या विकासासाठी सरकारने प्रयत्न करावेत.

## ४. आधुनिकतेचा स्विकार —

शिक्षण क्षेत्राात काम करणा—या शिक्षकांना आ़दययावत सोईसुविधा उपलब्ध करुन दयाव्याताा. बुध्दीवंतांना आकर्षित करतील अशी

संधी उपलब्ध व्हाव्यात. सतत कार्यमग्न असणा—या ज्ञानी, गूणवान शिक्षकांना प्रगतीसाठी वाव दिला जावा.

**५. व्यवसायिक विकास —**

प्रत्येक शिक्षकाने व्यवसायिक विकास करण्यासाठी शिक्षकांना सतत प्रयत्नशील ठेवून, त्यांचे योग्यवेळी मुल्यामापन करावे. संगणक, इंटरनेट, साहित्याच्या वापरासाठी सोईउपलब्ध कुरुन दयाव्या व प्रवृत्त करावे.

व्यवसायिक विकासासाठी प्रयत्नशील असणा—या शिक्षकांना योग्य न्याय मिळावा.

**६. मुल्य व आदशांची जपणूक करणे.**

**७. शिक्षणाला व्यवसायिक अधिष्ठान प्राप्त करुन देणे.**

**८. आदययावत अभ्यासक्रमांची उपलब्धता करणे.**

**९. समानसंधी**

अशी काही उपाययोजना गुणवत्ता बाणण्यास उपयुक्त ठरतील. 'गूणवत्ता' ही कुना एकाची जबाबदारी किंवा मक्तेदारी नाही.ती प्रयत्नपूर्वक सर्वांना प्राप्त करता येते. शिक्षणक्षेत्रातील प्रत्येकाला 'गूणवत्ता' आपली जबाबदारी वाटली पाहिजे. तशी जाणिव व जबाबदारी मला जाणवली. माझा क्षेत्राच्या विकासासाठी, माझा भारताला महासत्ता बनविण्यात खारीचा वाटा उचलण्यासाठी केलेला हा छोटासा प्रयत्न.

.——————————————————————————————

**संदर्भ —**

१.भातीय शिक्षण
२.शिक्षण समीक्षा.
३.शिक्षण आणि समाज.
४.University News

## शिक्षक हा सुकरकर्ता मदतनीस

राष्ट्राचा विकास, समाजाचा विकास हा शिक्षणाच्या स्वरूपावर अवलंबून असतो. शिक्षणाची प्रगती व प्रतिष्ठा शिक्षण देणाऱ्या शिक्षकांवर अवलंबून आहे. शिक्षण प्रक्रियेतला महत्त्वाचा कणा म्हणून शिक्षकांकडे पाहिले जाते.

पूर्वी एक गोड गैरसमज होता. शिक्षक या नात्याने आपण शिकवतो म्हणून विद्यार्थी शिकतो. आपण ज्ञान देतो. म्हणून विद्यार्थी ज्ञान मिळवतो. पण विसाव्या शतकात सुप्रसिध्द स्विस मानसशास्त्र व्हॅस्की यांनी मानवी बोधावस्थेविषयी जे संशोधन केले त्या आधारे हा समज पूर्णपणे चुकीचा असल्याचे सिध्द झाले आहे. शिकणारे मूल स्वतःच्या मनाप्रमाणे अनुभव निवडून ज्ञानाची रचना करते आणि पुष्टीकरण करते. ती गोष्ट आता सर्वमान्य झाली आहे. परिणामी शिकविण्यापेक्षा शिकणे हया प्रक्रियेवर सर्वाधिक भर देण्याची गरज निर्माण झाली आहे. शिक्षक हा विद्यार्थ्यांने द्यावयाच्या ज्ञानाचा निर्देशक किंवा नियंत्रक नसून विद्यार्थ्यांच्या ज्ञान रचना आणि पुष्टीकरण प्रक्रियेतील एक सौकर्यक किंवा सुकरकर्ता Facilitator आहे. हीच गोष्ट आता सर्वसामान्य होऊन शिक्षण प्रक्रियेचा भाग झाली आहे. तर त्याचा शिकण्याचा प्रकार, शिकण्याच्या संधी आणि शिकणाऱ्यालाही महत्वपूर्ण स्थान आहे. हेच हयातून प्रतिबिंबित होते. मूर्त वस्तू हाताळले, प्रयोग करणे, खेळ खेळणे, सहशालेय व सांस्कृतिक कार्यक्रम भाग घेण्यास प्रवृत्त करणे, मुलांना विविध मार्गांनी कृतिशील ठेवले.

**उदा. प्राथमिक स्तर वर्गामध्ये याबाबत पुढील उपक्रम राबवू शकाल.**

१) विविध धान्याचे प्रकार एकत्रित करण्यास सांगावे, त्याचे वैशिष्ट्यानुसार वर्गीकरण करण्यास मांगावे.

२) मोठा शब्द देऊन त्यावरून अर्थपूर्ण २, ३, ४ अक्षरी शब्द शोधण्यास सांगा.

३) नैसर्गिक आपत्तीसंदर्भात वर्तमानपत्रातील बातम्या एकत्रित करून त्यावरून झालेले परिणाम शाब्दिक स्वरूपात सांगण्यास सांगावे, वर्गीकरण करण्यास सांगावे.

४) खेळ साहित्यातून विविध वस्तू तयार करण्यास सांगावे.

५) कल्पना विस्तार करणे.

६) म्हणीवरून गोष्ट तयार करणे.

७) विद्यार्थ्यांना मुक्त कल्पना मांडण्यासाठी निबंधलेखन.

८) शाब्दिक खेळ, वाक्यपूर्ती, उखाणे, कोडी, भेंड्या.

९) मातीच्या गोळ्यातून आकारांची निर्मिती.

१०) कोलाज काम करायला सांगणे.

११) निरनिराळया प्रकारच्या चित्रांचे रेखाटन करणे.

१२) बुध्दिमंथन तंत्राचा वापर.

१३) एक वस्तू देऊन निरनिराळया गोष्टी बनविणे, कविता, गाणे तयार करणे.

१४) वर्गाचे हस्तलिखित मासिक काढणे.

१५) एक वस्तू देऊन त्यात विविधांगी सुधारणा सुचविण्यास सांगणे.

**<u>शिक्षक एक मदतनीस (Facilitator ) म्हणून भूमिका.</u>**

१) शिक्षक मदतनीस म्हणून काम करताना, वर्गामध्ये चर्चापध्दतीचा वापर कसा करणार, विद्यार्थी केंद्रित की शिक्षक केंद्रित. विद्यार्थ्याला आपल्या चर्चामध्ये भाग घ्यायला मदत करावी लागेल.

२) काही विद्यार्थ्यांना कृतीची जोड द्यावी लागते त्यामुळे शिक्षकाने व्यक्तिभिन्नतेचा विचार करून विविध विचारप्रवाह वापरून विद्यार्थ्यांच्या अध्ययनशैलीस योग्य दिशा देण्याचे कार्य करून शिक्षकाला मदत करावी लागेल.

३)	शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या स्वत:च्या कल्पना मांडण्यासाठी बाब दिला पाहिजे. त्याने विद्यार्थ्यांमधील शोधकवृत्ती जागृत करण्यास मदत करणे आवश्यक आहे.

४)	रेडल आणि बॅटनवर्ग यांनी अध्यापकास तेरा प्रकारच्या भूमिका पार पाडाव्या लागतात असे प्रतिपादिले आहे आणि आर. जे. मूलरने शिक्षकाच्या दोन प्रमुख भूमिका सांगितल्या आहेत.

१) वर्तनवादी,	२) अवबोधवादी

वर्तनवादी रूपात त्यांना बालकांना उपयोगी असे वातावरण निर्माण करावे लागते.

अवबोधवादी रूपात त्याला बालकांचे आंतरिक मानसशास्त्र व त्याविषयीचे अनुभव समजून घ्यावे लागतात व विकसित करावे लागतात.

शिक्षण प्रक्रियेत खालील मुद्दयांसाठी शिक्षकाला मदतीस, सुकरकर्ता व्हायला लागणार आहे.

१) विद्यार्थ्यांचा एकात्मिक विकास होताना शारिरीक, मानसिक, बौध्दिक, अध्यात्मिक व्यक्तिमत्वाचे, पैलू विकसित होऊन भारतीय संस्कृती देशभक्ती आणि वैश्विक दृष्टीकोण विकसनाकरिता.

२) उद्याच्या नागरिकांमध्ये नैतिक प्राबल्याची रूजवणूक करून ज्यामुळे उद्याच्या येणाऱ्या आव्हानांना सकारात्मक दृष्टीकोनातून हसत-हसत सामोरे जाण्याचे बळ निर्माण करण्याकरिता.

अध्ययन ही गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. शिक्षक हा विद्यार्थ्यांना अध्ययन प्रवृत्त करणारा महत्वाचा माध्यम आहे. Intermediater आहे. तो नवनवीन संधी अध्ययनाची संधी प्राप्त करून देण्याचे काम करतो. वर्गामध्ये विविध माध्यमाच्या मदतीने विद्यार्थी-विद्यार्थी व विद्यार्थी शिक्षक यांच्यामध्ये अर्थपूर्ण आंतरक्रिया घडवून आणल्यामुळेच अर्थपूर्ण अध्ययन होत शकते.

शिक्षकाने विद्यार्थ्यांबरोबर Co-learner मेंटर सहअध्याची व्हायला हवे. शिक्षकांनी वर्गामध्ये चालणाऱ्या प्रक्रियेचे विशेषत्वाचे नियोजन करणे महत्वाचे आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना काही प्रमाणात धोका पत्करण्याची सवय लावावी जेणेकरून ते नवीन पर्याय

शोधतील. येथे विद्यार्थी एच्छिकपणे एकमेकांशी आंतरक्रिया साधतील व अध्ययनात सहभाग होतील. परंतु असा धोका हा खूप मोठा खूप लहान किंवा पुनरावृत्ती करणारा नसावा. त्यातूनच सृजनात्मक विचारांची संधी प्राप्त होईल.

प्रत्येक वर्गव्यवस्थापनात मूल्यमापन करणे आवश्यक आहे. त्याशिवाय वर्गध्यापन खऱ्या अर्थाने पूर्ण होऊ शकत नाही. अशा प्रकारच्या मूल्यमापनातून छोटयातली छोटी समस्या ओळखता येऊ शकते.

मदतकर्ता शिक्षक त्याच्या वर्गाध्यापनाची सुरूवात आवश्यक व नियोजीत प्रश्नापासून करतात. ते प्रश्न एक दोन वाक्यातलेनतून विचार प्रर्वकत प्रश्न असतात. हे प्रश्न ज्ञान आणि आकलनाकरिता असतात.

विद्यार्थ्यांचे अर्थपूर्ण अध्ययन हे विद्यार्थी व शिक्षक हयांच्या परस्परसंबंध नात्यावर अवलंबून असते. हया प्रक्रियेत फक्त शिक्षकच शिकवत नसतात तर विद्यार्थी एकमेकांना शिकवतात तसेच विद्यार्थी शिक्षकांना त्यांना कसे शिकवायचे हे शिकवतात.

शिक्षक हा अध्ययनाच्या विविध संधी उपलब्ध करून देऊ शकतो. त्या आधारावरच विद्यार्थ्यांची समज आणि कौशल्य विकसन होण्यास मदत होते.

शिक्षकांचे विद्यार्थ्यांचे मदतनीस म्हणून कधीही न संपणारे असे कार्य आहे.

# शिक्षणातली वस्तुस्थिती

डॉ. कल्पना आदिनाथ बेलोकर
शासकीय अध्यापक महाविद्यालय
अंबाजोगाई जि.बीड ४३१५१७
भ्रमणध्वनी ९४२२९३१४०४

शिक्षणाच्या वाढत्या मूलभूत व उपयोजित ज्ञानशाखा, त्या ज्ञानशाखांमध्ये दररोज पडत असलेली नवनवीन संशोधनांची भर, त्या संशोधनांवर आधारित प्रकाशने, नवनवीन पुस्तके, ग्रंथ, ज्ञानकोश, संदर्भकोश, नियतकालिके ह्यांनी समृद्ध होत असलेले माहितीचे जाल, माहितीचे होत असलेले नित्य आधुनिकीकरण आणि नूतनीकरण, ज्ञानी समाजाचे स्वप्न रंगविणारे ज्ञान आयोगापर्यंतचे व त्यानंतर येऊ घातलेले वेगवेगळे आयोग, माहितीच्या आदानाप्रदानासाठी रोज उगवत असलेल्या नवनवीन योजना व उपाययोजना... हे चित्र पाहिले की आपल्या लक्षात येते की शिक्षणाची संकल्पना दररोज अधिक व्यापक, सखोल आणि समृद्ध होत आहे. शिक्षणाची उंची आणि खोली रोज वाढत आहे.

गावागावांत, गल्लोगल्ली उगवत असलेल्या शिक्षणसंस्था, अल्पावधीतच गावातून बाहेर पडत गावाबाहेरच्या पंचतारांकित वाटाव्यात अशा अत्याधुनिक इमारतींमध्ये स्थानांतरित होत असलेल्या शिक्षणसंस्था हे चित्र पाहिले की आपण दडपून जातो. शिक्षणासाठी अपेक्षित असलेली भौतिकता समृद्ध होत आहे, फाटक्या तरपट्टीवर बसून उघड्या गळक्या वर्गात शिक्षण घेण्याचे दिवस आता संपलेत, सगळे शिक्षणच आता

वातानुकूलित व्हायला लागले हे आपल्याला जाणवते. पण ह्या वातानुकूलनाची आपल्याला सवय नसल्याने आपल्या तब्येतीचे काय होईल, अशी चिंता आपल्याला लागून राहते.

ही चिंता सोबत घेऊन आपल्या पाल्याच्या प्रवेशासाठी आपण झगमगाटी शिक्षणसंस्थेच्या इमारतीमध्ये पाऊल टाकतो. आणि पहिल्या पावलापासून प्रत्येक पावलावर आपण अडखळत राहतो. प्रत्येक पावलावर आपल्याला ठेच लागण्याची आणि आपला कपाळमोक्ष होण्याची शाश्वती असते. ह्या शिक्षणसंस्थांच्या इमारतींमध्ये होणारी प्रवेशाची खुले आम खरेदी विक्री, प्रवेशानंतरच्या शुकशुकाटाची होणारी राजरोस खरेदी विक्री, त्यानंतर पुढे कशाबशा रेटत नेलेल्या केविलवाण्या परीक्षा, ह्या सगळ्या प्रक्रियांच्या दिमतीला सदैव हजेरी लावणारा तरीही रोजगाराची कोणतीही हमी

नसलेला वर्षातून एखाद्या वेळी मिळण्याची शक्यता असणाऱ्या मासिक वेतनाची आशाळभूतपणे वाट पाहणारा नोकरवर्ग,... हे चित्र पाहिले की आपणच दिशाहीन होतो.

दिशाहीन झालेली आपली पावले शासकीय निमशासकीय शिक्षणसंस्थांकडे वळतात. जुनाट पक्क्या इमारती पण बजेट संपवण्यासाठी डागडुजीला बळी पडत खचत चाललेल्या, त्या इमारतींच्या बाजूला धूळ खात उभी असलेली अर्धवट गौण आणि प्रमुख बांधकामे, एखाद्या वर्गातून येत असलेल्या शिक्षणाचा अपवादात्मक आवाज सोडला तर वर्षानुवर्षे अभ्यासक्रमाला स्पर्श न झालेला, शिक्षणातल्या डॉन व्यक्तींभोवती विद्यार्थ्यांचे असलेले घोळके, वशिल्यातून लाचखोरीतून आलेले इथले उच्चपदस्थ, भ्रष्ट राजकारण्यांच्या मागे लागून वेगवेगळी शैक्षणिक अधिकारांची पदे हपापण्यासाठी काही डॉन व्यक्तींमध्ये लागलेल्या जीवघेण्या स्पर्धा, अशा स्पर्धांमधल्या विजयी ( १ ) आणि संभाव्य विजयी व्यक्तींच्या मानसन्मानांसाठी हपालेले काही पूर्णलाचर आणि निमलाचार लोक...हे चित्र पाहिले की आपली मती गुंग होते.

आणि मग, शिक्षणाची समृद्ध आणि सुदृढ संकल्पना सर्वांपर्यंत का पोहचत नाही, हे आपल्या लक्षात येते.

ह्या वस्तुस्थितीवर उपाययोजना शोधण्यासाठी आपली धडपड असते. कुठे कुठे शिक्षणाचे, शिक्षण प्रक्रियेचे पावित्र्य जिवापाड जपले जात आहे. हेही चित्र आपल्याला बघायला मिळते. त्यामुळे आपण सुखावतो. ह्या सुखद चित्राच्या कारणांचाही आपण शोध घेतो, तेव्हा आपल्याला कळते, जिथे स्वार्थ संपतो, तिथे समाधानाची बिजे रुजतात, शिक्षण ही इतरांना द्यावयाची नि:स्वार्थी सेवा आहे. हे तत्त्वज्ञान ह्या शिक्षण प्रक्रियेत पूर्णपणे भिनलेले

आहे . हे तत्वज्ञान अनेक विचारवंतांनी शिक्षणतज्ज्ञांनी वेगवेगळ्या परिभाषेत मांडलेले आहे, हेही आपल्या लक्षात येते. स्वामी चिन्मयानंदांनी शिक्षणासाठी हेच तत्वज्ञान मांडले आहे, हे जेव्हा आपल्याला कळते तेव्हा तो क्षण आपल्यासाठी चिन्मयानंदाचा असतो. नंदादीप कधीही विझत नसतात, ही वस्तूस्थिती आपल्यालाही तेवत ठेवत असते.

**केवळ एका सुविचारानं......**

डॉ. संतोष मोतीराम मुळावकर
शासकीय अध्यापक महाविद्यालय
अंबाजोगाई जि.बीड ४३१५१७
भ्रमणध्वनी ९४२२२४०३३८

अभ्यास करत बसलो होतो.... झोप येऊ लागली. घड्याळाकडं बघितलं. रात्रीचे बारा वाजलेत. वेळ समजल्यावर झोपेनं तिचा अंमल आणखीच वाढवला.... अभ्यासाचा अंमल सैल होत चालला म्हणून थोडा खंतावलो... पण वाटलं, खंत वाटण्याचं काही कारण नाही. झोपही अभ्यासायला हवी. हातातला ग्रंथ उशाशी, खरं तर डोक्याशी ठेवला. शांत झोप लागली....

.... झोप संपली. उठलो. वाटलं, झोपेचा अभ्यास कसा छान शांततेत झाला. खरंच, कुठल्याही अभ्यासासाठी अशीच शांतता हवी. डोक्याजवळचा ग्रंथ मला खुणावू लागला. तो ग्रंथ घेऊन अभ्यासिकेत गेलो. अभ्यासिका ग्रंथांनी भरगच्च भरलेली. खास वाचनासाठी विकत घेतलेले हे सगळे ग्रंथ अजून वाचायचे राहिलेत. सगळं वाचायला आपलं जीवन नाही पुरायचं. जीवन हाच तर केवढा मोठा ग्रंथ ! तो अभ्यासण्यासाठी तर आपलं जीवन आहे. आपलं जीवन अभ्यासता अभ्यासता आपण इतरांचंही जीवन अभ्यासतो. अगदी किडयामुंग्यांचंही जीवन अभ्यासता अभ्यासता कळतं, मुंग्या केवढं मोठं काम करतात. त्यांचं वारुळ अभियान तर बघत राहावं असं! त्यांच्या वारुळासारखं वारुळ आपल्याला नाही बांधता यायचं. सुग्रण झाल्याशिवाय त्याच्या खोप्यासारखा खोपा आपल्याला नाही विणता यायचा. खरंच,माणसाच्या अभियांत्रिकीला किती मर्यादा पडतात! आपलं 'सिव्हिल' खूपच मर्यादित आणि सिव्हिलायझेशनपण! मानवाच्या मनासारखं मन नसूनही किडयामुंग्यांचं सिव्हिल आणि सिव्हिलायझेशन केवढं मोठं! आणि आपण वैतागलो की म्हणतो , काय किडयामुंग्यांचं जिणं वाट्याला आलं. किती चुकतो आपण!

बी.एड. च्या वर्गात शिकवताना मी हे सांगितलं विद्यार्थ्यांना. अगदी तन्मय होऊन शिकवलं. विद्यार्थ्यांचे चेहरे खुलले. मीही खुललो. पुढचं वाक्य माझ्या तोंडून अगदी सहज बाहेर पडलं, “पाठ्यवस्तूशी तन्मय झाल्याशिवाय अध्यापनातला चिन्मय सापडत नाही.” चिन्मय ह्या शब्दाचा मी विचार करू लागलो. कुठून सुचला आपल्याला हा शब्द?ह्या शब्दाचं नातं कशाशी... मी आठवू लागलो. आठवता आठवता मला आठवलं... स्वामी चिन्मयानंद! केवळ माहीत असलेल्या ह्या नावामुळं आज आपल्याला केवढा मोठा विचार सुचला! त्यांचं सगळं जीवनचरित्र अभ्यासायला हवं.

घरी आलो. स्वामी चिन्मयानंदानंवरचं पुस्तक माझ्याजवळ असलेलं. पण नेमकं आता ते हाताशी येत नसलेलं. मी इंटरनेट उघडलं. गुगलवरून स्वामी चिन्मयानंदांपर्यंत पोहोचलो. इंग्रजीतला मजकूर वाचायला लागलो. स्वामी चिन्मयानंद (८ मे १९१६ - ३ ऑगस्ट १९९३) चिन्मय मिशनची स्थापना.... वाचता वाचता सहज विचार सुचला, ज्यात चारित्र्य असतं तेच खरं चरित्र. चारित्र्याला हिंदीत चरित्र म्हणतात. तोच शब्द मराठीत आणि हिंदीत. पण अर्थाचं आभाळ किती वेगळं! एका शब्दाची अर्थपूर्णता शोधायची असेल तर वेगवेगळ्या भाषांमध्ये शिरावं लागतं.

सध्यातरी मी वेबसाईटवरच्या इंग्रजी भाषेत शिरलेला. इंग्रजीतून स्वामी चिन्मयानंद वाचताना इंग्रजीचं परकेपण गळून पडलेलं. कारण इंग्रजीतले स्वामी चिन्मयानंद आपले. वाचता वाचता भाषा अभ्यासाचा आणखी एक सिद्धांत सापडलेला... परकीय भाषा लवकर शिकायची असेल तर त्या भाषेतलं जीवन आपलं हवं.

सिद्धांतशोधाचा हा क्षण खरंच चिन्मयानंदाचा! मी चिन्मयानंदात खोलवर उतरू लागलो...... आणि एका चिन्मयानंद सुविचारात गढून गेलो... लव्ह इज टु ह्युमन हार्ट व्हाट सनशाईन इज टु फ्लॉवर... ह्या सुविचारानं मनाचं सुमन केलं. सुमन झालेल्या मनात एक विचार पावसासारखा अवचित आला हा सुविचार शिक्षणात, म्हणजे वर्गातल्या शिक्षणात आणला तर... टीचर इज टु स्टुडंट व्हाट लव्ह इज टु ह्युमन हार्ट व्हाट सनशाईन इज टु फ्लॉवर.म्हणजे शिक्षकाचं वर्गात असणं हे विद्यार्थ्यामध्येच असणं. जशी प्रेमाची भावना मानवी हृदयात असते, तसा शिक्षक विद्यार्थ्यांतच असतो. पण त्यासाठी शिक्षकाचं वर्गात येणं हे सूर्योदयासारखं असायला हवं. सूर्योदय झाला की फुलं प्रफुल्लित होतात... खरंच, प्रफुल्लित कसं व्हायचं हे फुलांकडूनच शिकायला हवं. जी प्रफुल्लित होतात तीच तर फुलं असतात... तर सूर्योदय झाला की फुलं प्रफुल्लित होतात, त्याप्रमाणं शिक्षक वर्गात आला की वर्गातली मुलं प्रफुल्लित व्हायला हवीत.

होय, शिक्षकाचं वर्गात येणं हा सूर्योदय आहे. पण शिक्षकाचं वर्गातून बाहेर पडणं हा सूर्यास्त नाही. कारण एक शिक्षक वर्गाबाहेर पडला की दुसरा वर्गात येणार वर्गातला सूर्य, वर्गातला शिक्षक कधीच मावळत नसतो.

मी प्रफुल्लित झालो स्वामी चिन्मयानंदांच्या केवळ एका सुविचारानं मला केवढा मोठा सिद्धांत सुचला... मला अवघा चिन्मयानंद अभ्यासायचाय्...